


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार १० एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# आसाममध्ये इतिहासातील सर्वाधिक 85.21% मतदान

## पुदुचेरीमध्ये ९०% मतदान; केरळममध्ये ४९ वर्षांत दुस-यांदा विक्रमी मतदानाची नोंद



रात्री ८ वाजेपर्यंत ८५.३५% मतदान झाले, जे आसामच्या इतिहासातील सर्वाधिक मतदान आहे. पुद्दुचेरीमध्ये मतदान केंद्रावर एका रोबोटने मतदारांचे स्वागत केले.

**गुवाहाटी/तिरुवनंतपुरम/वृत्तसंस्था :**आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान गुरुवारी (९ एप्रिल) सायंकाळी ६ वाजेपर्यंत पार पडले. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, आसाममध्ये रात्री ८ वाजेपर्यंत ८५.३५% मतदान झाले, जे आसामच्या इतिहासातील सर्वाधिक मतदान आहे. केरळमध्ये ४९ वर्षांतील दुस-या क्रमांकाचे सर्वाधिक मतदान ७७.९७% नोंदवले गेले. पुदुचेरीमध्ये ८९.७८% मतदान झाले.

आसाममध्ये निवडणुकीशी संबंधित हिंसाचारात सुमारे ३० जण जखमी झाले आणि सात जणांना अटक करण्यात आली. श्रीभूमी जिल्ह्यातील पाथरकांडी येथे काँग्रेस आणि भाजप समर्थकांमध्ये झालेल्या संघर्षात सुमारे २५ जण जखमी झाले, त्यापैकी दोघे गंभीर जखमी आहेत.

पुद्दुचेरीमध्ये, मन्नादिपेट येथील एका मतदान केंद्रावर काँग्रेस आणि भाजप समर्थकांमध्ये संघर्ष झाला. पोलिसांनी जमावावर लाठीचार्ज केला. पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री रंगस्वामी यांनी मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर बाईकवरून प्रवास केला.

केरळममध्ये माजी संरक्षण मंत्री आणि काँग्रेस नेते ए. के. अँटनी यांनी तिरुवनंतपुरम येथे मतदान केले. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी गुवाहाटी येथील माँ कामाख्या मंदिरात प्रार्थना केली. त्यानंतर त्यांनी आपल्या पत्नीसह जलुकबारी येथे मतदान केले.

आसाममध्ये, ४१ पक्षांचे ७२२ उमेदवार १२६ जागांसाठी निवडणूक लढवत आहेत. केरळमध्ये, २.७१ कोटी मतदार ८९० उमेदवारांमधून आपल्या नेत्याची निवड करतील. येथे १४० जागा आहेत. पुदुचेरीमध्ये ३० जागांसाठी मतदान झाले. आसाममधील श्रीभूमी जिल्ह्यातील पाथरकांडी येथे काँग्रेसच्या एका उमेदवाराने ईव्हीएम तोडले. त्यामुळे मतदान जवळपास तीन तास थांबवण्यात आले. निवडणूक अधिका-यांनी पर्यायी ईव्हीएम बसवून मतदान पुन्हा सुरू केले. सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आसाममधील बारपेटा येथे मतदानात व्यत्यय आला. केरळमधील कन्नूरमध्ये सायंकाळी ६ वाजता मतदान संपल्यानंतरही अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा दिसल्या. केरळमचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी कन्नूरमधील आरसी आमला बेसिक अप्पर प्रायमरी स्कूलमध्ये मतदान केले. केंद्रीय मंत्री आणि भाजप खा. सुरेश गोपी यांनी थ्रिसूरमध्ये मतदान केले.

**तीन राज्यांमधील चार जागांवर पोटनिवडणुका;** नागालँडच्या कोरिडांगमध्ये दुपारी ३ वाजेपर्यंत ७५.०६% मतदान नोंदवले गेले . तीन राज्यांमधील विधानसभेच्या चार जागांसाठीच्या पोटनिवडणुकांचे मतदान गुरुवारी सुरू आहे. नागालँडच्या कोरिडांग विधानसभा मतदारसंघात दुपारी ३ वाजेपर्यंत ७५.०६% मतदानाची नोंद झाली. दरम्यान, त्रिपुराच्या धर्मनगरमध्ये ७०.०९%मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. कर्नाटकात, बागलकोट आणि दावणगेरे दक्षिण या मतदारसंघांमध्ये मतदानाची टक्केवारी अनुक्रमे ५४.८२% आणि ४९.६६% इतकी राहिली. विद्यमान आमदारांच्या निधनामुळे रिक्तझालेल्या जागा भरण्यासाठी या निवडणुका घेतल्या जात असून, यामध्ये राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकीय पक्षांमध्ये लढती होत आहेत. होजाई (आसाम) येथे, एआययूडीएफचे प्रमुख आणि बिन्नाकांडीचे उमेदवार बद्रुद्दीन अजमल यांनी बोरडोंग येथील एका सरकारी शाळेत मतदान केले. ते म्हणाले, 'आसाममध्ये सर्वत्र लोक आमच्या पक्षाबद्दल उत्साह दाखवत आहेत.' त्यांनी लोकांना गायक झुबीन गर्ग यांना न्याय मिळवून देण्यासाठी, तसेच शिक्षण आणि तंत्रज्ञानासाठी एआययूडीएफला मतदान करण्याचे आवाहन केले.

# 4 मे नंतर गुंडगिरीचा हिशोब घेऊ-पंतप्रधान

## काँग्रेस-डावे एकाच थाळीतील चट्टे-बट्टे



**कोलकाता/वृत्तसंस्था :** पंतप्रधान मोदी गुरुवारी पश्चिम बंगालमधील बीरभूम येथे एका जाहीर सभेला संबोधित करत आहेत. ते म्हणाले, 'आम्हाला असा समाज पाहायचा आहे जिथे प्रत्येकजण भीतीमुक्त असेल. ते 'मां, माटी आणि मानुष' (माता, माती आणि जनता) यांची भाषा करतात; तरीही आज 'मां' रडत आहे, 'माटी'वर घुसखोरांनी अतिक्रमण केले आहे आणि 'मानुष' भयभीत होउन, भीतीच्या छायेत जगत आहे.' त्यांनी पुढे सांगितले, 'गुरु देव रवींद्रनाथ टागोर यांनी अशा समाजाची कल्पना केली होती जिथे प्रत्येकजण भीतीमुक्त असेल; परंतु टीएमसीच्या 'महाजंगल राज'ने (अराजकतेने) याच्या अगदी उलट परिस्थिती निर्माण केली आहे. टीएमसीने तर देशाच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपतींचाही अपमान केला आहे.' तत्पूर्वी, दिवसाच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधील आसनसोल येथे एका जाहीर सभेला संबोधित केले. ते म्हणाले, 'तुम्ही टीएमसीवर विश्वास टाकला, परंतु टीएमसीने बंगालमध्ये क्रूरतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत.' त्यांनी ठामपणे सांगितले, '४ मे नंतर, गुंडगिरीच्या प्रत्येक कृत्याचा हिशोब घेतला जाईल. बंगालमध्ये यापुढे टीएमसीची भीती नव्हे, तर भाजपवरील ➩(पान २ वर)

# बाहेरची औषधे लिहिल्यास डॉक्टरांवर होणार कारवाई!

**मुंबई** :शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणा-या रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास भाग



पाडणा-या डाक्टरांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. रुग्णालयात औषधे उपलब्ध असतानाही बाहेरील प्रिस्क्रिप्शन देण्याच्या प्रकारांवर राज्य सरकारने लगाम घालण्याचा निर्णय घेतला असून, याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सर्व अधिष्ठाता आणि वैद्यकीय अधीक्षकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत.सरकारच्या या निर्णयामुळे गरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता असून, सरकारी रुग्णालयांतील पारदर्शकता आणि जबाबदारी अधिक बळकट होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे गरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता असून, सरकारी रुग्णालयांतील पारदर्शकता आणि जबाबदारी अधिक बळकट होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत किंवा सवलतीच्या दरात औषधे मिळणे अपेक्षित असताना ➩(पान २ वर)

# बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार

## ● हर्षवर्धन सपकाळ यांची घोषणा ●

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने अखेर माघार घेतली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. परंतु आज आकाश मोरे यांची उमेदवारी मागे घेण्यात आली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेउन बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेत असल्याचं जाहीर केले. पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे आज सकाळपासून राज्यात राजकीय विविध घडामोडी आणि ट्विस्ट पाहायला



मिळाले.हर्षवर्धन सपकाळ पत्रकार परिषदेत म्हणाले की, दोन पोटनिवडणूक महाराष्ट्रात होणार आहे. यामध्ये बारामतीकडे सर्वात जास्त लक्ष लागले आहे. वैचारिक भूमिका म्हणून भाजपला विरोध करण्यासाठी बारामतीच्या पोटनिवडणूकीत अर्ज भरला होता. बारामती नाही तर देशभरात भाजपच्या विरोधात काँग्रेसने भूमिका घेतली होती. एकूण सहा अर्ज बारामतीसाठी आले होते. परंतु शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारांनी भल्या पहाटे येउन बारामतीची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विनंती केली. अजित पवार यांच्या संदर्भात सहकार्याची भूमिका घ्या अशी विनंती केली. काही जणांनी अपरिपक्व वक्तव्य केली. त्या संदर्भात कुटुंबांनी दिलगिरी व्यक्त केली. शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी ही विनंती आणि सूचना दिल्या, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. यानंतर सर्व काँग्रेस नेतृत्व यांच्यासोबत चर्चा केली. लढले पाहिजे ही आमची भूमिका आहे. मात्र संस्कृती आणि संवेदना म्हणून आम्ही बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेत आहोत, असं सपकाळ यांनी सांगितले.

# सुनेत्राकाकींना निवडून देण्यासाठी सहकार्य करा

## ● रोहित पवारांचे काँग्रेसला आवाहन ●

**बारामती/प्रतिनिधी :**अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी स्वत: उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे नेते प्रयत्न करत आहेत. सुनेत्रा पवार यांच्याविरोधात काँग्रेसचे आकाश मोरे यांनी अर्ज दाखल केला आहे. काँग्रेसने उमेदवारी मागे घ्यावी, यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी फोनवर चर्चा केली. यानंतर आता रोहित पवार यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भेट घेतली. बारामती विधानसभेची पोटनिवडणूक ही बिनविरोध होणे ही अजितदादांवर प्रेम



करणा-या राज्यातील प्रत्येकाची आणि तमाम बारामतीकरांची इच्छा आहे. अजितदादांची बहुतांश राजकीय कारकीर्द ही काँग्रेसमध्ये आणि नंतर काँग्रेससोबत गेली. या काळात काँग्रेसच्या प्रत्येक नेत्याशी त्यांचा अत्यंत निकटचा संबंध राहिला. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा अखेरचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब यांची मुंबईत भेट घेतली आणि अजितदादा, त्यांचे काम आणि त्यांचा काँग्रेसशी असलेला संबंध बघता काँग्रेसने बारामतीत उमेदवारी मागे घ्यावी, अशी विनंती त्यांना केली, अशी माहिती रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करून दिली. या विनंतीचा हे सर्वजण आदर ठेवतील.




# नाशिकमधील आयटी कंपनीत धर्मांतर, लैंगिक शोषण

**नाशिक/प्रतिनिधी :**नाशिक शहरातील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांचा विनयभंग, लैंगिक व मानसिक शोषण तसेच धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी आतापर्यंत नउ गुन्हे दाखल झाले असून सहा जणांना अटक करण्यात आली आहे. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी मोठी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच नाशिक पोलिसांच्या तपासावर भाष्य केले आहे. बीड येथे माध्यमांशी बोलत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, हे अतिशय गंभीर प्रकरण असून पोलिसांनी ते उघडकीस आणले. अशा प्रकारच्या आयटी कंपनीत दबाव आणून धर्मांतर आणि लैंगिक शोषण केले. ते अतिशय धक्कादायक आहे. मी पोलिसांचे कौतुक करेन की त्यांनी वेगाने कारवाई करत याचा भांडाफोड त्यांनी केला.

**प्रकरण काय आहे?**

नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांवर घडलेल्या अत्याचाराची माहिती सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांनी दिली. २०२२ ते २०२६ या कालावधीत हे गुन्हे घडले. यातील एक गुन्हा लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषणाचा आहे, तर एक गुन्हा धर्म परिवर्तनाच्या प्रयत्नाचा आहे. या गुन्ह्यांची व्याप्ती, गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेउन सखोल तपास करण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सहायक आयुक्त (गुन्हे) यांच्या अधिपत्याखाली विशेष तपास पथक अर्थात एसआयटीची स्थापना केली आहे. तक्रारदारांमध्ये आठ महिला तर एका युवकाचा समावेश आहे. या युवकाच्या धर्मांतराचा प्रयत्न झाल्याचे समोर आले.

**लग्नाचे वचन आणि लैंगिक अत्याचार-** जुलै २०२२ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीतील तीन सहका-यांनी पीडितेला विशिष्ट धर्माविषयी आक्षेपार्ह बोलून धार्मिक भावना दुखावल्या. एका संशयिताने लग्नाचे वचन देउन पीडितेसोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. तसेच अन्य एकाने कार्यालयात, जिन्यात पकडून पीडितेशी लैंगिक जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत म्हटलेले आहे.

**विनयभंग, अश्लील शेरेबाजी आणि चुकीचा स्पर्श-**२०२२ ते २०२६ या काळात आरोपींनी महिला सहका-यांच्या वैयक्तिक वैवाहिक आयुष्याबाबत लज्जास्पद टिप्पणी करत चुकीचा स्पर्श केला आणि पीडितेकडे रोखून पाहिल्याचा आरोप करण्यात आला. तसेच जवळीक साधण्याच्या उद्देशाने खासगी आयुष्याविषयी लज्जास्पद गोष्टी विचारल्या. तसेच गैरवर्तन केले. अशा प्रकारचे तीन ते चार गुन्हे दाखल झाले आहेत.

**इतर धर्माची प्रार्थना, मांसाहार करण्यास भाग पाडले-**२०२२ ते २३ मार्च २०२६ दरम्यान बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणा-या तीन संशयितांनी विशिष्ट धर्माविषयी आक्षेपार्ह बोलून पुरुष तक्रारदाराला त्यांच्या धर्माची प्रार्थना करायला भाग पाडले. विशिष्ट धर्माचा अपमान केला. तक्रारदाराला बळजबरीने मांसाहार सेवन करायला लावून त्याचे धर्म परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. विशिष्ट धर्मातील महिलांबाबत अश्लील शब्द आणि शेरेबाजी केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल आहे.

# पेट्रोल पंपावर महिलेची भरदिवसा निर्घृण हत्या



**छत्रपती संभाजीनगर:** जालना महामार्गावरील करमाड परिसरात गुरुवारी दुपारी माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली. एका उन्मादी तरुणाने भरवस्तीत असलेल्या पेट्रोल पंपावर शिरून तिथल्या महिला कर्मचा-याची धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या केली. ही हृदयद्रावक घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून, यामुळे संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे सावट पसरले आहे. पूजा सुदाम गावंडे असं हत्या झालेल्या २७ वर्षीय तरुणाचं नाव आहे. चित्तेपिंपळगाव इथं राहणारी पूजा सुदाम गावंडे ही तरुणी करमाड येथील शिवसमर्थ पेट्रोल पंपावर आपली ड्युटी करत होती. दुपारी १२:३० च्या सुमारास, जेव्हा महामार्गावर मोठी वर्दळ असते, तेव्हा आरोपीने अचानक पूजावर हल्ला चढवला. काही समजण्याच्या आतच त्याने चाकूने तिच्या गळ्यावर वार केले. पूजा रक्ताच्या थारोळ्यात कोसळली आणि तिचा जागीच प्राण गेला. अवघ्या काही सेकंदात घडलेल्या या प्रकारामुळे आजूबाजूचे लोकही सुन्न झाले. हत्येची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यावरून आरोपीची ओळख पटली. सत्यम रावसाहेब गावंडे असे या संशयिताचे नाव असून, तो पूजाचा ओळखीचा असल्याची माहिती समोर आली आहे. प्रेमसंबंधांमधील धुसफूस किंवा एकतर्फी प्रेमातून हा टोकाचा राग अनावर झाला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. पोलिसांनी कौशल्याने सापळा रचून आरोपीला कचनेर परिसरातून बेड्या ठोकल्या आहेत. भरदिवसा आणि सीसीटीव्ही कॅमे-यासमोर घडलेल्या या निर्घृण हत्याकांडाने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. करमाड पोलीस आता या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करत असून, आरोपीने हे पाउल नेमके का उचलले, याचा उलगडा लवकरच होईल, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.



# रागाच्या भरात पतीने पत्नीला संपविले

## मुलासोबत सुरू भांडणात मध्यस्थी करणे जीवावर बेतले



**अकोला/प्रतिनिधीः-** वडील व आठ वर्षीय मुलामध्ये सुरू असलेल्या वादात मुलाला वाचवण्यासाठी गेलेल्या आईवर संतापाच्या भरात पतीने चाकूने सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या पत्नीला पतीच रुग्णालयात देखील घेऊन गेला. मात्र गंभीर जखमी पत्नीचा मृत्यू झाला. त्यानंतर पती स्वत:हून पोलीस ठाण्यात हजर होत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. बोरगांव मंजू पोलीस ठाण्यांतर्गत यावलखेड येथे आज गुरुवार ९ एप्रिलच्या सकाळी ही धक्कादायक घटना घडली. वृषाली निंबोकार असे मृत पत्नीचे नाव आहे, तर अनिल निंबोकार असे आरोपी पतीचे नाव आहे. या थरारक घटनेने शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे. माहितीनुसार बोरगाव मंजू पोलीस ठाण्यांतर्गत येत असलेल्या यावलखेड येथे आज सकाळी अनिल निंबोकार व त्याच्या आठ वर्षांच्या मुलामध्ये वाद सुरू होता. या वादातून अनिल निंबोकार हा घरात मुलाला मारत होता. मुलाची आई वृषाली यांना ते सहन झाले नाही. त्या दोघांच्या वादात मध्ये पडल्या. मुलाला वाचवण्याचे त्यांचे प्रयत्न होते. संतप्त पतीला हे आवडले नाही. पतीचा राग अनावर झाला. त्याने धारदार शास्त्राने पत्नीच्या पोटात गंभीर वार केले. त्यामुळे पत्नी रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळली. पती घाबरला. या अवस्थेत घटनेनंतर आरोपी स्वतः गंभीर जखमी पत्नीला घेऊन रुग्णालयात दाखल झाला. रुग्णालयात डॉक्टरांनी तपासणी करून पत्नीला मृत घोषित केले. त्यानंतर आरोपी स्वतः स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांपुढे हजर झाला. त्याने घडलेला घटनाक्रम सांगून गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी अनिल हा स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात आहे. पोलीस पुढील कारवाई करत आहे. या थरारक घटनेमुळे शहर चांगलेच हादरले असून आरोपीविषयी तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

### आई-वडिलांचे छत्र हरवले

या घटनेमुळे दोन मुलांच्या डोक्यावरील आई-वडिलांचे छत्र हरवले. वडील व मुलाच्या वादात पडल्याने रागाच्या भरात पतीने पत्नीची हत्या केली. त्या दाम्पत्याला दोन चिमुकली मुले आहेत. या घटनेमुळे शाळकरी दोन्ही मुलांचे आई-वडिलांचे छत्र हरवले. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# आजपासून तक्षशिला महाविद्यालयात 'महामानव पर्वा'चे आयोजन

## -वैचारिक व्याख्याने, संगीत संध्या आणि आरोग्य शिबिर
## -श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत आयोजन



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टद्वारे संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय, अमरावती, तक्षशिला महाविद्यालय श्याम नगर अमरावती व तक्षशिला महाविद्यालय दारापूर यांच्यावतीने १० एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'महामानव पर्व' हा भव्य वैचारिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून हा पाच दिवसीय महोत्सव संपन्न होणार आहे. या महोत्सवांतर्गत विचार मंथन, व्याख्याने, एकपात्री प्रयोग आणि गीत गायन स्पर्धा अशा विविध उपक्रमांतून महामानवांच्या विचारांचा जागर केला जाणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात शुक्रवार, १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृती दिनाने होणार आहे. 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार' या विषयावर आयोजित या सत्राचे उद्घाटन उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर यांच्या हस्ते होईल, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब गवई चारिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कीर्तीताई राजेश अर्जुन असतील. याप्रसंगी शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. केशव तुपे हे मुख्य वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील. प्रमुख उपस्थितीत संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस तसेच प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित राहतील. हा कार्यक्रम तक्षशिला महाविद्यालय अमरावती येथील अजिंठा सेमिनार हॉलमध्ये संपन्न होईल.

त्यानंतर शनिवार, ११ एप्रिल रोजी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त 'महात्मा फुलेंची शैक्षणिक व सामाजिक क्रांती' या विषयावर नेहरू महाविद्यालय नेर परसोपंत येथील डॉ. प्रविण बनसोड यांचे व्याख्यान होईल. याच दिवशी प्रसिद्ध कलाकार सुशीलदत्त बागडे यांचा 'मी ज्योतिराव फुले बोलतोय' हा अभ्यासपूर्ण एकपात्री प्रयोग सादर केला जाणार आहे. हा कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय अमरावती येथील कोलंबिया सेमिनारमध्ये संपन्न होईल.

रविवार, १२ एप्रिल रोजी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, छत्रपती संभाजीनगर येथील इतिहास विभाग प्रमुख तथा प्राचीन बौद्ध संस्कृती अभ्यासक डॉ. संजय पाईकराव 'चक्रवर्ती सम्राट अशोक' या विषयावर प्रकाश टाकणार आहेत. या संपूर्ण सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'महामानव वैचारिक अभिवादन' हा उपक्रम होय. या दिवशी सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत आदिवासी व पारधी समाजातील विद्यार्थी सलग १२ तास अभ्यास करून बाबासाहेबांना अनोख्या पद्धतीने मानवंदना देणार आहेत.

वैचारिक मेजवानीसोबतच सोमवार, १३ एप्रिल रोजी सायंकाळी ८:३० वाजता 'महामानव अभिवादन संगीत संध्या' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये स्फूर्ती गीते, बुद्ध गीते आणि भीम गीतांच्या माध्यमातून महामानवांना संगीतमय अभिवादन करण्यात येईल. महोत्सवाचा समारोप मंगळवार, १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी होईल. या दिवशी तक्षशिला आयुर्वेदिक महाविद्यालय, खर्डा व तक्षशिला फार्मसी कॉलेज, खर्डा यांच्या वतीने अमरावती येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात (इर्विन चौक) सकाळी ७:३० ते रात्री ८:०० या वेळेत 'भव्य रोग निदान शिबीर व शितपेय वाटप' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे सचिव डॉ. कमलाकर पायस, प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. पी. आर. एस. राव यांच्यासह प्राचार्य डॉ.माधुरी फुले, प्राचार्य डॉ. मल्लू पडवाल, डॉ. शुद्धोधन कांबळे, प्रा. प्रितेश पाटील, डॉ. शितल बाबू तायडे, प्रा.गंगाधर पांडे, डॉ.रेखा पर्वतकर, डॉ.रजनी गेडाम, डॉ. प्रकाश मस्के, डॉ. प्रवीण वानखडे, डॉ. यशवंत हरणे, डॉ.नवल पाटील, प्रा. खेमानंद फुलझेले यांच्यासह महाविद्यालयातील पाली विभाग, बुद्धिस्ट स्टडी सेंटर आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत. या वैचारिक सोहळ्यात जास्तीत जास्त नागरिकांनी, अभ्यासकांनी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दुचाकीच्या धडकेत दोन वृद्ध महिला जखमी

## -इर्विन चौकातील घटना




अमरावती/प्रतिनिधीः
स्थानिक इर्विन चौकात रविवारी सायंकाळी दुचाकीच्या धडकेत दोन वृद्ध महिला जखमी झाल्या. त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. किरण उदासी (वय ७०) आणि छाया उदासी (वय ६५) असे जखमी महिलांचे नाव आहे. या प्रकरणात कोतवाली पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे आणि त्यांना शोधण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले आहे. माहितीनुसार दुचाकी वर जाणाऱ्या दोन आरोपींनी रस्ता पार करणाऱ्या किरण उदासी आणि छाया उदासी यांना धडक दिली आणि तिथून पळाले. एका ऑटो चालकाने त्यांचा पाठलागही केला पण त्यांना पकडण्यात त्याला यश आले नाही. या हिट आणि रन प्रकरणात पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले आहे. बाईक स्वारांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की कोणीही या घटनेचा व्हिडिओ आणि फोटो काढले असेल तर ते व्हाट्सअप नंबर ७३८५२००८९८ व ८१४९९३६८४७ वर पाठवावे. जखमी महिलांसोबतही विचारपूस केली जात आहे.

# वरखेड फाट्यावर मध्यरात्री कार पलटी

**तिवसा/प्रतिनिधीः-**
राष्ट्रीय महामार्ग-तिवसा वरखेड फाटादरम्यान निळ्या रंगाची एमएच ३०बीबी ६५६१ क्रमांकाची कार मध्यरात्री दरम्यान पलटी झाली. अपघात कसा झाला, हे मात्र घटनास्थळी कुणीही नसल्याने समजू शकले नाही.

सोमवारी (दि.६) रात्री तिवसा पोलिस ठाण्याचे पीएसआय अमोल बुरकूल आपल्या पथकासह रात्र गस्तीवर असताना वरखेड - फाट्यानजीक नागपूर दिशेने जाणारी कार पूर्णतः पलटी झाली असल्याचे दिसून येताच मदत हेतूने कारच्या दिशेने धाव घेऊन पाहणी केली; मात्र कारमध्ये कोणीही आढळून न आल्याने अपघाताचे कारण व प्रवाशांचे नाव कळू शकले नाही. शिवाय अपघात घडून दोन दिवस लोटूनसुद्धा पोलिसांपर्यंत कुणीही पोहचले नसल्यामुळे अधिकची माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

## १ व १० वरिल उर्वरित

### ४ मे नंतर गुंडगिरीचा

विश्वासच प्रबळ ठरेल.' डाव्या पक्ष आणि काँग्रेसवर निशाणा साधत ते म्हणाले, 'गेल्या काही दशकांमध्ये, बंगालने प्रत्येक पक्षावर विश्वास टाकला आहे आधी काँग्रेसवर, मग डाव्या पक्षांवर आणि पुन्हा काँग्रेसवर. मात्र, हे सर्व एकाच माळेचे मणी आहेत. या पक्षांनी केवळ बंगालचा विश्वासघातच केला नाही, तर येथील स्वप्नांनाही पायदळी तुडवून त्यांची धूळधाण केली आहे.' तसेच गुरुवारी, मोदी यांनी पश्चिम बंगालमधील हल्दिया येथेही एका जाहीर सभेला संबोधित केले आणि म्हटले, 'टीएमसीने बंगालच्या तरुणांचा 'दुहेरी विश्वासघात' केला आहे.'

**बीरभूममधील ११ पैकी १० आमदार टीएमसीचे आहेत**

बीरभूम हा बंगालमध्ये टीएमसीचा एक मजबूत बालेकिल्ला मानला जातो. २०२१ मध्ये, टीएमसीने या जिल्ह्यातील ११ पैकी १० विधानसभा जागांवर विजय मिळवला होता. या प्रदेशात ध्रुवीकरण हा देखील एक महत्त्वाचा मुद्दा आहे; बीरभूमची लोकसंख्या रचना ६३% हिंदू आणि ३७% मुस्लिम अशी आहे. गेल्या काही वर्षांत, भाजपने या जिल्ह्यात आपला जनाधार विस्तारला आहे आणि बेकायदेशीर वाळू उत्खनन, भ्रष्टाचार व हिंसाचार यांसारखे मुद्दे उपस्थित करून ते टीएमसीला (TMC) कोंडीत पकडत आहेत.

**हल्दियाः भाजपचा एक अभेद्य बालेकिल्ला-** हल्दिया हा विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांचा गृह मतदारसंघ आहे. संपूर्ण राज्यात भाजपच्या असलेल्या सर्वात मजबूत बालेकिल्ल्यांपैकी हा एक आहे. २०२१ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये, या पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील एकूण १६ विधानसभा जागांपैकी भाजपने ८ जागांवर विजय मिळवला होता. तसेच २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही, या जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा जागांवर पक्षाने विजय संपादन केला. हल्दियाच्या दौऱ्यानंतर, पंतप्रधान आसनसोल आणि बीरभूमलाही भेट देणार आहेत; तिथे ते जाहीर सभांना संबोधित करतील.

### बाहेरची औषधे लिहिल्यास

अनेक ठिकाणी रुग्णांना खाजगी मेडिकलमधून औषधे घेण्यास सांगितले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. याची गंभीर दखल घेत प्रशासनाने आता झीरो टालरन्स भूमिका घेतली आहे. नव्या निर्देशांनुसार, प्रत्येक रुग्णाला आवश्यक औषधे रुग्णालयाच्या साठ्यातूनच उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष उपचारासाठी आवश्यक आणि शासनाच्या सूचीबाहेरील औषधांशिवाय अन्य कोणत्याही कारणासाठी रुग्णांना बाहेरून औषधे खरेदी करण्यास सांगता येणार नाही. औषध साठा अपुरा पडू नये यासाठी रुग्णालयांनी नियमित आढावा घेण्याचेही निर्देश दिले.८८ बहुतांश औषधे रुग्णालयातूनच दिली जातात. मात्र काही सुपर स्पेशालिटी प्रकरणांमध्ये विशिष्ट औषधे सुचवावी लागतात. अशा दुर्मिळ प्रसंगी रुग्णाच्या संमतीनेच बाहेरील औषध लिहून दिले जाते. हृदय व मेंदू शस्त्रक्रियेतील काही औषधे उपलब्ध नसल्यासच रुग्णाच्या मर्जीने हा पर्याय वापरला जातो, अशी माहिती डा. अजय भंडारवार, अधिष्ठाता, जे. जे रुग्णालय यांनी दिली आहे. तातडीच्या परिस्थितीत एखादे औषध उपलब्ध नसल्यास स्वीय प्रपंजी निधी (पीएलए) मधून त्वरित खरेदी करून रुग्णाला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, औषध वितरण प्रणाली पारदर्शक करण्यासाठी स्ट?क रजिस्टर आणि डिजिटल नोंदी अद्ययावत ठेवण्यावरही भर देण्यात आला आहे. नियमांचे उल्लंघन करणा-या ड?क्टरांवर प्रशासकीय आणि शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

### ४८ कोटींचा दंड रखडला

तहसीलदारांच्या पत्रात नमूद आहे.

या गंभीर बाबीवर अकोटचे उपविभागीय अधिकारी यांना विचारणा केली असता 'तक्रार करा, मगच चौकशी करतो' असा पवित्रा घेण्यात आला. त्यामुळे त्यांच्या भूमिकेवरही संशय व्यक्त होत असून महसूल अधिकाऱ्यांचे 'हात ओले' असल्याची चर्चा रंगू लागली आहे. विशेष म्हणजे, भूदान जमिनींचे भोगवटादार म्हणून उपविभागीय अधिकाऱ्यांचीच जबाबदारी असताना त्यांच्या कार्यक्षेत्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असल्याने संपूर्ण महसूल यंत्रणाच आरोपांच्या कटघऱ्यात उभी राहिली आहे. अकोट तालुक्यातील हे एकच प्रकरण नसून अशाच प्रकारच्या अनेक प्रकरणांत कोट्यवधी रुपयांचे दंड प्रलंबित आहेत. मात्र, वसुलीच्या नावाखाली 'तारीख पे तारीख' धोरण राबविले जात असून शासनाचा महसूल मुद्दाम थांबवून ठेवला जात असल्याचा आरोप केला जात आहे.

### अकोली मार्गावर एसटी वाहकाची

आहे. या खूनामागील नेमके कारण काय आहे याचा शोध पोलिस घेत असून, विविध अँगलने तपास सुरू आहे.

किरण कमलाकर पुणतांबेकर (४५,स्वस्तिकश्री अपार्टमेंट,अकोली ) चांदुर रेल्वे बस डेपो मध्ये कार्यरत होते. काही दिवसा पूर्वीच त्यांची बडनेरा डेपो मध्ये बदली झाली होती. ड्युटीवर ते नेहमी गैरहजर राहत होते. अशात गुरुवारी दुपारी ३.४५ वाजता अकोली ग्राउंडवर काही तरुण क्रिकेट खेळण्यासाठी गेले होते, त्यावेळी त्यांना तेथील एका पडित इमारतीच्या मागे किरणचा मृतदेह दिसला. मुलांनी याची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलीस तिथे पोहोचले. फॉरेंसिक पथकलाही बोलविण्यात आले होते. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला आहे. अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

**डीसीपी घटनास्थळावर -** घटनेनंतर राजापेठ पोलीस, खोलापुरी गेट पोलिसांच्या मदतीसाठी पोहचले होते. डीबी स्कॉड पण घटनास्थळी दाखल झाले. प्रकरणाचे गांभीर्य पाहून डीसीपी श्याम घुगे, एसीपी संजय खताळे, गुन्हे शाखेचे संदीप चव्हाण हे सुद्धा पथकासह घटनास्थळी दाखल झाले होते.

### राजुरा बाजार मार्गावर भीषण

नाही. याच दरम्यान, वरुडकडून राजुरा बाजारकडे भरधाव वेगाने येणारी दुचाकी थेट झाडावर आदळली. या अपघातात दुचाकीवरील तीन युवक गंभीर जखमी झाले होते. त्यांची नावे रितेश अशोक बहुरुपी (वय १८), साहिल गुणवंत सुरजुसे (वय १८) व ओम संजय गोहत्रे (वय १८, रा. राजुरा बाजार) अशी आहेत. या घटनेनंतर तिघांनाही तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या ओम संजय गोहत्रे याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी हलविण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान दिनांक ७ रोजी रात्री त्याचा मृत्यू झाला. इतर दोन युवकांवर सध्या उपचार सुरू आहेत. रस्ता बंद झाल्याने सामाजिक कार्यकर्ते निलेश साबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी झाड हटवून मार्ग मोकळा करण्याचे काम सुरू केले होते. मात्र त्याचवेळी हा अपघात घडल्याने दुर्घटना टाळता आली नाही. ओम गोहत्रे यांच्या मृत्यूमुळे राजुरा बाजार परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तरुण वयात झालेल्या या अपघाती मृत्यूमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.

### आयपीएल ऑनलाईन सट्टयावर

परिसरातील मनपा उद्यानासमोर एक तरुण मोबाईलच्या माध्यमातून आयपीएल सामन्यांवर ऑनलाईन सट्टा चालवत आहे. ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवण्यात आल्यानंतर तात्काळ सापळा रचून कारवाईचे आदेश देण्यात आले. गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकताच संबंधित तरुण मोबाईलवरून सुरू असलेल्या दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध गुजरात टायटन्स या आयपीएल सामन्यावर पैशांची बाजी लावताना आढळून आला. पोलिसांनी त्याला जागीच ताब्यात घेतले. चौकशीत त्याचे नाव गिरीश उर्फ प्रिन्स संजय ददलानी (वय २०, रा. कलोती नगर, अमरावती) असे निष्पन्न झाले.

तपासादरम्यान आरोपीच्या आयफोन ११ मध्ये 'OSTN 777' नावाचे बेकायदेशीर क्रिकेट बेटिंग ॲप आढळून आले. या ॲपद्वारे तो इतरांना आयडी देऊन सट्टा चालवत असल्याचेही उघड झाले. पोलिसांनी आरोपीकडून मोबाईल व संबंधित साहित्य जप्त करत एकूण सुमारे ४०,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे अधिकारी व पथकाने केली आहे.

### भरधाव वाहनाच्या धडकेत

जखमी बिबट्याला ताब्यात घेऊन प्राथमिक उपचारासाठी प्रयत्न केले, मात्र गंभीर दुखापतीमुळे सुमारे एक तासाच्या आतच त्याचा मृत्यू झाला. वनविभागाच्या माहितीनुसार मृत बिबट्या सुमारे एक वर्ष वयाची मादी होती. घटनास्थळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर वडाळी वनविभागाच्या हद्दीत नियमानुसार तिच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. या घटनेमुळे तिवसा आणि परिसरात वन्यजीवांचा वावर असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले असून वनविभागाने नागरिकांना आणि वाहनचालकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. महामार्गावर रात्री व पहाटेच्या वेळी विशेष काळजी घेण्याची गरजही व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास वनविभागाकडून सुरू आहे.

### सयाजी हॉटेल्सची अमरावतीत

दर्जेदार सेवा यांचा संगम साधत हे हॉटेल विदर्भातील आतिथ्य क्षेत्रात नवा मापदंड स्थापित करणार आहे.

समृद्ध सांस्कृतिक वारसा, धार्मिक महत्त्व आणि शैक्षणिक तसेच व्यावसायिक केंद्र म्हणून वाढती ओळख असलेले अमरावती शहर महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे उदयोन्मुख ठिकाण बनत आहे. नागपूरच्या नजीक आणि सुलभ रस्ते व रेल्वे संपर्कामुळे येथे व्यावसायिक प्रवास आणि मोठ्या सामाजिक कार्यक्रमांची संख्या वाढत असून, 'एनराईज बाय सयाजी'साठी हे स्थान अत्यंत योग्य ठरते. ८२ सुसज्ज खोल्यांसह 'एनराईज अमरावती' येथे ग्रांड, ग्रांड ट्विन, एक्झिक्युटिव्ह ग्रांड आणि प्रीमियम ग्रांड अशा विविध श्रेणीतील खोल्यांमध्ये व्यवसायिक तसेच पर्यटनासाठी येणाऱ्या पाहुण्यांसाठी आरामदायी व उत्कृष्ट निवासाची सुविधा उपलब्ध आहे.

या हॉटेलचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे त्याची विस्तृत बँक्वेट आणि इव्हेंट सुविधा, ज्यामुळे हे ठिकाण परिसरातील सर्वात मोठ्या इव्हेंट डेस्टिनेशनपैकी एक ठरते. 'महल','ज्वेल' आणि 'सॉलिटेअर' यांसारख्या भव्य इनडोअर हॉल्ससह 'वृंदावन' आणि 'वाटिका' यांसारख्या प्रशस्त आउटडोअर जागा तसेच विवाह सोहळे व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खास ॲम्फीथिएटर येथे उपलब्ध आहे. २,००० पाहुण्यांपर्यंत क्षमतेमुळे हे हॉटेल लग्नसमारंभ, कॉर्पोरेट परिषद आणि मोठ्या कार्यक्रमांसाठी आदर्श ठिकाण ठरणार आहे.

हॉटेलमधील 'मोमेंट' हे ऑल-डे डायनिंग रेस्टॉरंट विविध बहुराष्ट्रीय खाद्यपदार्थांचे विकल्प सादर करत, पाहुण्यांना दर्जेदार आणि आकर्षक वातावरणात जेवणाचा आनंद देते.

या उद्घाटनाबाबत सयाजी हॉटेल्सचे ऑपरेशन्स डायरेक्टर अजय कनोजिया म्हणाले, 'एनराईज बाय सयाजीद्वारे आम्ही वेगाने विकसित होत असलेल्या शहरांमध्ये उत्कृष्ट आणि विचारपूर्वक डिझाइन केलेले आतिथ्य अनुभव देण्याचा आमचा हेतू आहे. अमरावती हे प्रचंड क्षमता असलेले बाजारपेठ असून, या प्रकल्पाद्वारे आम्ही दर्जा, प्रमाण आणि सातत्यपूर्ण सेवा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेची पूर्तता करत आहोत.'

स्वप्नील सोनी, संचालक मणिरत्न ग्रुप एलएलपी, म्हणाले, 'सयाजी हॉटेल्ससोबत भागीदारी करत अमरावतीत एक महत्त्वपूर्ण आतिथ्य प्रकल्प साकारताना आम्हाला आनंद होत आहे. शहरातील मोठ्या क्षणांचे सेलिब्रेशन-लग्नसमारंभ, सामाजिक कार्यक्रम- यासाठी तसेच आधुनिक प्रवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे हॉटेल एक आदर्श ठिकाण ठरेल.'

रणनीतिक स्थान, प्रशस्त सुविधा आणि सयाजी हॉटेल्सच्या खास आतिथ्यामुळे 'एनराईज बाय सयाजी, अमरावती' हे पर्यटक आणि स्थानिकांसाठी एक महत्त्वाचे आकर्षण ठरणार असून, आराम, दर्जा आणि अविस्मरणीय अनुभव एकाच छताखाली उपलब्ध करून देणार आहे.

### एम.डी. ड्रग्ससह एकाला

ठरलेल्या ठिकाणी संशयित इसम पोहोचताच पोलिसांनी त्याला थांबवून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याचे नाव शेख नौशाद शेख सलीम (वय ३२, रा. बिस्मिल्ला नगर) असे निष्पन्न झाले. झडती घेतली असता त्याच्याकडून १५.२६० ग्रॅम एम.डी. अमली पदार्थ आढळून आला. तसेच पोको कंपनीचा मोबाईल फोन (किंमत सुमारे १०,०००) आणि विना नंबरची स्प्लेंडर दुचाकीही जप्त करण्यात आली. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी प्राथमिक तपासणी करून जप्त केलेला पदार्थ एम.डी. असल्याची पुष्टी केली आहे. या कारवाईनंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असून तपास सुरू आहे.

### कार उलटून जखमी महिलेचा

झाल्या, तर इतर प्रवासी किरकोळ जखमी झाले होते. जखमींना तातडीने भातकुली ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. अर्चनाची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती इर्विन रुग्णालयात आणि त्यानंतर नागपूर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले होते. सतत सुरू असलेल्या उपचारांदरम्यान १९ मार्च रोजी डॉक्टरांनी अर्चना गडलिंग यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. लग्न समारंभातील आनंदाच्या क्षणांनंतर परतीच्या प्रवासात घडलेल्या या भीषण अपघातामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

फिर्यादी मंगेश गडलिंग यांच्या तक्रारीनुसार चालक भोला संतोष वाडी (वय २५, रा. दाभा, अमरावती) याने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळे अपघात घडल्याचा आरोप आहे. या प्रकरणी ८ एप्रिल रोजी भातकुली पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### वडाळी उद्यानाची महापौर श्रीचंद

करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांसाठी अधिक हिरवळ, आरोग्यदायी वातावरण आणि विरंगुळ्याचे उत्तम साधन उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या पाहणी दौऱ्यात सभागृह नेते चेतन गावंडे, नगरसेविका ममता आवारे, पंचफुला चव्हाण, नगरसेवक विक्की उर्फ विशाल वानखडे, सैय्यद राशद अली, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, अभियंता राजेश आगरकर, माजी महापौर अशोक डोंगरे तसेच संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालयात

असल्याने पट्टेवाटप करण्यात यावे. खेलो इंडियामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १४ प्रस्ताव पाठविण्यात यावे. तसेच यावली शहिद येथील शहिद स्मारकासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे,आदि विषयांवर यावेळी चर्चा झाली.

**JIJAU COMMERCIAL CO-OP BANK LTD. AMRAVATI**
Head Office : "Jijau" Plot No. 33, 34 Walcut Compound, Amravati
Phone No.2560067, 2570056
Email id – itm@jijaubank.bank.in | Website – www.jijaubank.bank.in

**Invite Quotation For Fiber Optics Connectivity At Jijau Bank Branches**

Jijau Commercial Co-Op Bank Ltd. inviting quotations for supplying fiber optics connectivity (100 MBPS) for 11 branches. Eligible vendors/ISP can submit their quotations in all respect before 15/04/2026 on bank address. For more details contact Mo. No. 9922625207 between office time 11 AM to 5 PM.

Chief Executive Officer

**जाहीर नोटीस**

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, **महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - मुंडनिशांकराव, नगर पंचायत नांदगांव खंडेश्वर, शेत सर्व्हे क्र.८०/२, प्लॉट क्र.२५-ए याचे एकुण क्षेत्रफळ १३७७.२८ चौ.फुट, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती याची चतुःसिमा--

पुर्व - प्लॉट क्र.२६-बी, पश्चिम - लेआऊटमधील रस्ता, उत्तर - प्लॉट क्र.२४-बी, दक्षिण - प्लॉट क्र.२५-बी

सदर मिळकत **श्री.योगेश श्रीराम बोबडे** यांनी दिनांक 06.06.2016 रोजीचे **दस्त क्र.**1133/2016 नुसार **सौ.उषाताई राजेंद गोरले** यांच्याकडून खरेदी केलेली होती. तसेच त्यांनी **महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्याकडून गृह कर्ज घेतले होते व त्या संदर्भात मिळकतीचे **मूळ दस्ताऐवज १) मूळ खरेदी दि.** 29.06.2015 **रोजीचे दस्त क्र.**1294/2015, 2) **मूळ खरेदी दि.०६.०६.२०१६ रोजीचे दस्त क्र.**११३३/२०१६, ३) मूळ खरेदी दि.१९.१०.२०११ रोजीचे दस्त **क्र.**२७७७/२०११ हे **महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड,** यांच्याकडे जमा केले होते व सदर संपूर्ण मिळकतीचे दस्त हे **महिंद्रा रुरल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** व्हेंडर स्टोरेज कार्यालयामधून गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या ७ दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, करीता ही जाहीर सुचना देत आहे.

शिक्का

आपला,
ॲडव्होकेट
रवींद्र रु.वाटाणे,
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो.नं.9823698745

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, १० एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## एसआयआर मोहीम यशस्वी करावी - जिल्हाधिकारी

### वाशिम जिल्ह्यात मतदार नोंद मॅपिंगला वेग; ७६.४७ टक्के नोंदी पूर्ण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

छायाचित्र मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करत पूर्वतयारी पूर्ण ठेवणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. निवडणूक आयोगाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या एसआयआर कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.



जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान स्तर प्रतिनिधी (बीएलए) नियुक्ती करण्यासह मतदार नोंद मॅपिंगसाठी व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या. बूथस्तर अधिकारी (बीएलओ) यांना आवश्यक ते सहकार्य करणे, कायमस्वरूपी स्थलांतरित व मयत मतदारांची माहिती अद्ययावत करणे, मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रांबाबत माहिती देणे तसेच १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवमतदारांची नोंदणी करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. एसआयआर कालावधीत बीएलए मार्फत दररोज १० अर्ज तसेच एकूण ५० अर्ज सादर करता येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीत उपजिल्हा निवडणूक अधिकारी धनाजी तोरसकर यांनी सादरीकरणाद्वारे मोहिमेची सविस्तर माहिती दिली. बैठकीस अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, नायब तहसीलदार (निवडणूक) एस. एम. पढवे, सहायक महसूल अधिकारी रवि महाले यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. दरम्यान, वाशिम जिल्ह्यात ऑनलाइन मतदार नोंद मॅपिंग मोहिमेला वेग आला असून आतापर्यंत ७६.४७ टक्के नोंदी पूर्ण झाल्या आहेत. एकूण १०,२९,९६१ मतदारांपैकी ४,२०,५२५ मतदारांची नोंद (मॅपिंग) पूर्ण करण्यात आली आहे.

तालुकानिहाय प्रगतीत रिसोड तालुका ७९.०६ टक्क्यांसह आघाडीवर असून त्यापाठोपाठ मानोरा (७८.२२), मालेगाव (७८.१३), मंगरूळपीर (७५.७७), कारंजा (७४.६२) व वाशिम (७४.४३) तालुक्यांचा क्रम लागतो. विधानसभा मतदारसंघनिहाय पाहता रिसोड मतदारसंघात ८०.६० टक्के, कारंजा मतदारसंघात ७१.२२ टक्के, तर वाशिम मतदारसंघात ६६.१६ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. जिल्ह्यातील एकूण मॅपिंगपैकी ७२.३६ टक्के मतदारांची वंशावळीसह नोंद पूर्ण झाली असून २७.६४ टक्के नोंदी अद्याप प्रलंबित आहेत. अपूर्ण नोंदींमुळे भविष्यात मतदार यादीतून नाव वगळले जाण्याची शक्यता असल्याने उर्वरित नागरिकांनी तातडीने मॅपिंग पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

महिला मतदारांच्या बाबतीत माहेरच्या कुटुंबाशी जोडणी राखणे महत्त्वाचे ठरत असून नोंदींचे सातत्य राखण्यावर भर दिला जात आहे. तसेच स्थलांतर, विवाहानंतर नावातील बदल आणि नोंदीतील त्रुटी दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. प्रशासनाने ४१ वर्षांवरील मतदारांनी जुन्या नोंदींशी, तर १८ ते ४० वयोगटातील मतदारांनी पालक व आजी-आजोबांच्या नोंदींशी मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन केले आहे. यावेळी ॲड. संघनायक मोरे (प्रभारी, बसपा), धनंजय रणखांब (वाशिम विधानसभा प्रमुख / जिल्हा उपाध्यक्ष, भाजप, वाशिम), कैलास खानजोडे (उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार गट) तसेच इतर विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## आजपासून क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले जयंती महोत्सव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त तसेच द्विशताब्दी जयंती वर्षोत्सवानिमित्त वाशिम शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सामाजिक एकता, बंधुभाव आणि प्रबोधनाचा संदेश देणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.



या उत्सवानिमित्त शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता भव्य मोटरसायकल सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक परिसरातून प्रारंभ होऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत फुले स्मारक येथेच रॅलीचा समारोप होणार आहे.

तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनात्मक जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक राणा यवतमाळ हे 'क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांचे समाजकार्य आणि आजची सामाजिक स्थिती' या विषयावर सखोल मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानातून समाजातील विविध घटकांना प्रेरणा मिळणार असून, युवकांना दिशा देणारे विचार मांडले जाणार आहेत.

या जयंती उत्सवाच्या पूर्वसंध्येला शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता भव्य रंगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत महिला, युवक-युवती तसेच विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असून, सामाजिक विषयांवर आधारित कलाकृतींमधून समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात येणार आहे.

तसेच सायंकाळी ६ वाजता प्रबोधनपर भव्य किर्तनाचा कार्यक्रम होत आहे. सत्यपाल महाराज यांचे शिष्य असलेले सप्तखंजेरी वादक युवा प्रबोधनकार पंकजपाल महाराज हे किर्तनातून समतेचा संदेश देणार आहेत. उत्सवातील सर्व कार्यक्रम क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक परिसर, वाशिम येथे पार पडणार आहेत. या माध्यमातून फुले यांच्या विचारांचा प्रसार करत समाजात समता, बंधुभाव आणि शिक्षणाची जाणीव अधिक दृढ करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे गठण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विश्वभूषण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे गठण करण्यात आले असून कार्यकारिणीची घोषणा अध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी केली आहे.

सदर समितीमध्ये सचिव शेषराव धांडे, कार्याध्यक्ष दौलतराव हिवराळे, कोषाध्यक्ष अरविंदकुमार उचित, सहकोषाध्यक्ष रमेश भगत, उपाध्यक्ष सर्वश्री निलेश सोमाणी, वैभव उलेमाले, सोनाजी इंगळे, सहसचिव दिगंबर साबळे, संघटक शेषराव मेश्राम, सहसंघटक जगदिश मानवतकर, माधवराव जमधाडे, सदस्य सर्वश्री प्रेमचंद कांबळे, सुनिल तायडे, बाळासाहेब रोकडे, शालीक वानखेडे, बाळासाहेब लेमले, महादेव कांबळे, राहुल बलखंडे, भाऊराव डोंगरे तर प्रसिध्दी प्रमुखपदी अजय ढवळे, विनोद तायडे, संतोष वानखेडे, संदीप डोंगरे, सुनिल कांबळे, बबनराव खिल्लारे, प्रमोद खडसे, संजय खडसे, विशाल राऊत, पप्पू घुगे, गजानन गवई, दादाराव गायकवाड, दिनेश पठाडे, प्रविण पट्टेबहादुर यांची निवड करण्यात आली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## महामानवाच्या मिरवणुकीतून समतेचा संदेश गेला पाहिजे - एपीआय जितेंद्र अडुळे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्य दि.८ एप्रिल रोजी सायंकाळी ५:३० वाजता दरम्यान स्थानिक शहर पोलीस स्थानकात पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील भीमजयंती मिरवणूक मंडळ अध्यक्ष तथा भिम अनुयायी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला सहाय्यक पोलीस निरीक्षक जितेंद्र अडुळे यांनी उपस्थित समाज बाधवांना मार्गदर्शन केले.सदर बैठीकीला नापोका अश्विन जाधव पो.कॉ. ज्ञानेश्वर घुगे हें उपस्थित होते.

यावेळी जितेंद्र अडुळे पुढे म्हणाले की, महामानवाच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण संदेश देत समाजाला सजग राहण्याचे आवाहन केले आहे. मिरवणूक ही केवळ उत्सवाची परंपरा नसून ती समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे या मिरवणुकीतून समता, बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा ठोस संदेश गेला पाहिजे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.अडुळे यांनी पुढे सांगितले की, महामानवांच्या विचारांचा गाभा हा समतेत आहे. जाती-पाती, भेदभाव आणि अन्याय यांना दूर सारत सर्वांनी एकत्र येणे, हीच खरी जयंती साजरी करण्याची योग्य पद्धत आहे.

**कायदा व सुव्यवस्थेबाबत कडक सूचना**

मिरवणुकीदरम्यान कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, नागरिकांनीही सहकार्य करणे अपेक्षित आहे.

**अफवांवर विश्वास ठेवू नका**

भडकाऊ घोषणांपासून दूर रहा शांततेत व अनुशासनात मिरवणूक पार पाडा असे आवाहनही त्यांनी केले.

**समाजप्रबोधनाचा संदेश महत्त्वाचा**

मिरवणुकीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचार पोहोचवण्याची मोठी संधी असते. त्यामुळे केवळ ढोल-ताशा किंवा दिखाव्यापुरते न राहता, महामानवांच्या विचारांचे आचरण करणे आवश्यक असल्याचे अडुळे यांनी स्पष्ट केले.

**'हीच खरे अभिवादन'**

महामानवांनी दिलेला समतेचा संदेश जनमानसात रुजवणे, सामाजिक सलोखा टिकवणे आणि एकजुटीने पुढे जाणे, हीच त्यांना खरे अभिवादन ठरेल, असे शेवटी अडुळे यांनी नमूद केले.

## १३ एप्रिलला रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाच्या अनुषंगाने दि. १३ एप्रिल २०२६ रोजी वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात रक्तदान शिबिर तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शासनाच्या संबंधित निर्णयानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमात ज्येष्ठ नागरिकांची रक्तदाब, मधुमेह आदी आजारांची मोफत तपासणी करण्यात येणार आहे. याशिवाय रक्तदान शिबिराद्वारे नागरिकांना सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सदर शिबिरासाठी जिल्हा रुग्णालय, वाशिम येथे ब्लड बँकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्यासोबतच गरजू रुग्णांना रक्तपुरवठा सुलभ होण्यास मदत होणार आहे.

## अडोळी येथे दि. ११ ते १४ एप्रिल रोजी भीम जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील अडोळी येथे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर दि. ११ एप्रिल ते १४ एप्रिल यांच्या संयुक्त जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सविस्तर वृत्त असे की, अडोळी येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही महात्मा ज्योतिबा फुले यांची ११ एप्रिल रोजी व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून दि. ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता महात्मा ज्योतिबा व डॉ बाबासाहेब समता सैनिक दल फुले शाहू आंबेडकर ब्लड डोनर व रुग्ण सेवा ग्रुप वाशीम वतीने रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, महात्मा ज्योतिबा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या जीवनावर वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा व विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



यावेळी कार्यक्रमाला सरपंच सविता इढोळे, उपसरपंच भगवान इढोळे, खंडोबा कंट्रक्शनचे संचालक प्रमोद इढोळे, रामेश्वर खंडारे डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, डॉ.निता मापारी, आरोग्य सेवक मारोती इंगळे यांचेसह सर्व ग्रामपंचायत सदस्य यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## महाबीज व्यवस्थापकीय संचालकपदी दिलीप स्वामी

**अकोला :** महाराष्ट्र राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या महाबीज (महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ) या संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा पदभार दिलीप स्वामी यांनी आज स्वीकारला. हा पदभार जिल्हाधिकारी, तथा प्रभारी व्यवस्थापकीय संचालक महाबीज अकोला, श्रीमती वर्षा मीना यांच्या हस्ते औपचारिकरित्या स्वीकारण्यात आला. या प्रसंगी मान्यवर उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम**
**सिव्हिल लाईन वाशिम**

ई-मेल - washim.ee@mahapwd.gov.in | दुरध्वनी क्रं- ०७२५२-२३२३३४

**ई- दर सुचना १ सन २०२६ - २७ (सल्लागार)**

**कामाचे नाव -** कारंजा तालुक्यातील गुरु मंदिर परीसर विकास आराखडा अंतर्गत कामाकरीता वास्तु सल्लागार नेमणेबाबत. अंदाजित प्रकल्प किंमत रु. ५०.५० कोटी

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन सा. बा. विभागात नोंदणीकृत प्रमाणित वास्तुशास्त्रज्ञ किंवा वास्तुशास्त्रीय संस्था यांचे कडुन वरील कामाकरीता सल्लागार दर ऑनलाईन प्रणालीव्दारे मागवित आहेत.

RFP मध्ये नमुद केल्याप्रमाणे सा. बा. विभागामधील खाजगी सल्लागार नेमणुकीचे नोंदणी प्रमाणपत्र व तांत्रिक क्षमता, मनुष्यबळ उपलब्धता व समान प्रकारच्या कामाचा अनुभव इत्यादी RFP मध्ये नमुद अटी व शर्तींची पुर्तता करणारे सल्लागारांकडुन ऑनलाईन दर मागविण्यांत येत आहेत.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक १०.०४.२०२६ ते दिनांक १७.०४.२०२६ पर्यंत डाऊनलोड करता येतील

निविदा पुर्व बैठक मा. अधीक्षक अभियंता सा. बा. मंडळ अकोला यांचे कार्यालयात दि. १५.०४.२०२३ रोजी वेळ १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

निविदा उघडण्याचा दिंनाक - २०.०४. २०२३

https://maharashtra.etenders.in / www.mahapwd.com या संकेतस्थळावर निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. (सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.) कार्यकारी अभियंता, वाशिम कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. २२८३ /सल्ला-१ / निली / २६-२७ दि. ०२.०४.२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम

**(शुभम जोशी)**
**कार्यकारी अभियंता**
**सा. बा. विभाग वाशिम**

**Change In Name**

MY OLD NAME IS **SAHERA BEGUM M. MASIUDDIN** Which now I am Changing as new name **SAHERA BEGUM ALIS ARSHIYA PARVEEN ABDUL HAMEED** hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same **SAHERA BEGUM ALIS ARSHIYA PARVEEN ABDUL HAMEED**

**Sign by**
**SAHERA BEGUM ALIS ARSHIYA PARVEEN ABDUL HAMEED**
R/O Mangal Wari Besh, Shukerwarpeth Road Ward No - 05 Dist. Washim Pin Code - 444505 (M.S) .No.9284499313

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालयात कार्यक्रम संपन्न



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था संचलित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात सामाजिक समता सप्ताहानिमित्त दि.०९ एप्रिल रोजी कार्यक्रम उत्साहात पार पडला. चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष तसेच संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त समान संधी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. विश्वनाथ हिस्सल उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. विश्वनाथ हिस्सल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांच्या विचारांचे महत्त्व पटवून देत समाजातील अनिष्ट प्रथा व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांच्या कार्याचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. गजानन घोंगटे यांनी संत गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून केलेल्या समाजप्रबोधन कार्याचा तसेच स्वच्छतेच्या संदेशाचा उल्लेख केला. कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. जयाप्रभा भगत, प्रा. दीपक भगत, डॉ. सचिन कडू, डॉ. जय कावरे, प्रा. रवी कुटे, प्रा. राधिका सावके, सचिन राणे तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## वाशिममध्ये जागतिक आरोग्य दिन साजरा

### 'विज्ञानाच्या पाठीशी उभे राहा' संदेशासह एचपीव्ही लसीकरणासाठी आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक आरोग्य दिन २०२६ निमित्त वाशिम जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या वतीने 'ह्युमन पॅपिलोमा व्हायरस' (एचपीव्ही) लसीकरणासाठी विशेष आवाहन करण्यात आले. 'आरोग्यासाठी एकत्र, विज्ञानाच्या पाठीशी' (Together for health, stand with science) या संकल्पनेला अनुसरून विज्ञानाधारित प्रतिबंधात्मक उपायांद्वारे तरुण मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून सुरक्षित करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.



भारतातील महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकाचा प्रमुख आजार असून, आता विज्ञानाच्या मदतीने तो टाळणे शक्य झाले आहे. चुकीच्या समजुतींना बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून वाशिम जिल्ह्याला 'गर्भाशय मुखाचा कर्करोगमुक्त' करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे.

विज्ञानाची साथ : लसीकरणाची प्रभावी ढाल जिल्ह्याची आरोग्य रणनीती वैद्यकीय पुराव्यांवर आधारित असून एचपीव्ही लस गर्भाशय मुखाच्या कर्करोगास कारणीभूत ठरणाऱ्या विषाणूंविरुद्ध प्रभावी संरक्षण देते.

सुरक्षितता सिद्ध : ही लस विषाणूच्या तुकड्यांपासून तयार करण्यात आलेली असून ती संसर्ग निर्माण करत नाही. प्रजनन क्षमतेवर किंवा मासिक पाळीवर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.

## 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या ध्येयाने १४ वर्षांची यशस्वी वाटचाल

### दत्तकृपा हॉस्पिटलचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातील रुग्णसेवेचे विश्वासार्ह केंद्र ठरलेल्या दत्तकृपा हॉस्पिटलच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध सामाजिक व गौरवपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना दत्तकृपा हॉस्पिटलचे संचालक, शहरातील नामवंत अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अजय परसराम दहात्रे यांनी 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' या भावनेतून गेल्या १४ वर्षांपासून अखंड सेवा दिल्याचे सांगितले.



त्यांनी नमूद केले की, हॉस्पिटलच्या स्थापनेपासून आजपर्यंत हजारो रुग्णांना परवडणाऱ्या खर्चात, योग्य उपचार आणि उत्तम वैद्यकीय सुविधा देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला गेला आहे. रुग्णसेवा हीच आमची प्राथमिकता होती, आहे आणि भविष्यातही राहणार आहे, असे ठाम प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. डॉ. अजय दहात्रे यांचे प्राथमिक शिक्षण वांरगी, तर माध्यमिक शिक्षण मालेगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी दहावी अनसिंग येथे तर बारावी अमरावती येथे पूर्ण केले. लहानपणापासूनच 'डॉक्टर होऊन समाजातील रुग्णांची सेवा करायची' हा दृढ संकल्प त्यांनी मनाशी बाळगला होता. त्याच जिद्दीच्या बळावर त्यांनी वैद्यकीय शिक्षणाची वाट निवडली. त्यांच्या बुद्धिमत्ता, परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासामुळे पहिल्याच प्रयत्नात त्यांची एमबीबीएससाठी एमजीएम मेडिकल कॉलेज, संभाजीनगर येथे निवड झाली. तेथून त्यांनी एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी लोकमान्य मेडिकल फाउंडेशन, पुणे येथून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून अस्थिरोग तज्ज्ञ म्हणून आपली ओळख निर्माण केली. मुंबईपासून वाशिमपर्यंत वैद्यकीय सेवेचा समृद्ध अनुभव डॉ. अजय दहात्रे यांनी आपल्या वैद्यकीय कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात नायर मेडिकल कॉलेज, मुंबई येथे चार वर्षे सेवा बजावली. त्यानंतर त्यांनी सिव्हिल हॉस्पिटल, वाशिम येथे पाच वर्षे कार्य करत अनेक रुग्णांना दिलासा दिला. या अनुभवाच्या बळावर त्यांनी ५ एप्रिल २०१२ रोजी वाशिम येथे 'दत्तकृपा हॉस्पिटल'ची स्थापना केली. स्वतःचे स्वतंत्र हॉस्पिटल सुरू करून त्यांनी रुग्णसेवेच्या क्षेत्रात एक नवे पर्व सुरू केले.

**कमी खर्चात योग्य उपचार; दत्तकृपा हॉस्पिटलने जिंकला जनतेचा विश्वास**

दत्तकृपा हॉस्पिटल सुरू झाल्यानंतर अत्यल्प काळातच या हॉस्पिटलने उत्तम उपचारपद्धती, सुसज्ज सुविधा, रुग्णांशी आत्मीयतेने वागणूक आणि कमी खर्चात दर्जेदार सेवा या गुणांमुळे सर्वसामान्यांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३३ ■ शुक्रवार, १० एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## जिल्हाधिकारी मॅडम, कापसाच्या आगी थांबणार कधी

दरवर्षी जिनिंग जळते... प्रशासन फक्त पाहत बसते



**वर्धा जनमाध्यम :** कापसाच्या जिनिंगमध्ये लागणाऱ्या आगींचा सिलसिला थांबायचे नाव घेत नाही. दरवर्षी लाखो रुपयांचा कापूस जळून खाक होतो, मात्र प्रशासनाकडून ठोस कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे आता नागरिकांचा प्रश्न जिल्हाधिकारी मॅडम, या आगींकडे लक्ष देणार का?

श्रीकृष्ण जिनिंगमधील ताज्या आगीत तब्बल १३०० क्विंटल कापूस जळून गेला. प्राथमिक कारण म्हणून शॉर्टसर्किट सांगितले जात असले तरी, प्रत्येक वेळी तेच कारण पुढे करून प्रकरण दाबले जाते, अशी भावना नागरिकांत आहे. परिणामी, या आगी अपघात आहेत की नियोजित प्रकार, याबाबत संशय अधिक गडद होत चालला आहे.स्थानिकांचा आरोप आहे की, काही ठिकाणी विमा रक्कम मिळवण्यासाठीच कापूस जळत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. निकृष्ट कापूस जाळून कोट्यवधींचा विमा उकळण्याचा प्रकार होत असेल, तर तो उघडकीस आणणे प्रशासनाची जबाबदारी आहे.

दरम्यान, अग्निसुरक्षा उपाययोजना, विजेची तपासणी, साठवणुकीचे नियम यांची कडक अंमलबजावणी होत नसल्यानेच अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोपही होत आहे. आग लागते, पंचनामा होतो, विमा मिळतो आणि सगळं पुन्हा सुरू या दुष्टचक्राला आता पूर्णविराम देण्याची गरज आहे.

नागरिकांची मागणी स्पष्ट आहे, या सर्व आगींची सखोल चौकशी व्हावी, संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी ठोस यंत्रणा उभी करावी. आता तरी प्रशासन जागं होणार का, की पुढच्या आगीची वाट पाहणार?

# देवळीत बुलडोझरचा धडाका :

# अतिक्रमणावर पालिकेचा हल्लाबोल

## सूचना धाब्यावर बसवणाऱ्यांना जेसीबीचा दणका; पोलिस बंदोबस्तात धडाकेबाज कारवाई

**देवळी जनमाध्यम :** शहराला गुदमरवणाऱ्या अतिक्रमणांवर अखेर देवळी नगर परिषदेने बुलडोझर फिरवत थेट हल्लाबोल केला. गुरुवारी सकाळपासून पोलिसांच्या कडक बंदोबस्तात राबविण्यात आलेल्या या धडाकेबाज मोहिमेमुळे अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले.

मुख्याधिकारी नेहा आकोडे यांच्या नेतृत्वात सुरू झालेल्या या कारवाईत पालिकेचा 'गजराज' थेट रस्त्यावर उतरला. नगर परिषद कार्यालय परिसरातून मोहिमेची सुरुवात करत माध्यमिक शाळा–बसस्थानक परिसर, बसस्थानक ते काळा पूल, ठाकरे मार्केट ते जुने बसस्थानक, वर्धा रोड आणि पुलगाव मार्गावरील अतिक्रमणांवर एकामागोमाग एक कारवाई करण्यात आली. जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण अक्षरशः जमीनदोस्त करण्यात आले.





पालिकेने यापूर्वी अतिक्रमणधारकांना नोटिसा देऊन 'स्वतः अतिक्रमण काढा असा इशारा दिला होता. मात्र, सूचनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने अखेर प्रशासनाने कठोर पवित्रा घेतला. कारवाई सुरू होताच काही अतिक्रमणधारकांनी घाईघाईत स्वतःच आपले अतिक्रमण हटविले, तर काहींना थेट बुलडोझरचा फटका बसला.

अतिक्रमणामुळे शहरातील रस्ते दिवसेंदिवस अरुंद होत होते. वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि नागरिकांच्या जीविताचा प्रश्न निर्माण झाला होता. तरीही संबंधितांकडून कोणतीही दखल घेतली जात नव्हती. त्यामुळेच पालिकेने 'आता नाही तर कधीच नाही' या भूमिकेतून ही कारवाई राबविली.नोटिसा देऊनही प्रतिसाद मिळाला नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कारवाई अपरिहार्य होती, असे स्पष्ट शब्दांत मुख्याधिकारी नेहा आकोडे यांनी सांगितले.

पालिकेच्या या आक्रमक कारवाईमुळे अतिक्रमणधारकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पुढील काही दिवसांत उर्वरित भागातही अशीच मोहीम राबविण्याचे संकेत मिळत आहेत. शहर मोकळे करण्याच्या या कारवाईने नागरिकांमध्ये समाधान, तर अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे.

## उपचारांशी झुंज अपयशी; तीन दिवसांपूर्वीच्या अपघातातील युवकाचा मृत्यू

**सेलू जनमाध्यम :** तीन दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातानंतर जीवन-मृत्यूशी झुंज देणाऱ्या अतुल गजाननराव देवळे (वय ४६) यांची अखेर बुधवारी सायंकाळी प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे सेलू शहरात शोककळा पसरली असून परिसरातील नागरिक हळहळ व्यक्त करत आहेत.

माहितीनुसार, अतुल देवळे हे सेलूहून नागपूरकडे दुचाकीने जात असताना बुट्टीबोरी परिसरात त्यांचा अपघात झाला होता. अपघात इतका गंभीर होता की, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर एम्स हॉस्पिटल येथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतरही अखेर त्यांनी मृत्यूशी झुंज हरली.

# सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आज जिल्ह्यात

**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते आज दि.१० एप्रिल जिल्ह्याच्या दौ-यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.

दि.१० एप्रिल रोजी दुपारी २ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन. दुपारी २.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सामाजिक न्याय विभागाच्या आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ३.३० वाजता महादेवपुरा व नालवाडी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय येथील शासकीय मुलींच्या वसतीगृहाच्या भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ४.३० वाजता वर्धा येथून हिंगणघाट कडे प्रयाण करतील.



सायंकाळी ५.१५ वाजता हिंगणघाट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळाचे लोकार्पण कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ६.१५ वाजता हिंगणघाट येथून संभाजीनगर कडे प्रयाण करतील.

## जंगली वराहाच्या धडकेत जखमीचा मृत्यू

### -आष्टी तालुक्यातील घटना; मुलगा धोक्याबाहेर

**आष्टी शहीद जनमाध्यम :** तालुक्यातील पोरगव्हाण परिसरात जंगली वराहाच्या धडकेत झालेल्या अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सुदाम ठाकरे असे मृताचे नाव असून त्यांचा मुलगा अक्षय ठाकरे जखमी झाला आहे.

माहितीनुसार, सुदाम ठाकरे व त्यांचा मुलगा अक्षय ठाकरे हे दोघे ५ एप्रिल रोजी दुचाकीने आष्टीकडे जात होते. दरम्यान, पोरगव्हाण परिसरात त्यांच्या दुचाकीसमोर अचानक जंगली वराह आल्याने अपघात झाला. वराहाने दिलेल्या धडकेत दोघेही गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर स्थानिकांनी दोघांनाही तातडीने अमरावती येथील रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असताना ८ एप्रिल रोजी सुदाम ठाकरे यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

जखमी अक्षय ठाकरे याची प्रकृती सध्या स्थिर असून तो धोक्याबाहेर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. दरम्यान, ग्रामीण भागात जंगली प्राण्यांचा वाढता वावर चिंतेचा विषय ठरत असून अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी वन विभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# बीएलओ शिक्षकांचा छळ थांबवा, नाहीतर काम बंद

## धमक्या, लुटमार अन् दडपशाही...शिक्षक संतापले, प्रशासनावर हल्लाबोल

### -मतदार यादीच्या नावाखाली शिक्षकांची पिळवणूक

### -जीव धोक्यात घालून काम? बीएलओंनी प्रशासनाला ठणकावले

**वर्धा जनमाध्यम :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एर्इं) मोहिमेत बीएलओ म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांवर प्रशासनाने अक्षरशः अन्यायाचा डोंगर कोसळवला असून, धमक्या, लुटमार आणि दडपशाहीच्या घटनांनी परिस्थिती गंभीर बनली आहे. या पार्श्वभूमीवर प्रहार शिक्षक संघटनेने संतप्त भूमिका घेत प्रशासनाला थेट इशारा दिला आहे, शिक्षकांना वेठीस धरणे तात्काळ थांबवा, अन्यथा बीएलओ कामात सहकार्य करणार नाही,

नागपूर विभाग प्रमुख अजय भोयर यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात प्रशासनाच्या कारभारावर जोरदार टीका करण्यात आली. एर्इं मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणात शिक्षक व कर्मचाऱ्यांची बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली; मात्र त्यांच्या अडचणी, मानसिक ताण आणि सुरक्षेचा प्रश्न पूर्णपणे दुर्लक्षित करण्यात आला आहे. उलट, काम न स्वीकारल्यास गुन्हे दाखल करणे, निलंबन, बडतर्फी अशा कारवायांची भीती दाखवून शिक्षकांना जबरदस्तीने कामाला लावले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, ७ एप्रिल २०२६ रोजी घडलेल्या घटनांनी परिस्थितीची भीषणता उघड केली. एर्इं चे काम करत असताना काही बीएलओंना स्थानिक नागरिकांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या, तर एका बीएलओची थेट लुटमार करण्यात आली. इतकेच नव्हे, तर एका बीएलओला कुत्र्याने चावा घेतल्याची घटना देखील समोर आली आहे. या सर्व प्रकारांमुळे बीएलओंच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, शिक्षकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. सध्या बोर्ड परीक्षा, शालेय परीक्षा, पेपर तपासणी आणि निकाल तयार करण्याची जबाबदारी पार पाडत असताना एर्इं चे अतिरिक्त आणि क्लिष्ट काम शिक्षकांवर लादण्यात आले आहे. २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग करण्याची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असून नागरिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. तरीही प्रशासनाने संपूर्ण जबाबदारी बीएलओंवर टाकत त्यांना दारोदारी भटकण्यास भाग पाडले आहे. जागृती करण्याचे काम प्रशासनाचे असताना शिक्षकांना का छळले जाते असा प्रश्न संघटनेने उपस्थित केला आहे.



### प्रहार शिक्षक संघटनेने स्पष्ट मागण्या मांडल्या आहेत

बीएलओंना तात्काळ पोलीस संरक्षण द्यावे, सुरक्षिततेची हमी घ्यावी, दारोदारी फिरवण्याऐवजी कॅम्पचे आयोजन करावे, तसेच मतदारांना बूथवर येऊन मॅपिंग करण्यासाठी प्रोत्साहित करावे. शिक्षकांना वेठीस धरण्याची ही पद्धत त्वरित थांबवावी, अन्यथा संघटना आक्रमक भूमिका घेईल, असा इशारा देण्यात आला आहे.

शिक्षक हा शिक्षणाचा कणा आहे, त्याला गुन्हेगारासारखे वागवले जात असेल तर ही लोकशाहीसाठी लाजिरवाणी बाब आहे, असा संतापही व्यक्त करण्यात आला. या वेळी कुंडलिक राठोड, धनराज कावटे, पुरुषोत्तम शेकार, अजय सावरकर, अमोल वाशिमकर, नितीन वाघ, रहीम शहा, प्रवीण वास्कर, संतोष महाजन, संध्या करमणकर, संजय घोडखांदे आदींसह मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वर्ध्यात 'समता पर्व'; धावणार विचारांची दौड

**वर्धा जनमाध्यम :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वर्धा शहरात यंदा केवळ उत्सव नाही, तर सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेणारा 'समता पर्व' साजरा होत आहे. समता दौड, रोजगार मेळावा, स्टार्टअप मार्गदर्शन आणि बुद्ध-भीम गीतांच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न आयोजकांनी केला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राजेश खडसे यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, डिजे आणि बॅण्डच्या गजरात नव्हे, तर विचारांच्या प्रकाशात जयंती साजरी व्हावी, हा आमचा उद्देश आहे. आम्ही सर्वप्रथम आणि शेवटपर्यंत भारतीय आहोत. ही यंदाची थीम ठेवण्यात आली आहे.

११ एप्रिल रोजी महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पहाटे ६ वाजता डॉ. आंबेडकर चौकातून 'समता दौड'ला प्रारंभ होईल. गांधी पुतळा, सर्किट हाऊस, नालवाडी, धुनिवाले मठ, आर्वी नाका, शिवाजी चौक, पोलिस ठाणे असा मार्गक्रमण करत दौड पुन्हा आंबेडकर चौकातच समाप्त होईल. खुला गट (१० किमी), ज्येष्ठ गट (५ किमी) आणि बालगट (३ किमी) अशा तीन गटांत ही स्पर्धा होणार असून १५०० ते २००० युवक-युवतींचा सहभाग अपेक्षित आहे. विजेत्यांसाठी ५० हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. याच दिवशी प्रबोधनात्मक व्याख्यान आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीही असेल. १२ एप्रिल रोजी आयोजित रोजगार मेळाव्यात आयटी, बँकिंग, इन्शुरन्स क्षेत्रातील सुमारे ३५ कंपन्या सहभागी होणार असून ७०० ते ८०० युवकांनी आतापर्यंत नोंदणी केली आहे. नोकरी न मिळालेल्यांसाठी स्किल डेव्हलपमेंट मार्गदर्शनही देण्यात येणार आहे. १३ एप्रिल रोजी स्टार्टअप मार्गदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असेल, तर १४ एप्रिल रोजी पहाटेपासूनच भीम जयंतीचा उत्सव भावनांच्या उंचीवर पोहोचेल. विविध प्रबोधनपर कार्यक्रम, भीमगीतांचा गजर आणि मान्यवरांच्या उपस्थितीत समतेचा संदेश पुन्हा एकदा जनमानसात रुजवला जाणार आहे. या उपक्रमातून 'विचारांची जयंती' साजरी करताना समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येत आहे.




# वर्ध्यात वसतीगृहांचा पाया; आज संजय शिरसाट यांच्या हस्ते भूमीपूजन

## -महादेवपुरा-नालवाडी येथे मुलींसाठी नवीन इमारती; दुपारी आढावा बैठकीचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील विद्यार्थिनींसाठी महत्त्वाचा ठरणारा शासकीय वसतीगृह प्रकल्प आज मार्गी लागणार असून राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते महादेवपुरा व नालवाडी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींच्या वसतीगृहाच्या नवीन इमारतींचे भूमीपूजन होणार आहे. हा कार्यक्रम १० एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता पार पडणार आहे.

या कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, नगर विकास, परिवहन व सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार अमर काळे, तसेच आमदार दादाराव केचे, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, समीर कुणावार, राजेश बकाने, सुमित वानखेडे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. याशिवाय नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी. आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण हेही उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, याच दिवशी दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृह क्रमांक २ येथे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली समाज कल्याण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. नवीन वसतीगृह इमारतीमुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थिनींना राहण्याची सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार असून शिक्षणासाठी मोठा आधार मिळणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी आणि सहाय्यक आयुक्त अंकेश केदार यांनी केले आहे.

# कृषी विभागाचा 'कागदी' पराक्रम

## -नाल्याचे खोलीकरण न करताच आमदारांची दिशाभूल

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील हेलोडी-हिवरा शिवारात विकासकामांच्या नावाखाली कृषी विभागाने चक्क 'लोणकढी' थाप मारल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. १ हजार फूट लांब नाल्याचे खोलीकरण केल्याचा दावा करणाऱ्या कृषी विभागाने प्रत्यक्षात २० फूटही काम केले नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. विशेष म्हणजे, या मुजोर अधिकाऱ्यांनी चक्क स्थानिक आमदार समीर कुणावार यांनाही चुकीची माहिती देऊन त्यांची दिशाभूल केल्याने प्रशासकीय वर्तुळात संताप व्यक्त केला जात आहे.

हेलोडी शिवारातील हा नाला पावसाळ्यात परिसरातील शेतकऱ्यांसाठी मोठा शाप ठरतो. पावसाचे पाणी शेतात शिरून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने, या नाल्याचे खोलीकरण करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी सहा महिन्यांपूर्वी लेखी निवेदनाद्वारे केली होती. मात्र, यावर उपाययोजना करण्याऐवजी तालुका कृषी अधिकारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कागदोपत्री घोडे नाचवत काम पूर्ण झाल्याचा अहवाल वरिष्ठांना सादर केला.

भ्रष्टाचाराचा कळस म्हणजे, या अधिकाऱ्यांनी संगणमत करून हे काम पूर्ण झाल्याचा खोटा अहवाल आमदार समीर कुणावार यांनाही पाठवला. लोकप्रतिनिधींना अंधारात ठेवून आपली पाठ थोपटून घेण्याचा हा प्रयत्न शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे उघडकीस आला आहे.

६ एप्रिल रोजी श्रीराम कुरसंगे, देवाजी धुर्वे यांच्यासह अर्धा डझन शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता, तिथे साधे २० फूटही खोलीकरण झाले नसल्याचे दिसून आले. कृषी विभागाने केवळ कागदावरच नाला खोल केला, प्रत्यक्षात जमिनीवर परिस्थिती जैसे थे आहे, असे गाऱ्हाणे कुरसंगे यांनी मांडले आहे.

या बोगस कामाचा पर्दाफाश करण्यासाठी शेतकऱ्यांनी आता जिल्हा कृषी अधीक्षकांकडे धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली आहे. या फसवणुकीत सहभागी असलेल्या सर्व दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी आणि येत्या एक महिन्याच्या आत यंत्राद्वारे प्रत्यक्ष नाल्याचे खोलीकरण करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

-थोडक्यात महत्त्वाचे:

-१ हजार फूट नाल्याचे खोलीकरण पूर्ण झाले असे सांगण्यात येत आहे. वास्तविक

-साधे २० फूटही काम झाले नाही अशी ओरड आहे.

-तालुका कृषी अधिकारी व संबंधित कर्मचारी या दोषींवर निलंबनाची कारवाई व तातडीने प्रत्यक्ष काम सुरू करण्याची गरज असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी RIAJKHAN IBRAHIMKHA PATHAN असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील RIYAJ KHAN IBRAHIM KHAN PATHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- स्टेशन फैल वर्धा ४४२००१**

# इतिहास घडविणा-या खेळाडूंच्या आठवणी जपण्याचा उपक्रम अभिनव-मुख्यमंत्री







## वानखेडे स्टेडियमवरील स्टँड व गेटच्या नामकरण सोहळ्यात क्रिकेट दिग्गजांचा मुख्यमंत्र्यांकडून गौरव













**मुंबई/प्रतिनिधी :** ज्या खेळाडूंनी इतिहास घडवला, त्यांच्या आठवणी कायम जिवंत ठेवण्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने आपल्या आयकॉनिक खेळाडूंच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी घेतलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.वानखेडे स्टेडियमसारख्या ऐतिहासिक ठिकाणीच अशा प्रकारचा सन्मान सर्वोत्तम पद्धतीने होउ शकतो, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वानखेडे स्टेडियमवर एकनाथ सोलकर गेट, डायना एडुलजी गेट आणि दिलीप सरदेसाई गेट असे नामकरण तर रवी शास्त्री स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड.आशिष शेलार, क्रिकेटपटू सुनील गावसकर, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री, डायना एडुलजी, सूर्यकुमार यादव तसेच मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, उपाध्यक्ष जितेंद्र आव्हाड, उन्मेष खानविलकर, अरमान मलिक, अभिनेता जॅकी श्रॉफ आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, एकनाथ सोलकर, दिलीप सरदेसाई, डायना एडुलजी आणि रवी शास्त्री यांसारख्या दिग्गजांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. सुनील गावस्कर यांनी हेल्मेटशिवाय वेगवान गोलंदाजांचा निर्भीडपणे सामना करत भारतीय क्रिकेटला नवी दिशा दिली. दिलीप वेंगसरकर यांनी कठीण प्रसंगी संघ सावरण्याची भूमिका निभावली,असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

एकनाथ सोलकर यांच्या अफाट क्षेत्ररक्षण कौशल्याचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळातही त्यांची फील्डिंग अद्वितीय ठरली असती. तसेच दिलीप सरदेसाई यांच्या परदेशातील कामगिरीमुळे भारतीय क्रिकेटला नवे स्थान मिळाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महिला क्रिकेटच्या क्षेत्रात डायना एडुलजी यांच्या योगदानाची दखल घेत, त्यांनी महिलांच्या क्रिकेटमध्ये झालेल्या प्रगतीचे कौतुक केले. तसेच रवी शास्त्री यांच्या अष्टपैलू कामगिरीचा उल्लेख करत त्यांच्या खेळाडू, प्रशिक्षक आणि समालोचक म्हणूनच्या भूमिकेचेही त्यांनी कौतुक केले.आधुनिक क्रिकेटमधील स्टार खेळाडू सूर्यकुमार यादव यांच्या अभिनव फलंदाजी शैलीचे विशेष कौतुक करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ३६० डिग्री खेळ करणारे सूर्यकुमार यादव हे मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे मुंबईचा गौरव वाढला आहे.मुंबईतील क्रिकेट पायाभूत सुविधांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, शहरातील छोट्या मैदानांचे संवर्धन आणि जुन्या लीजसंदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. वीस- वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्नही आम्ही सोडवू, असे ते म्हणाले. मुंबईत अत्याधुनिक आणि मोठ्या स्टेडियमच्या उभारणीसाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ही अंदाजे ६० ते ८० हजार प्रेक्षक क्षमतेचे हे स्टेडियम असेल. उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी आणि कोणत्याही जागेवरून उत्तम दृश्य मिळेल, अशा पद्धतीने ते उभारले जाईल,असे त्यांनी सांगितले.

तथापि, कितीही नवी स्टेडियम्स उभारली, तरी वानखेडे स्टेडियमचे महत्त्व कायम राहील. वानखेडे हे सदैव आयकानिकच राहील, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनला सर्वतोपरी पाठबळ देण्याची ग्वाही दिली.

**महान खेळाडूंना योग्य सन्मान - सांस्कृतिक कार्य मंत्री** आशिष शेलार

मुंबई क्रिकेटच्या वैभवशाली परंपरेचा गौरव करणारा आजचा दिवस सुवर्णक्षण ठरला असून, या माध्यमातून महान खेळाडूंना योग्य सन्मान देण्याचे कार्य पार पडले, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अड. आशिष शेलार यांनी केले. सांस्कृतिक कार्य मंत्री शेलार म्हणाले की, मुंबई क्रिकेटने जगाला उत्कृष्ट खेळाडू दिले असून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची ही योग्य वेळ आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून क्रिकेट क्षेत्रातील दिग्गजांच्या योगदानाची नोंद इतिहासात कोरली जात असून हा क्षण अभिमानास्पद आहे. महिला क्रिकेटला उंचीवर नेण्यात डायना एडुलजी यांचे योगदान उल्लेखनीय असून त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही देशाचे नाव उज्ज्वल केले. तसेच दिलीप सरदेसाई यांना जनरेशन टुगेदर क्रिकेट लिजेंड संबोधत त्यांच्या खेळाची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. एकनाथ सोलकर यांच्या चपळ क्षेत्ररक्षणाचे उदाहरण देत शेलार यांनी त्यांच्या प्रामाणिक आणि प्रेरणादायी आयुष्याचा गौरव केला. तसेच रवी शास्त्री यांना चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स म्हणत त्यांच्या नावाने स्टँडला नामकरण करणे उचितच असल्याचे त्यांनी नमूद केले.मुंबईच्या खेळाडूंनी वानखेडे मैदानावर अनेक विक्रम प्रस्थापित करत जागतिक क्रिकेटला दिशा दिली आहे. सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर आणि रवी शास्त्री यांच्या भागीदारी आजही प्रेरणादायी असून त्यांचे विक्रम अजूनही अबाधित आहेत, असेही मंत्री शेलार यांनी सांगितले.

# नीच कृत्य करणा-यांना जात-धर्म नसतो-संजय राउत

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणात 'लव्ह जिहाद' हा शब्द गेल्या काही काळापासून सातत्याने चर्चेत आहे. सत्ताधारी महायुतीतील अनेक नेत्यांनी या मुद्द्यावरून विशिष्ट समुदायाला लक्ष्य केले असताना, शिवसेनेचे (ठाकरे गट) ज्येष्ठ नेते आणि खासदार संजय राउत यांनी या व्याख्येला एक नवीन वळण दिले आहे. नीच कृत्य करणा-यांना जात आणि धर्म नसतो, लव्ह जिहाद हा शब्द सर्वांना लागू होतो, असे विधान करत त्यांनी गुन्हेगारीला धर्माच्या चष्म्यातून न पाहण्याचे आवाहन केले आहे. संजय राउत यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा राज्यात महिलांवरील अत्याचार आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अनेकदा जेव्हा एखादा गुन्हा आंतरधर्मीय असतो, तेव्हा त्याला 'लव्ह जिहाद'चे स्वरूप दिले जाते. मात्र, संजय राउतांच्या मते, एखादी व्यक्ती महिलेची फसवणूक करत असेल किंवा तिचा छळ करत असेल, तर त्या कृत्याला कोणत्याही धर्माचे कवच देता कामा नये. गुन्हेगार हा केवळ गुन्हेगार असतो, त्याची जात किंवा धर्म पाहून त्याचे कृत्य कमी किंवा जास्त भयानक ठरत नाही.




संजय राउत यांनी 'लव्ह जिहाद'च्या मुद्द्यावरून सत्ताधारी भाजप आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांवर गंभीर आरोप केले आहेत. राउत यांच्या विधानाचा मुख्य रोख हा होता की, निवडणुका जवळ आल्या की जाणीवपूर्वक असे मुद्दे समोर आणले जातात.

संजय राउत यांच्या मते, लव्ह जिहाद किंवा तत्सम मुद्दे हे केवळ लोकांचे लक्ष मूळ प्रश्नांवरून भरकटवण्यासाठी काढले जातात. जेव्हा जेव्हा निवडणुका येतात, तेव्हा हिंदू-मुस्लिम हा वाद उकरून काढला जातो, असा आरोप त्यांनी केला.

**प्रशासनाचे अपयश:** खरोखरच अशा काही घटना घडत असतील, तर गृहखाते काय करत आहे? असा सवाल त्यांनी विचारला. महाराष्ट्रात सध्या 'डबल इंजिन' सरकार आहे, मग तरीही हिंदूंना रस्त्यावर उतरून मोर्चे का काढावे लागत आहेत, असा चिमटा त्यांनी काढला.

**'लव्ह जिहाद'ची व्याप्ती वाढवण्याचा प्रयत्न?**-संजय राउत यांनी आपल्या विधानातून 'लव्ह जिहाद' या शब्दाची व्याख्या अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यानुसार, केवळ एका विशिष्ट धर्मापुरता हा शब्द मर्यादित ठेवणे चुकीचे आहे. कोणत्याही धर्माचा पुरुष दुस-या धर्माच्या किंवा स्वत?च्याच धर्माच्या महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करत असेल, तर ते 'नीच कृत्य' आहे. अशा फसवणुकीला 'लव्ह जिहाद' म्हणायचे असेल, तर ते सर्वच धर्मातील अशा प्रवृत्तींना लागू झाले पाहिजे.

**गुन्हेगाराला 'जात-धर्म' नसतो...** एखादी अमानुष घटना घडते (उदा. श्रद्धा वालकर हत्याकांड किंवा अलीकडील कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना), तेव्हा समाजाने त्याकडे माणुसकीच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. गुन्हेगाराला धर्माच्या आधारे संरक्षण देणे किंवा एखाद्या समुदायाला त्यावरून बदनाम करणे, हे राजकारण असू शकते, पण न्याय नाही. 'ज्यावेळी हात रक्ताने माखलेले असतात, त्यावेळी त्या रक्ताचा कोणताही धर्म नसतो, असेही संजय राउत यांनी स्पष्ट केले आहे.

**नाशिकमधील तणावाचे कारण काय?-** नाशिकमध्ये एका विशिष्ट घटनेनंतर हिंदू संघटना आक्रमक झाल्या होत्या. एका हिंदू मुलीच्या संदर्भातील प्रकरणाला 'लव्ह जिहाद'चे स्वरूप असल्याचा दावा करत सकल हिंदू समाजाच्या वतीने मोठा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चा दरम्यान काही ठिकाणी घोषणाबाजी आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे नाशिकमध्ये काही काळ बंद पाळण्यात आला होता.

**हिंदू संघटनांची भूमिका-** दुसरीकडे, हिंदू संघटनांचे म्हणणे आहे की हा केवळ राजकीय मुद्दा नसून हिंदू मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून हिंदू समाजाला लक्ष्य केले जात आहे आणि त्यासाठी विशेष कायदा महाराष्ट्रात लागू करावा, अशी त्यांची मागणी आहे. संजय राउत यांच्या या विधानामुळे आगामी महापालिका आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये 'हिंदुत्व' विरुद्ध 'प्रगतीशील राजकारण' असा सामना पाहायला मिळू शकतो. राउत यांनी सातत्याने भाजपच्या 'हिंदुत्वा'ला 'निवडणुकीचे हिंदुत्व' म्हणून संबोधले आहे.

# गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी कटिबद्ध-मुख्यमंत्री

## नारळी सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न

**बीड/प्रतिनिधी :** म्हसोबावाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथे पार पडलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या ९४ व्या नारळी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली भूमिका मांडली, मी येथे मुख्यमंत्री म्हणून नाही, तर गहिनीनाथ महाराजांचा अनुयायी म्हणून नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. गडाच्या विकासासाठी रस्ता असो वा अन्य कोणताही प्रश्न, तो सोडविण्यास मी कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. संत वामनभाउ महाराज यांनी सुरू केलेल्या या परंपरेचा समारोप गुरु वारी (दि. ९) काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी गहिनीनाथ गडाचे विठ्ठल महाराज, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार धनंजय मुंडे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, प्रताप ढाकणे, सरपंच शिवा शेकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संत वामनभाउ यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. नाथ संप्रदायात गहिनीनाथांचे महात्म्य मोठे असून, या गडावर प्रत्येक काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडते, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे. विशेष म्हणजे, या नारळी सप्ताहाचे नियोजन २०३९ पर्यंत निश्चित झाले आहेत यातच या भक्तीकार्याचे यश दिसते .समाजाला एकत्र आणण्याचे हे काम अतिशय मोलाचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह कायमस्वरूपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यजमानपदाखाली व्हावा व त्यांनी गडाचे पालकत्व घ्यावे, दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या विचारांवर आपण काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार धनंजय मुंडे म्हणाले की, संत वामनभाउ यांनी सुरू केलेला हा सप्ताह आज महंत विठ्ठल महाराज यांच्या जन्मगावी होत आहे, हा योगायोग विशेष आहे. दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी नगर-बीड महामार्गाच्या कामासाठी भरीव निधीची मागणी करत, या रस्त्यावर होणारे अपघात रोखण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. नारळी सप्ताह कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी झाली होती.



# आमचे हात अजूनही ट्रिगरवरच

## खवळलेल्या इराणची इस्रायला खुली धमकी; लेबनाननंतर आक्रमक

**तेहरान :** इराण आपल्या लेबनानी बंधू आणि भगिनींना कधीही एकटे सोडणार नाही असे सांगत इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी इस्रायलला हल्ले करण्याची खुली धमकी दिली आहे. इस्रायलने शस्त्रसंधी झाल्यानंतर लेबनानमध्ये हल्ले केले. ज्यात २०० पेक्षा जास्त लोक मारले गेले आहेत. त्यानंतर इराणने इस्रायलविरोधात आक्रमक झाला आहे.इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी हिजबुल्लाहवरील हल्ले सुरूच ठेवणार असल्याचे सांगत लेबनानला लक्ष्य केले जाणार असल्याचे विधान केले. त्यानंतर इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी इस्रायला युद्धासाठी तयार असल्याचे सांगत दंड थोपटले. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी एक पोस्ट करत म्हटले की लेबनानविरुद्ध ज्यूवादी सरकारने नव्याने घेतलेली आक्रमक भूमिका युद्धविरामाचे पूर्णपणे उल्लंघन करणारी आहे. हे असे करणे म्हणजे एकप्रकारे फसवणूक आणि शस्त्रसंधीचे पालन न करण्याचेच संकेत देतात आणि यामुळे ज्या वाटाघाटी झाल्या आहेत, त्या निरर्थक ठरतात. पण, आमचा हात ट्रिगरवरच आहे. इराण आपल्या लेबनानी भाउ आणि बहि-णींना एकट सोडणार नाही असे इराणचे राष्ट्राध्यक्ष म्हणाले आहेत. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी लेबनानमधील हल्ल्यांबद्दल बोलताना सांगितले की, हिजबुल्लाहवर आम्ही पूर्ण शक्तीने, अचूक आणि निर्धाराने हल्ले करणे सुरूच ठेवले आहेत. बेरुतमध्ये आम्ही अली युसूफ खर्शी याला ठार केले आहे, हा हिजबुल्लाह दहशतवादी संघटनेचा सरचिटणीस नईम कासिम याचा खासगी सचिव आणि त्याच्या अत्यंत जवळच्या माणसांपैकी एक होता.



# मोदींच्या हत्येचा कट, तिघांना अटक

**बक्सर-** पंतप्रधान कार्यालय शी संबंधित संवेदनशील माहिती लीक केल्याप्रकरणी आणि त्याबदल्यात परदेशातून पैसे मागितल्याच्या प्रकरणात बक्सर पोलिसांनी मोठा खुलासा केला आहे. डुमराव उपविभागातील सिमरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आशा पडरी गावात बुधवारी रात्री उशिरा छापा टाकून एका तरुणासह ३ जणांना अटक करण्यात आली आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी परदेशात बसलेल्या संशयित लोकांशी संपर्क साधून केवळ गोपनीय माहिती शेअर करण्याबद्दलच बोलले नाही, तर २२ दिवसांच्या आत पंतप्रधानांवर हल्ला करण्याची आणि सुरक्षेत घुसखोरी करण्याची योजनाही आखली होती. प्रकरणाची माहिती मिळताच बक्सरचे एसपी शुभम आर्य यांच्या निर्देशानुसार विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने तात्काळ कारवाई करत आशा पडरी गावात छापा टाकला आणि तिन्ही आरोपींना अटक केली.



# इस्त्रायलच्या माजी लष्करप्रमुखांचा फोन हॅक, फोटो-व्हिडिओ लीक

## इराणी हॅकर्सनी कौटुंबिक फोटो आणि गुप्त बैठकांचे फोटो व्हायरल केले









लेबनॉनमधील बेरूतच्या दक्षिण भागात बुधवारी इस्त्रायली हल्ल्यांनंतर एक व्यक्ती तुटलेल्या इमारतीकडे पाहताना.

**तेल अवीव/तेहरान/ वॉशिंग्टन डीसी/वृत्तसंस्था :** इराणशी संबंधित असलेल्या 'हंडाला' हॅकर गटाने इस्त्रायलचे माजी लष्करप्रमुख हर्झी हालेवी यांचा फोन आणि इतर उपकरणे हॅक केल्याचा दावा केला आहे. हॅकर गटाचे म्हणणे आहे की, त्यांनी अनेक वर्षांपासून गुप्तपणे त्यांच्या सिस्टीममध्ये घुसखोरी करून हजारो फोटो आणि व्हिडिओ गोळा केले. या काळात, त्यांना इस्त्रायलच्या गुप्त बैठका, लष्करी तळ आणि इतर महत्त्वपूर्ण अंतर्गत माहितीमध्ये प्रवेश मिळाला.या गटाने काही फोटो आणि व्हिडिओ प्रसिद्ध केले आहेत. यामध्ये हालेवी विविध लष्करी तळांना भेट देताना, बैठका घेताना आणि अधिका-यांशी बोलताना दिसत आहेत. यातील काही छायाचित्रे त्यांच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित आहेत, ज्यात कौटुंबिक फोटो आणि ओळखपत्रांचा समावेश आहे. या उघड झालेल्या माहितीमुळे जार्डन आणि कतारमधील बैठकांसारख्या काही बैठका समोर आल्या आहेत, ज्या यापूर्वी जनतेला अज्ञात होत्या. तथापि, या प्रकरणी इस्त्रायली लष्कर किंवा हालेवी यांच्याकडून कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नाही.

**लेबनॉनमध्ये इस्त्रायली हल्ल्यांमध्ये एकाच दिवसात २५४ जणांचा मृत्यू**

इस्त्रायली सैन्याने बुधवारी लेबनानवर शेकडो क्षेपणास्त्रे डागली, ज्यात २५४ लोकांचा मृत्यू झाला. लेबनानच्या नागरी संरक्षण संस्थेनुसार, या हवाई हल्ल्यात किमान १,१६५ लोक जखमी झाले आहेत. देशात राष्ट्रीय शोक जाहीर करण्यात आला आहे.हे हल्ले बेरूत, बेका खोरे, माउंट लेबनान, सिडान आणि दक्षिण लेबनानमधील अनेक गावांवर करण्यात आले. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा झाली त्याच दिवशी हे हल्ले झाले.इस्त्रायली सैन्याने म्हटले आहे की, २ मार्च रोजी नवीन लष्करी कारवाई सुरू झाल्यापासून लेबनानवरील हा सर्वात मोठा हल्ला होता. सैन्याच्या म्हणण्यानुसार, हिजबुल्लाहची १०० हून अधिक कमांड सेंटर्स आणि लष्करी तळ लक्ष्य करण्यात आले होते. इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटले आहे की, लेबनान अमेरिका-इराण युद्धविरामाचा भाग नाही. दरम्यान, मध्यस्थ पाकिस्तानने म्हटले आहे की, लेबनानचा युद्धविरामात समावेश आहे. दुसरीकडे, अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प म्हणाले की, लेबनान या करारापासून वेगळे असून त्याचा भाग नाही.

# युद्धविराम झाला, पण 'होर्मुझ' अद्याप बंदच?

## ◆ दिवसाला फक्त १५ जहाजांना परवानगी ◆

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराणमध्यु युद्धविराम होउन देखील होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक सुरळीत झाल्याचे चित्र नाही. युद्धविरामानंतरही होर्मुझच्या सामुद्रधुनीतील सागरी वाहतूक जवळजवळ ठप्प होती. दररोज १५ पेक्षा जास्त जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी देणार नसल्याचे इराणच्या मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे तर, जहाजांना सामुद्रधुनी ओलांडण्यासाठी लष्कराची परवानगी घ्यावी लागणार आहे. यामुळे ज्या अटीवर युद्धविराम झाला ती होर्मुझ सामुद्रधुनी खरचं खुली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दिवसाला केवळ १५ जहाजांना परवानगी-रॉयटर्स या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, युद्धविराम झाल्यानंतर गेल्या २४ तासांत एक तेलाचे जहाज, पाच ड्राय बल्क कॅरिअर गुरुवारी होर्मुझमधून बाहेर पडले आहेत. दोन इराणी टँकर देखील सामुद्रधुनीतून बाहेर आले, असे रॉयटर्सने म्हटले आहे. दरम्यान, इराण केवळ १५ जहाजांनाच होर्मुझमधू बाहेर पडण्याची परवानगी देत आहे, असे वृत्त रशियाच्या टास (TASS) या वृत्तसंस्थेने इराणी अधिका-यांच्या हवाल्याने प्रसिद्ध केले आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## तात्पुरता युद्धविराम?

मध्यपूर्वेत ४० दिवसांपासून सुरू असणाऱ्या युद्धाने दोन आठवड्यांसाठी विराम घेतल्याची अमेरिकन राष्ट्राध्यक्षांची घोषणा संपूर्ण जगासाठी सुटकेचा निःश्वास टाकणारी ठरली आहे.युद्धविराम म्हणजे दोन किंवा संघर्षात असलेल्या पक्षांनी एकमेकांविरुद्धची सशस्त्र कारवाई निश्चित काळासाठी थांबवण्याचा घेतलेला निर्णय. हा युद्धाचा शेवट नसून, तो केवळ शांततेच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असते. युद्धविरामाचे प्रामुख्याने दोन प्रकार असतात. एक तात्पुरता आणि दुसरा दीर्घकालीन. पहिल्या प्रकारात मानवतावादी दृष्टिकोनातून किंवा विशिष्ट वाटाघाटीसाठी काही तासांचा किंवा दिवसांचा अवधी दिला जातो, तर दुसऱ्याचा उद्देश कायमस्वरूपी शांतता करार करणे हा असतो. आखातातील युद्धविराम हा पहिल्या प्रकारातील आहे. अनपेक्षितरीत्या घडलेल्या या घडामोडीला अनेक पैलू असून ते गुंतागुंतीचे आहेत. ट्रम्प यांनी या युद्धविरामाचे वर्णन 'लष्करी विजय' असे करत आम्ही आमची सर्व लष्करी उद्दिष्टे साध्य केली, असे म्हटले आहे; पण अमेरिकेला या युद्धातून खरोखरीच काय मिळाले, हे कळावयास मार्ग नाही. उलट प्रचंड मारा करूनही इवलासा वाटणारा इराण आपल्या टाचेखाली घेणे शक्य होत नाही, हे लक्षात आल्यापासून अमेरिकेकडूनच युद्धबंदीसंदर्भात पावले टाकण्यास सुरुवात झाली.इराणने होर्मुझची सामुद्रधुनी रोखून धरल्यामुळे अमेरिका, इस्रायल आणि त्यांच्या मित्र देशांची स्थिती नाक दाबल्यासारखी झाली. अमेरिकेत महागाईचा भडका उडून नागरी असंतोष वाढला. आखातातील अमेरिकेचे तेल उत्पादक मित्र देशही निर्यात प्रभावित झाल्यामुळे आर्थिक संकटात सापडले. त्यामुळे काहीही करून या युद्धातून बाहेर पडण्याचे ट्रम्प यांचे प्रयत्न सुरू होते. इस्रायल मात्र 'आर या पार'ची लढाई लढण्यावर ठाम होता. यावरून ट्रम्प आणि नेतान्याहू यांच्यामध्ये मतभेदही निर्माण झाले. इराण या संघर्षात निकराने लढलाच नाही, तर अमेरिका आणि त्यांचे सत्ताधीश कसे कात्रीत सापडले आहेत, हे त्याने पदोपदी जगाला दाखवून दिले. युद्धविरामासंदर्भातही अमेरिकेचा १५ कलमी प्रस्ताव झुगारून लावत इराणने आपला स्वतःचा दहा कलमी प्रस्ताव पुढे केला होता; पण अखेरीस दोन्हीचा सुवर्णमध्य काढत या संघर्षाचे सूप वाजले, हे बरेच झाले. पाकिस्तानच्या विनंतीवरून आपण दोन आठवडे बॉम्बफेक थांबवत असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले असले आणि याबाबत तेथील शासनासह लष्कराचे आभार मानले असले, तरी हा एका सुनियोजित खेळीचा भाग असावा, असे मानण्यास जागा आहे.पहिल्या कार्यकाळात पाकिस्तानची आर्थिक मदत रोखणाऱ्या ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासूनच भारतावर जमेल त्या व्यासपीठावरून टीका करण्याचे आणि पाकला चुचकारण्याचे नॅरेटिव्ह पुढे नेले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर झालेला संघर्ष आपणच थांबवल्याचा खोटा उल्लेख शंभराहून अधिक वेळा त्यांनी केला. भारताकडून व्यापार किंवा संरक्षण करारांमध्ये सवलती हव्या असतात, तेव्हा अमेरिका पाकला कवटाळते, हा इतिहास आहे. तो लक्षात घेता इराण युद्धामध्ये पाकला मध्यस्थीसाठी पुढे आणणे ही ट्रम्प यांची चाल आहे, असे ठामपणाने म्हणता येते. अन्यथा, इराणने पाकिस्तानवर आपला विश्वास नसून भारत आमचा मित्र देश आहे, हे जाहीरपणे सांगितले होते, तरीही ट्रम्प यांनी या युद्धविरामाचे श्रेय पाकिस्तानला दिले. भारताने अशाप्रकारच्या दलालीस आधीच नकार दिला होता. तसेच कोणाच्या कोंबड्याने सूर्य उगवतो, हे महत्त्वाचे नसल्याने भारताने या युद्धबंदीचे स्वागत केले आहे. आता प्रश्न आहे, ही तात्पुरती युद्धबंदी टिकणार का आणि पुढील शांततेचे काय? दोन आठवड्यांचा कालावधी दोन्ही देशांना युद्धाच्या उंबरठ्यावरून मागे सरकण्याची आणि चर्चा करण्याची संधी देणारा आहे.ट्रम्प यांनी इराणच्या पायाभूत सुविधांवर विशेषतः वीज प्रकल्प आणि पुलांवर हल्ला करण्याची धमकी तूर्तास मागे घेतली आहे. त्या बदल्यात इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेची बंदिस्त होऊ लागलेली चाके वेगाने धावण्यास मदत होईल. या काळात दोन्ही देशांना एका ठोस शांतता करारावर पोहोचायचे आहे; मात्र यात अनेक अडथळे आहेत. इराणने युद्धादरम्यान झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबरोबरच देशावरील सर्व निर्बंध त्वरित उठवावेत, गोठवलेली इराणी मालमत्ता मुक्त करावी यांसह अमेरिकन सैन्य संपूर्ण क्षेत्रातून माघारी न्यावे, अशी मागणी केली आहे. ट्रम्प यांना ही मागणी पूर्ण करणे कठीण ठरणार आहे. सैन्य माघार घेतल्यास आखातातील अमेरिकेचा लष्करी प्रभावच संपुष्टात येणार आहे. दुसरीकडे, क्षेपणास्त्र कार्यक्रम मर्यादित करणे आणि आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या देखरेखीखाली राहणे हा प्रस्ताव दोन आठवड्यांपूर्वीच इराणने फेटाळून लावला होता. आता अमेरिकेने आपल्या मागण्यांची पूर्तता केल्याशिवाय इराण त्याबाबत तयार होणार नाही.अमेरिकेतील अंतर्गत राजकारण आणि इस्रायलचा दबाव यामुळे इराणवरील निर्बंध हटवण्यास संमती मिळण्याची शक्यता नाही. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांना इराणच्या सशस्त्र दलांशी समन्वय साधावा लागेल, असे सांगत इराणने या सागरी मार्गावर आपला ताबा कायम असल्याचे स्पष्ट केले आहे. या मार्गावरून जाणाऱ्या प्रत्येक जहाजाकडून २ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स एवढे शुल्क आकारण्याचे इराणचे सूतोवाच आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम करणारे आहे. मग या युद्धातून नेमके काय हाशील झाले? उलट या युद्धाने व्हिएतनाम, अफगाणिस्तानपाठोपाठ आणखी एक नामुष्की महासत्तेच्या नावावर नोंदवली गेली. ट्रम्प यांच्या मागील काळातील कोलांटउड्या आणि अमेरिकेचा एकंदर इतिहास पाहता येणाऱ्या काळात काही वादग्रस्त विधाने केली गेली किंवा करारातील मागण्यांबाबत घूमजाव केले गेले तर हा युद्धविराम कोणत्याही क्षणी मोडीत निघू शकतो. त्यामुळे या कराराची सांगता प्रत्यक्ष आणि संपूर्ण युद्धबंदीमध्ये होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने जग निश्चिंत होईल.

# थकबाकीच्या ओझ्याखाली शिक्षण

**खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद हे सामाजिक समतेकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. मात्र, या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी राहिल्याने राज्य सरकारकडून शाळांना देय असलेला बराच निधी थकीत राहिला. परिणामी, अनेक खासगी शाळांनी 'आरटीई' अंतर्गत प्रवेशास नकार देत गरीब आणि वंचित मुलांचे शिक्षणच धोक्यात आणले आहे.**




शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शाळांना सरकारकडून प्रत्येक विद्यार्थ्यांमागे काही निश्चित रक्कम दिली जाते. ही रक्कम वेळेवर मिळाल्यास शाळांवर आर्थिक ताण येत नाही आणि त्या सामाजिक जबाबदारी सहज पार पाडू शकतात; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये ही भरपाई वेळेवर न मिळणे, अपुरी मिळणे किंवा पूर्णपणे थकवली जाणे, हा गंभीर प्रश्न बनला आहे. अनेक राज्यांमध्ये कोट्यवधी रुपयांची थकबाकी थकली आहे. महाराष्ट्रासारख्या देशातील सर्वात प्रगत राज्यांमध्ये तर खासगी शाळांची थकबाकी लक्षावधी रुपयांमध्ये गेली. प्रसंगी शाळांनी प्रवेश न देण्याची भूमिका घेतली. सरकारने कितीही दबाव आणला, तरी आता शाळा ऐकायला तयार नाही. पैसे न मिळाल्याने शाळांचे दैनंदिन व्यवस्थापन, शिक्षकांचे वेतन, पायाभूत सुविधा यावर थेट परिणाम होत आहे. खासगी शाळा या नफेखोर संस्था नसून त्यांच्यावरही खर्चाचे बंधन असते, हे सरकारने लक्षात घेणे आवश्यक आहे. या आर्थिक अडचणींमुळे अनेक शाळांनी उघडपणे किंवा अप्रत्यक्षपणे 'आरटीई' प्रवेशाला विरोध सुरू केला. काही शाळा प्रवेश प्रक्रियेत अडथळे निर्माण करतात, तर काही थेट 'जागा उपलब्ध नाही' असे कारण देतात. काही ठिकाणी पालकांना अतिरिक्त शुल्क भरण्यास भाग पाडले जाते. ते कायद्याच्या विरोधात आहे. शाळांच्या या भूमिकेमागे केवळ नकारात्मकता नाही, तर त्यांची आर्थिक असुरक्षिततादेखील आहे; परंतु या संघर्षात सर्वात मोठे नुकसान होते ते गरीब विद्यार्थ्यांचे. अनेक पालकांना खासगी शाळांची फी परवडत नाही आणि सरकारी शाळांमध्ये गुणवत्ता, सुविधा किंवा प्रवेश उपलब्ध नसल्यामुळे मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील शिक्षणातील दरी अधिकच रुंदावते. काही मुले शिक्षण सोडतात. शिक्षणाच्या अभावामुळे गरिबीचे चक्र कायम राहते. शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी ही केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रभावी होणे आवश्यक आहे. यासाठी सरकारची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे; परंतु भरपाईची रक्कम थकवणे, प्रक्रिया गुंतागुंतीची ठेवणे आणि वेळेवर निधी न देणे, हे सर्व प्रशासनिक अपयशाचे लक्षण आहे. सरकारने याकडे केवळ आर्थिक भार म्हणून न पाहता, सामाजिक गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षणावर खर्च म्हणजे देशाच्या भविष्यातील गुंतवणूक आहे, हे धोरणात्मक स्तरावर स्वीकारले गेले पाहिजे. त्यामुळे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी काही ठोस उपाय आवश्यक आहे. शाळांना देय असलेली सर्व रक्कम वेळेत देण्यासाठी पारदर्शक प्रणाली निर्माण करणे आवश्यक आहे. सरकारी शाळांची गुणवत्ता सुधारून पर्याय उपलब्ध करून द्यावा लागेल.

शिक्षण हक्क कायदा हा केवळ एक कायदा नाही, तर सामाजिक न्यायाचा पाया आहे; परंतु आज तोच आर्थिक दुर्लक्षामुळे ढासळताना दिसत आहे. सरकार, शाळा आणि समाज या तिन्ही घटकांनी आपली जबाबदारी ओळखून एकत्रित प्रयत्न केले, तरच शिक्षणाचा हक्क खऱ्या अर्थाने प्रत्येक मुलापर्यंत पोहोचू शकतो. अन्यथा, 'सर्वांसाठी शिक्षण' ही घोषणा केवळ घोषवाक्य राहील आणि हजारो मुलांचे भविष्य अंधारात जाईल. सर्वप्रथम, सरकारने वेळेवर निधी वितरित करण्याची आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. यासाठी पारदर्शक आणि स्वयंचलित यंत्रणा विकसित करता येईल. त्यामुळे देयके देण्यात विलंब होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार कठोर नियम बनवून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करणेही आवश्यक आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही यशस्वी मॉडेल्सचा विचार करणे गरजेचे आहे. 'आरटीई' अंतर्गत येणाऱ्या मुलांना ओझे न समजता संधी म्हणून पाहिले पाहिजे. शेवटी हा प्रश्न केवळ कायद्याचा कवा पैशाचा नाही, तर संवेदनशीलतेचा आणि प्राधान्यक्रमांचा आहे. सरकार आणि शाळा यांनी एकत्रितपणे काम केल्यास या समस्येचे समाधान शक्य आहे. महाराष्ट्र, तमिळनाडू, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि पंजाब या राज्यांमध्ये शिक्षण हक्क कायद्याची परिस्थिती अत्यंत चताजनक आहे. महाराष्ट्रात तर सरकारकडे हजारो कोटी रुपयांची थकबाकी असल्यामुळे खासगी शाळा 'आरटीई' अंतर्गत प्रवेश देण्यास टाळाटाळ करत आहेत. आकडेवारी पाहिली, तर अनेक शाळांनी वर्षानुवर्षे शिक्षण हक्क कायद्यानुसार भरावयाच्या जागा रिक्त ठेवल्या आहेत किंवा या योजनेतूनच माघार घेतली आहे. ही परिस्थिती केवळ प्रशासकीय अपयश दर्शवत नाही, तर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेपुढेही प्रश्नचिन्ह उभे करते. 'आरटीई'चा उद्देश केवळ 'मोफत शिक्षण' देणे नव्हता, तर समाजात समान संधी उपलब्ध करून देणे हा होता; मात्र खासगी शाळांचे व्यवस्थापन याकडे तोट्याचा व्यवहार म्हणून पहात आहे.

दुसऱ्या बाजूला राज्य सरकारेही आपली जबाबदारी टाळताना दिसतात. केंद्र आणि राज्य यांच्यातील निधी वाटपातील विसंवाद, देयके देण्यात होणारा विलंब आणि प्रशासकीय प्रक्रियांमधील गुंतागुंत यामुळे ही समस्या अधिक तीव्र होत आहे. सरकार वेळेवर थकबाकी देत नाही, तेव्हा शाळांचा विरोध काही प्रमाणात स्वाभाविक ठरतो; मात्र मुलांवर त्याचा थेट परिणाम होणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. ही एक अशी साखळी निर्माण झाली आहे, ज्यात सरकार आणि शाळा एकमेकांवर जबाबदारी ढकलत राहतात आणि शेवटी मुलांचाच बळी जातो. काही शाळा 'आरटीई'तील मुलांबाबत भेदभाव करतात, तेव्हा परिस्थिती अधिक गंभीर होते. स्वतंत्र वर्ग चालवणे, अतिरिक्त शुल्क आकारणे किंवा अप्रत्यक्षपणे त्यांना नाकारण्याचा प्रयत्न करणे यामुळे नवी अस्पृश्यता तयार होत आहे. या सर्व बाबी केवळ कायद्याविरुद्धच नाही, तर नैतिकतेलाही धरून नाही. शिक्षणाचा हक्क हा केवळ शाळेत प्रवेश मिळवण्यापुरता मर्यादित नाही, तर सन्मानाने आणि समानतेने शिक्षण घेण्याचाही अधिकार आहे. या संपूर्ण परिस्थितीत सर्वात चिंताजनक बाब म्हणजे देशभरात 'आरटीई' अंतर्गत जागा भरल्या जाण्याचे प्रमाण केवळ २० ते २५ टक्के इतकेच आहे. दरवर्षी लाखो जागा रिक्त राहतात आणि तेवढ्याच संख्येने मुले शिक्षणापासून वंचित राहतात. ही केवळ संसाधनांची नासाडी नाही, तर देशाच्या भविष्यासोबत गंभीर खेळ आहे. यावर वेळेत उपाययोजना न केल्यास सामाजिक आणि आर्थिक परिणाम आणखी गंभीर होऊ शकतात.

**जनार्दन पाटील**

## युद्धबंदीतील मुख्य अडथळा :हॉर्मुझ सामुद्रधुनी

इराण, अमेरिका -इजराइल यांची तात्पुरती युद्धबंदी झाली. अमेरिका स्वतःचा विजय झाला म्हणतो, तर इराण आपला विजय झाला म्हणून आनंदोत्सव साजरा करतो आहे. आता पाकिस्तानात बैठक आहे. यामागे चीनचा छुपा सहभाग निश्चितच आहे. जी मध्यस्थता भारताने करायला हवी होती ती पाकिस्तान करतोय. यापेक्षा दुर्दैव ते काय! पण ही युद्धबंदी वार्ता यशस्वी होणार नाही हे शंभर टक्के खरे. याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे इजराइलला इराण पूर्णपणे नष्ट करायचा आहे. आणि अमेरिकेला हॉर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण हवे आहे. म्हणजे तेलावर नियंत्रण हवे आहे. आणि इराण हॉर्मुझवरचा आपला अधिकार कुठल्याही परिस्थितीत सोडणार नाही. आणि अमेरिकेने घातलेली युरेनियम परतीची अटही इराण मान्य करणार नाही. याचाच अर्थ युद्धबंदी होणार नाही हे निश्चित .म्हणजे खरे युद्ध समुद्रात सुरू होईल.सामुद्रधुनी आणि कालवे यांना जागतिक व्यापारात महत्त्वाचे स्थान आहे. या घटकांनी शेकडो वर्षे आंतरराष्ट्रीय संबंधांची आणि राजकारणाची दिशा ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

हॉर्मुझ सामुद्रधुनी ,बंगालचा उपसागर, सुएझ कालवा, पर्शियाचे आखात, इंग्लिश खाडी हे शब्द आपल्या परिचयाचे आहेत. हॉर्मुझ सामुद्रधुनी म्हणजे दोन मोठ्या समुद्रांना जोडणारा अरुंद मार्ग आहे. तसेच कालवे देखील यासाठीच महत्त्वाचे आहे. हे मार्ग फक्त जहाजांची वाहतूक सोपी करण्या पुरतेच मर्यादित नाही तर त्या त्या भागातील ऊर्जा स्त्रोत आणि वस्तूंच्या ने-आण करणाऱ्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवणारी व्युहरचना ठरवण्यात मोठी भूमिका बजावतात. मालवाहतुकीसाठी सागरी व्यापारावरील जागतिक अवलंबित्व जसे जसे वाढत गेले तस तसे या जलमार्गांचे महत्त्व अनेक पटीने वाढत गेले .आणि आज ती जागतिक अर्थव्यवस्थेची अत्यंत महत्त्वाची केंद्रे झाली आहेत.अमेरिकेने मध्यआशियातील खाडी देशातील तेलावर नियंत्रण मिळवण्यासाठीच इराणवर हल्ला केला आणि इजराइलला इराण जगाच्या नकाशावरूनच नष्ट करायचा आहे. यासाठी दोघांनी मिळून इराणवर हल्ला केला.पण शत्रूला कमकुवत समजण्याची चूक त्यांनी केली.




इराणने आपली शस्त्रास्त्र क्षमता दाखवलीच,पण हॉर्मुझ सामुद्रधुनी बंद करून आपली चतुर युद्धनीती (मुत्सदीपणा) जगाला दाखवून अमेरिकेचे नाकच चिमटीत धरले. अमेरिका आणि इजराइल यांनी ही अपेक्षाच केली नव्हती. आणि म्हणूनच ही युद्धबंदी, ही शांती वार्ता यशस्वी होणार नाही असे वाटते. व्यापाराचे केंद्र असलेली हॉर्मुझ सामुद्रधुनी वरचे वर्चस्व इराण सोडणार नाही. ना ही युरेनियम परत करणार. तसेच इराण जहाजांना मोठ्या प्रमाणात टोल टॅक्स लावेल. आणि अमेरिका त्यासाठी कोणत्याही थराला जाईल. आणि इजराइलला तेच हवे. या राष्ट्रांच्या अहंकाराची फळं मात्र पूर्ण जगाला भोगावी लागणार. तेव्हा येणारा काळ हा अधिक कठीण असेल हे मात्र खरे. या सर्व परिस्थितीचा विचार करून भारताने मात्र आता ऊर्जा आणि इंधन या क्षेत्रात इतर देशांवरील अवलंबित्व कमी करून स्वयंपूर्ण होण्याकडे वाटचाल करायला हवी असे वाटते.

**माधवी पत्की**

## अमेरिकेची युध्दविरामाची घोषणा कशासाठी?

अमेरिकेने लष्करी उद्दिष्ट पूर्ण झाले म्हणून नव्हे तर 'डिजीटल चेकपॉइंट' उध्वस्त होईल या भीतीने युध्दविरामाची घोषणा केली आहे. अमेरिकेने इराणवर जेव्हा २८ फेब्रुवारी २०२६ रोजी युध्दाचे हल्ले केले. तेव्हा युध्दापूर्वी इराण अण्वस्त्र क्षमता वाढवत आहे व अण्वस्त्र स्पर्धा वाढू नये ही स्ट्रटीजी ठेवून युध्द सुरू केले होते. अमेरिका इराण युध्दात इस्त्रायल सुध्दा सामील झाला होता. या युध्दात इराणने खंबीर राहून अमेरिकेची जगप्रसिद्ध रडार यंत्रणा तर नेस्तनाबूत केलीच पण अमेरिकेचे मोठे नुकसानही केले. त्यानंतर कच्चे तेल, नैसर्गिक वायू, रासायनिक खते हा वाहतूकीचा प्रमुख मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली. त्यामुळे जागतिक व्यापाराची नाकेबंदी तर झालीच पण संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला मास्टर स्ट्रोक बसला.

आता महत्वाचा मुद्दा हा आहे की, होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्यापेक्षाही महत्वाचे आहे ते म्हणजे याच सामुद्रधुनीतून फायबर ऑप्टीक इंटरनेट केबल्स टाकलेल्या आहेत.ज्या केबल्समुळे जगातील सुमारे ९५ ते ९७ टक्के डेटा या केबल्सद्वारे हस्तांतरित केल्या जातो हे केबल्स आम्ही उध्वस्त करुन जगाची इंटरनेट सेवा ऑफलाईन करु अशी धमकी इराणने दिली. सत्य हेच आहे की, अमेरिका इराणच्या या डिजिटल बॉम्ब हल्ल्यासमोर नमली म्हणून अमेरिकेने अटी, शर्थी, युध्द शांती प्रस्तावाचे नाटक करुन जगातील सुपर पॉवर म्हणून स्वतःची ओळख असूनही स्वतःहूनच माघार घेतली हे एकमेवाद्वितीय सत्य आहे.

डिजिटल युध्द आतापर्यंत जागतिक पातळीवर कधीच झाले नाही. पण,अमेरिकेच्या युध्द लालसेमुळे डिजिटल युध्द पेटण्याची पूर्ण शक्यता होती. भारत,युरोप, आफ्रिका आणि पश्चिम आशियाई देशासह आशिया खंडातील अनेक देशांमध्ये 'इंटरनेट ब्लॅकआऊट' होण्याची भीती होती. जगातील सर्वात मोठ्या तीन खंडाची इंटरनेट सेवा ब्लॅकआऊट होणे म्हणजे साधी गोष्ट नव्हे. समुद्र तळाशी कित्येक हजार किलोमीटर पर्यंत ह्या इंटरनेट फायबर ऑप्टीक केबल्स आंथरलेल्या आहेत. म्हणून होर्मुझची सामुद्रधुनी हा डिजिटल चेकपॉइंट आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका सुपरस्टेट किंवा सुपर न्युक्लिअर पॉवर कन्ट्री म्हणून नावलौकिक पावलेला असला तरी इराणने अमेरिकेच्या युध्दविराम प्रस्तावाला प्रभावित करण्यासाठी अतिशय महत्वाची बुध्दीबळातली चाल फेकली आहे. तर ती चाल



कोणती बघूया... युध्द विराम नव्हे तर कायमस्वरूपी युध्दाचा शेवट; केवळ तात्पुरता युध्दविराम आम्हाला मान्य नाही तसेच इराणवर भविष्यात कधीही हल्ले केले जाणार नाहीत याची दस्ताऐवजातून लेखी हमी द्या. इराणवर लादलेले सर्व प्रकारचे आर्थिक निर्बंध हटवणे यासह एकूण दहा मागण्या मान्य झाल्या तरच जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्वाची असलेली होर्मुझची सामुद्रधुनी आम्ही सुरु करु.

तात्पर्य, इराण अजूनही अमेरिके समोर नमलेला नाही. युध्द कोणत्याही देशांमध्ये असो त्या युध्दामुळे केवळ युध्दात सामील असलेल्या देशांचेच नुकसान होत नाही तर संपूर्ण जग व जगाची अर्थव्यवस्था वेठीस धरल्या जाते.

लक्षात घेण्यासारखी एक गोष्ट ही आहे की, हे युध्द सुरू असताना संयुक्त राष्ट्रसंघ म्हणजे युनोची भूमिका अनव्हिजीबल कशी राहिली.जागतिक शांतता व सहजीवनाचा पुरस्कार करणाऱ्या युनोची कोणतीही प्रतिक्रिया स्पष्टपणे जगापुढे का आली नाही? युध्द हे जगाच्या हिताचे नाही तर विनाशाचा स्पोटक बॉम्ब आहे. जगाचे पालकत्व करणारा अमेरिका युध्दाशिवाय अन्य मार्गानेही इराणला काबूत ठेवू शकला असता पण तसे तो करु शकला नाही. राजकारणात मुत्सद्देगिरी आवश्यक असते तशी आंतरराष्ट्रीय राजकारणात शह-काटशहाची क्षमता व काबूत ठेवण्याची बुद्धीमत्ता आवश्यक असते जी अमेरिकेजवळ असतांनाही त्याचा वापर ती करु शकली नाही. यावरून स्पष्ट होते की, आपल्या युध्दखोर उपद्व्यापातून जग वेठीस धरणे एवढाचा पोरखेळ अमेरिकेचा दिसून येतो.

**अनिल बारसकर**
अमरावती
मो.९४२२८८१३३७

## जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज!

गेल्या ४० दिवसांपासून सुरू असलेला पश्चिम आशियातील संघर्षाला अल्प का होईना पण विराम लागल्याने संपूर्ण जगाने सुटकेचा निःश्वास सोडला आहे. या युद्धात इराणचेही 'न भूतो' असे नुकसान झाले. इराणच्या शेजारी असणाऱ्या अरब राष्ट्रात अमेरिकेचे लष्करी तळ असल्याने इराणने त्या देशावर हल्ले केले त्यामुळे त्या देशांचेही खूप नुकसान झाले. इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने तेथून होणारी तेल वाहतूक थांबली त्यामुळे तेल बाजार हादरले. इंधन दर वाढले. त्याचा परिणाम भारतासह संपूर्ण जगाला बसला. अनेक देशांची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. महागाई वाढली त्यामुळे सर्वसामान्यांचे जिने मुश्किल झाले. या युद्धाची झळ सर्वसामान्यांच्या स्वयंपाक घराला बसली. या युद्धाने सर्वाधिक नुकसान झाले ते सर्वसामान्य नागरिकांचे. काहीही चूक नसताना सर्वसामान्य नागरिकांना या युद्धाची झळ सोसावी लागली. आता किमान पुढील १४ दिवस तरी दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ले होणार नाही. चर्चेसाठी आणि युद्धाला पूर्ण विराम देण्यासाठी इराणने अमेरिकेसमोर १० प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत. या १० मागण्या अमेरिकेने मान्य केल्या तरच पूर्ण युद्ध बंदी होईल असे इराणने ठणकावून सांगितले आहे. अर्थात चर्चेला बसल्यावर यातून तोडगा निघू शकतो. युद्धाचा शेवट हा विनाशानेच होतो.म्हणूनच जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**

# अंजनगाव न.परिषद शासकीय डिझेल घोटाळ्यानंतर आता मजुरी घोटाळा

## दिवसाकाठी हजारो रुपयांची मजुरी गिळंकृत केल्याचा आरोप; चौकशीची मागणी तीव्र

**अंजनगाव सुजी/वार्ताहर**

नगरपरिषद अंतर्गत कचरा संकलनाच्या कामात पुन्हा एकदा गंभीर अनियमिततेचा मुद्दा समोर आला असून, कंत्राटदारांकडून मजुरांच्या मजुरीत मोठ्या प्रमाणात कपात केली जात असल्याचा आरोप मजुरांनी केला आहे. याप्रकरणी थेट मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आल्याने शहरात खळबळ उडाली आहे.



मजुरांच्या म्हणण्यानुसार, कचरा संकलनाच्या कामासाठी नियुक्त कंत्राटदाराने शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार मजुरी न देता मोठ्या प्रमाणावर कपात केली आहे. कंत्राट घेताना मजुरांना दिवसाकाठी ५१९ रुपये मजुरी देण्याचे मान्य करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात मजुरांना केवळ ३०० रुपयेच दिले जात असल्याचा गंभीर आरोप तक्रारदार अब्दुल सादिक यांनी केला आहे. त्यामुळे प्रत्येक मजुरामागे दररोज सुमारे २१९ रुपयांची कपात होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

नगरपरिषद हद्दीत दररोज अंदाजे ८० मजूर कचरा संकलनाच्या कामात कार्यरत असल्याचे सांगितले जात आहे. या हिशोबाने दररोज सुमारे १६ हजार रुपयांची मजुरी कंत्राटदाराकडून रोखली जात असल्याचा आरोप असून, हा प्रकार महिन्याला लाखोंच्या घरात जात असल्याचे बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कंत्राटदाराविरोधात संतापाची लाट उसळली आहे.

विशेष म्हणजे, याच कंत्राटदाराविरोधात मागील वर्षी देखील शासकीय डिझेल-पेट्रोल बिलांमध्ये गैरप्रकार केल्याचा आरोप झाला होता. त्यावेळी बिलांमध्ये फेरफार करून जादा रक्कम उचलल्याचा मुद्दा पुढे आला होता. हा प्रकार उघड झाल्यानंतर प्रहार संघटनेने आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशीची मागणी केली होती. त्यानुसार चौकशीही करण्यात आली होती. मात्र, वर्षभराच्या आतच पुन्हा एकदा त्याच कंत्राटदारावर गंभीर आरोप झाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

सदर कचरा संकलनाचे काम 'निर्मल ग्रामविकास संस्था' (नोंदणी क्रमांक एफ २७३४७) यांच्याकडे असून या कामाचा कालावधी ११ महिन्यांचा आहे. करारातील अटींचे उल्लंघन करून मजुरांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप होत असल्याने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.दरम्यान, केंद्र सरकारच्या कायद्यानुसार कोणत्याही मजुराला मंजूर मजुरीपेक्षा कमी वेतन देणे किंवा मजुरी न देणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. अशा प्रकरणात संबंधित कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो. विशेषतः भारतीय दंड संहितेतील कलम ४२० (फसवणूक) अंतर्गत कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच कामगार कायद्यांचे उल्लंघन केल्याप्रकरणी स्वतंत्र कारवाईही होऊ शकते.

या सर्व घडामोडींमुळे अंजनगाव नगरपरिषद प्रशासनावर दबाव वाढला असून, संबंधित कंत्राटदारावर तातडीने कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मजुरांना न्याय मिळणार का, की हा प्रकारही चौकशीच्या फेऱ्यातच अडकणार,असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

## श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गौरव

**अमरावती/का.प्र.**



श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे २०२६ वर्षातील सीटीईटीमध्ये पात्र विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला ५ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रांजली उगले (गुण ९९), रुपम सोनोने (९८),आकाश धिक्कार (८९), उज्वला पेड्डीवार (८९), प्रज्योत उके (८३) यांचा समावेश होता. या विद्यार्थ्यांचा सन्मान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत यांनी केला तसेच इतर विद्यार्थ्यांनीही यांच्याकडून प्रेरणा घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करावे असे प्राचार्य डॉ विनय राऊत यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये आणखी एक मानाचा तुरा जोडला गेला. यांप्रसंगी प्रा. डॉ. वनिता काळे, प्रा. डॉ. अंजली ठाकरे, प्रा डॉ. संगीता बिहाडे, डॉ. अमित गावंडे, डॉ. माधुरी देशमुख, डॉ. वैशाली कडू, डॉ. शिल्पा येळणे, डॉ. सुकेश्वनी घोडेस्वार,मनीषा लाकडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी राजू जामनीक, सुनीता गावंडे, संजय बोबडे, ईश्वरदास बोंडे, प्रतीक वानखड,आयुष धनवटे यांची उपस्थिती लाभली.

## उच्च शिक्षण संचालकांसोबत नुटा संघटनेचे सिनेट सदस्यांची बैठक

### प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक हालचाली

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्यासोबत नुटा संघटनेचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध प्रलंबित, धोरणात्मक व संवेदनशील प्रश्नांवर सखोल व सकारात्मक चर्चा करण्यात आली.



बैठकीत सर्वप्रथम एमफील पात्रतेच्या आधारे लाभ मिळालेल्या १४२१ प्राध्यापकांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत दहा प्राध्यापक निवृत्त झाल्यामुळे त्यांच्या लाभांच्या अंमलबजावणीसंदर्भात निर्माण झालेल्या अनिश्चिततेवर तातडीने स्पष्टता देण्याची गरज शिष्टमंडळाने अधोरेखित केली.तसेच, ज्या प्राध्यापकांनी M.Phil पात्रतेसाठी अर्ज केलेला नव्हता, त्यांच्या प्रकरणांचा पुनर्विचार करून त्यांना न्याय्य तोडगा देण्याची मागणी करण्यात आली. शासन निर्णय जून २०१३ अन्वये प्रलंबित राहिलेल्या स्थाननिश्चिती प्रक्रियेची अंमलबजावणी पुन्हा सुरू करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, असा आग्रही यावेळी धरण्यात आला. याच संदर्भात, पात्र प्राध्यापकांच्या पदोन्नती प्रक्रियेवरील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांची तपासणी शासनाच्या विधी अधिकाऱ्यांमार्फत करून येत्या दोन दिवसांत निर्णय जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन संचालकांनी दिले.

प्राचार्यांच्या नियुक्ती प्रक्रियेमधील अडचणी दूर करून ती अधिक पारदर्शक, सुसंगत व कार्यक्षम करण्याबाबतही सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या प्रवेशसंख्येनुसार महाविद्यालयांना शिक्षकांच्या ५०% पदांना मान्यता न देण्याच्या धोरणामुळे निर्माण झालेल्या अडचणींकडेही शिष्टमंडळाने लक्ष वेधले. यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. बैठकीदरम्यान राष्ट्रीय शिक्षण धोरण राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० प्रभावीपणे राबविण्यासाठी महाविद्यालयांमध्ये सर्व शैक्षणिक व्हर्टिकल्समध्ये आवश्यक त्या प्रमाणात प्राध्यापक पदांची निर्मिती करणे अत्यावश्यक असल्याचे शिष्टमंडळाने ठामपणे मांडले. प्रत्येक क्रेडिटनुसार कार्यभाराची गणना करून त्यानुसार पदनिर्धारण करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

शिष्टमंडळामध्ये डॉ. दीपक राऊत, डॉ. लक्ष्मीकांत बर्डे, डॉ. फडणवीस, डॉ. वैद्य, डॉ. शिरसाट, डॉ. कोरडे व मयूर देवाचे यांचा समावेश होता.बैठकीमुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सकारात्मक व ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास शिष्टमंडळाने व्यक्त केला.

## जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक अजिंक्यपद स्पर्धेत १४० खेळाडूंचा सहभाग

### श्री हव्याप्र मंडळ व अमरावती जिल्हा हौशी संघटनेचा संयुक्त उपक्रम

**अमरावती/का.प्र.**



श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जिम्नॅस्टिक विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय जिम्नॅस्टिक अजिंक्यपद स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. श्री हव्याप्र मंडळ व अमरावती जिल्हा हौशी संघटनेच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या स्पर्धेत आर्टिस्टिक व रिदमिक जिम्नॅस्टिक प्रकारांचा समावेश होता.या स्पर्धेत ६ ते १९ वयोगटातील तब्बल १४० खेळाडूंनी सहभाग घेत उत्कृष्ट कलागुणांचे सादरीकरण केले.

स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन चे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते नानकराम नेभनानी, सिटी कोतवालीचे पोलीस निरीक्षक राम पालवे, यवतमाळच्या पोलीस निरीक्षक दीप्ती व्यास, मंडळाच्या सचिव व अमरावती जिल्हा जिम्नॅस्टिक संघटनेच्या उपाध्यक्ष प्रा. डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष डॉ. राजेश पांडे, जिम्नॅस्टिक विभाग प्रमुख प्रा. आशिष हटेकर आदी मान्यवर उपस्थित होते.स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कृष्णा भट्टड, राधिका मानकर, भाग्यश्री कलाने, धनश्री रामावत, स्नेहल कणेकर, आदित्य श्रीवास, सोहम चोपकर, आदित्य चौधरी, साहिल दमाय, प्रथमेश थेटे व मोहित पवार यांनी पंच म्हणून काम पाहिले. प्रास्ताविकात प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांनी मंडळाच्या क्रीडा वाटचालीचा आढावा घेत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा. आशिष हटेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. निलेश जोशी यांनी मानले.

## धोत्रा-माळेगाव रस्त्यासाठी ग्रामस्थांचा एल्गार

### पुलांची उंची वाढवून रस्ता नूतनीकरणाची मागणी

**तिवसा**-गेल्या २५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या धोत्रा ते माळेगाव या ४ कि.मी. अंतराच्या रस्त्याच्या दुरवस्थेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. या रस्त्याचे नूतनीकरण करावे आणि मार्गावरील पुलांची उंची वाढवून त्यांचे पुनर्बांधकाम करावे, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी केली आहे.



अमरावती जिल्ह्यातील धोत्रा ते माळेगाव हा मार्ग अत्यंत वर्दळीचा आहे. हजारो शेतकऱ्यांची शेती याच मार्गावर असून, गेल्या २५ वर्षांपासून या रस्त्याची साधी डागडुजीही झालेली नाही. रस्त्याची अवस्था इतकी बिकट आहे की, पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले आहे. स्थानिक प्रशासनाला वारंवार निवेदने देऊनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या मार्गावर एकूण तीन पूल आहेत, ज्यांची उंची अत्यंत कमी आहे. पावसाळ्यात या पुलांवरून ५ फुटांपेक्षा जास्त पाणी वाहत असल्याने या भागाचा संपर्क पूर्णपणे तुटतो. यामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि रुग्णांचे प्रचंड हाल होतात. विशेषतः गर्भवती माता आणि आपत्कालीन रुग्णांना या खडतर प्रवासाचा मोठा फटका बसत आहे. ग्रामविकास विभागाने या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने तांत्रिक सर्वेक्षण करावे आणि आवश्यक निधी मंजूर करावा, जेणेकरून विद्यार्थ्यांचा प्रवास सुखकर होईल आणि संभाव्य जीवितहानी टाळता येईल.

# शिक्षणानेच होते आत्मसन्मानाची प्राप्ती-पो.अ. विशाल आनंद

### विद्यापीठात समता सप्ताहाचे उद्घाटन

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण हे मुक्तीचे पहिले पाऊल आहे. केवळ पदवी मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर आपल्या आत्म्याला आणि विचारांना स्वतंत्र करणे म्हणजे खरे शिक्षण असून शिक्षणानेच आत्मसन्मानाची प्राप्ती होत असल्याचे प्रतिपादन अमरावतीचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने ८ ते १४ एप्रिल या कालावधीत समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते.



व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.आर.डी. सिकची, प्रमुख वक्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरचे माजी कुलसचिव डॉ. पुरण मेश्राम, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड आदी उपस्थित होते. प्रमुख वक्ते माजी कुलसचिव डॉ. पूरण मेश्राम यांनी 'बाबासाहेबांचे राष्ट्र उभारणीत योगदान' या विषयावर विचार मांडले. गुलामाची गुलामी दूर करण्यासाठी त्याला शिक्षणाची जाणीव करून दिली पाहिजे, या विचारातून त्यांनी शिक्षण प्रसारावर भर दिला. सायमन कमिशनकडे त्यांनी शाळांच्या इमारती बांधण्यापेक्षा शाळा सुरू करण्याची मागणी केली होती. 'वुई द पीपल ऑफ इंडिया' ही भावना आणि ५० टक्के महिलांना दिलेले अधिकार हे राष्ट्र उभारणीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. त्यांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांना एका सूत्रात बांधून भारताला जगात तिसरी शक्ती म्हणून उभे केले.चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि काळाराम मंदिर सत्याग्रह हे केवळ पाण्यासाठी किंवा प्रवेशासाठी नव्हता, तर मानवी हक्क आणि राष्ट्र उभारणीसाठी माणसांना उभे करण्यासाठी होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रउभारणीतील महत्त्वपूर्ण भूमिकेवर यावेळी त्यांनी प्रकाश टाकला.

प्रमुख अतिथी डॉ.आर.डी. सिकची यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महती सांगितली. अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली स्वातंत्र, समता आणि बंधुता ही मूल्ये केवळ भाषणापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या दैनंदिन वागणुकीत आणि विचारात उतरवणे हीच त्यांना वाहिलेली खरी आदरांजली ठरेल. बाबासाहेबांनी कामगारांसाठी आठ तासांच्या कामाचा नियम आणि महिलांना मालमत्तेत समान अधिकार मिळावा, यासाठी मांडलेला विचार हा राष्ट्र उभारणीचा महत्त्वाचा टप्पा होता. समाजातील शेवटच्या माणसाला न्याय कसा मिळेल, याची पूर्ण काळजी त्यांनी संविधानात घेतली आहे.शाल, पुस्तक व स्मृतिचिन्ह देवून मान्यवरांच्या स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड यांनी, संचालन प्रा. सुजाता तायडे, तर आभार ॲड. अरुण रौराळे यांनी मानले. याप्रसंगी केमिकल टेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. अनिल नाईक, बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. अनिता पाटील, कार्यक्रमाचे समन्वयक विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपकुलसचिव आस्थापना मंगेश वरखेडे, श्री राहुल नरवाडे,मोनाली तोटे पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठाच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. विशाल बापते, भौतिकशास्त्र विभागातील डॉ. गजानन मुळे तसेच शिक्षक, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### रंजना मामर्डे आणि डॉ. पृथ्वीराज सिंह सन्मानीत



**अमरावती**-विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या प्रदेशाध्यक्ष रंजना मामर्डे आणि पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ पृथ्वीराजसिंह राजपूत यांना त्यांच्या सामाजिक उत्थानासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल अखिल भारतीय क्षत्रिय महासभा द्वारे विदर्भाची सांस्कृतिक अंबानगरी येथील ज्ञानेश्वर सभागृहात आयोजीत एका भव्य समारंभात राष्ट्रीय अध्यक्ष कुंवर ठा. हरबंस सिंह यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. या प्रसंगी महासभेचे राष्ट्रीय महामंत्री राघवेंद्र सिंह राजू, महिला आघाडी अध्यक्ष नीतू सिंह, महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री कृपा शंकर सिंह, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, माजी आमदार दिलीपकुमार सानंदा, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजेंद्र सिंह राजपूत, अतुल सिंह राजपूत, प्राचार्य दिलीपसिंह खांबरे, कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्मा राजपूत, प्रा . मेघा कोटक, शिक्षण क्षेत्रातील उदयोन्मुख नेतृत्व डॉ. प्रशांत विघे, नितीन पवित्रकार, डॉ. रमेश परिहार तसेच संपूर्ण देशाच्या विविध प्रांतातून आलेले क्षत्रिय महासभेचे पदाधिकारी त्याचप्रमाणे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

### एम.बी.ए. विभागातील ३३ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरा



**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवसाय प्रशासन आणि व्यवस्थापन विभागातील ३३ विद्यार्थ्यांना डी मार्ट, आयडीएफसी फर्स्ट बँक, जिओ फायनान्शियल सर्व्हिसेस, इंडिया मार्ट, टी अ‍ॅन्ड एम सर्व्हिस कन्सल्टन्सी प्रा.लि., थानेदार ग्रुप, कॅक्टो यांसारख्या प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये एचआर एक्झिक्युटिव्ह, सेल्स एक्झिक्युटिव्ह, क्लस्टर असिस्टंट आणि सीआरएम अशा पदांवर नोकरी मिळाली आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागाचे यश सर्वत्र दिसत असून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात.आठवडाभर चालणा-या कार्यक्रमात ॲप्टिटयुडटेस्ट, ट्रेनिंग, ॲडव्हॉन्स एक्सेल, मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, कम्युनिकेशन स्किल्स, प्रोफेशनल रायटिंग आदींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळते. दोन वर्षांच्या या अभ्यासक्रमात फायनान्स, मार्केटिंग, ह्युमन रिसोर्सेस, ऑपरेशन्स आणि बिझनेस ॲनालिटिक्स यांसारख्या मुख्य विषयांचा समावेश आहे. तसेच इंटर्नशिप, औद्योगिक भेटी आणि अतिथी व्याख्यानांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला जातो. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विभागप्रमुख डॉ. डी. वाय. चाचरकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### दोन दिवसीय एआय टूल्स कार्यशाळा



**अमरावती**-श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावती येथील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाच्या उत्कर्ष स्टुडंट्स फोरमच्या वतीने एआय टूल्स या विषयावर द्विदिवसीय हँड्स-ऑन कार्यशाळा व स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन तसेच एसएसआयटी प्रा. लि., नागपूर यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यशाळेत तज्ज्ञ प्रशिक्षक संतोष शेलोकर (डायरेक्टर, एसएसआयटी प्रा. लि., नागपूर) यांनी विद्यार्थ्यांना विविध आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्सची सखोल माहिती दिली. तसेच या टूल्सचा प्रत्यक्ष जीवनातील उपयोग कसा करावा याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण ऑफलाइन पद्धतीने दिले.कार्यशाळेत एकूण ११० विद्यार्थी व १५ शिक्षकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांना आधुनिक एआय टूल्स, त्यांचे उपयोग आणि विविध क्षेत्रांतील अनुप्रयोगांविषयी सविस्तर माहिती मिळाली.उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. आर. एस. दालू, विभागप्रमुख डॉ. अंजली राऊत आणि स्टाफ समन्वयक प्रा. अखिल जैस्वाल यांचे मार्गदर्शन लाभले.

### विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात मिळालेले बक्षीस दिले शाळेला



**लेहेगाव**- इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यासाठी कार्यक्रम घेण्यात आला. इयत्ता सातवीचे विद्यार्थी १ मे २०२६ नंतर याच शाळेचे माजी विद्यार्थी होणार आहेत. शाळेच्या विकासात आपलाही हातभार लागावा हा मनोदय विद्यार्थ्यांनी वर्ग शिक्षकांजवळ बोलून दाखवला आणि आम्हाला आमच्या सांस्कृतिक कार्यक्रमात मिळालेल्या खाऊच्या पैशातून शाळेला भेटवस्तू द्यायची आहे असे सांगितले.शिक्षकांनी त्यांना त्यांच्या खाऊतून त्यांच्यासाठी वस्तू आणण्याचे निश्चित केलेले होते. परंतु विद्यार्थी शाळेला भेटवस्तू देण्यासाठी आग्रही होते. शेवटी या चिमुकल्यांनी त्यांना मिळालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या खाऊतील पैशातून गरजेचे वाटणारे स्टूल, दोन टेबल क्लॉथ , फोटो स्टॅन्ड क्लॉथ, आर्टिफिशियल स्वागत गुच्छ आणि आरतीचे नवीन ताट इ. साहित्य शाळेला भेट दिले.पुढेही जर खाऊचे आणखी पैसे शिल्लक राहिले तर त्यातूनही शाळेला १ मे पर्यंत आणखी भेट वस्तू देण्याचा मनोदय याच वर्गाच्या विद्यार्थिनींनी व्यक्त केलेला आहे.त्यांच्या या नवकल्पनेबद्दल आणि शाळेच्या विकासात दिलेल्या योगदानाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.संचालन माही पांडे आभार प्रदर्शन तनुश्री टेकाडे यांनी केले.



# संभावामीं युद्धे रुद्धे....

माणसाला जगायला वस्तू आणि आनंद पाहिजे. वस्तू शारीरिक किंवा भौतिक सुविधा, गरजा पूर्तता करण्यासाठी ; तर आनंद मानसिक स्थिरता कायम राखण्यासाठी.कारण माणसाला भौतिक आणि भावनिक गरजांची जाणीव होत असल्याने तो कार्यरत राहतो.त्यासाठी तो करिअर म्हणजेच काही तरी करण्याची धडपड ठेवतो.ती धडपड त्याला कुठपर्यंत नेऊन ठेवते, याचा विचार करायला आपण थोडे पुरावे जमा करू या का?कारण पुरावे किंवा दाखले हे आपल्या समजदारीचे दारे लवकर उघडी करतात.

माणसाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा किंवा वस्तू त्यांचा उपयोग किंवा उपभोग व्यक्ती किंवा मानव आपल्या तृप्त किंवा समाधानाचा भाग म्हणून करतो. मन: इति माणसः अशी संस्कृत शब्दाची रचना म्हणजे मन ज्याला असा तो मानव ही व्याख्या व्यक्त करते.त्यामुळे मानव हा मनधारक प्राणी आहे.मानवाला मन असल्याने तो त्या मनाप्रमाणे जगण्याचे प्रयत्न करतो.त्यावेळी त्याला स्वदर्शन होते की स्वार्थ होतो हे घडणाऱ्या परिणामातून दिसून येते.

सद्या जगात युद्ध सुरू असल्याने युद्ध हे मानवी उपद्रवाचे प्रमाण आहे.कुठल्या तरी स्वार्थ किंवा इतर काही भावनेतून राष्ट्र प्रमुख म्हणून घेणाऱ्या व्यक्तीकडून ही घटना घडत आहे.एक आदेश व अनेक अवशेष करणारे हे तंत्र आहे. एक व्यक्ती आदेश देऊन विविध देशाने निर्माण केलेल्या इमारती,परंपरेतून आलेल्या वसाहती,स्मारके आणि अनेक ऐतेहासिक वस्तुंचा,श्रदांचा,संस्कृतीचा,भावनांचा खात्मा करण्याचे काम युद्धाद्वारे होते.

युध्दात नायनाट केल्याचे समाधान व कुणाला तरी नमवण्याचा आनंद असतो. ह्यात मानवी वंशाला कुठल्या वर्गवारीत विचारात घ्यायचे याचे उत्तर आपण काढले तर युद्ध शमतील व कदाचित थांबतील सुद्धा!भारत किंवा पूर्वोत्तर देशातील काही नैसर्गिक संवेदनातून एक जाणीव नेहमीच तपासताना दिसून येते की,या देशात निसर्गाने दिलेले सौंदर्य,सुपीक माती,अनुकूल खाणी, ऋतूमान याचा एकंदर मानवी जीवनातील भौतिक व भावनिक गरजेसाठी विचार केला तर, आवश्यकतेपेक्षा उपलब्ध असलेल्या संसाधनामुळे समृद्धीचा लाभ घेता येईल.

इराणसोबत अमेरिकाने युद्ध उभारून इतर मित्र देशाला प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष वेठीस धरले.त्यामुळे इतर देशातील नागरिकांचा यात उगाचच भरडा होणार? याचा शून्यांश नमुना म्हणणे गॅस सिलिंडर. इतर देशातील परिणाम म्हणजे रोजगार,वाहतूक व इतर तत्सम घटक आहे.इराणचे सरकार व नागरिक यांचे देशप्रेम युद्ध स्थितीत मजबूत असल्याने अमेरिकेशी सामना करताना आव्हान पेलेल्या जात आहे. शिवाय अमेरिकेत कोट्यवधीचे जवळपास जनसागर 'नों किंग' सारख्या उद्घोषणा करू लागले.हे हुकुमशाहीला लोकशाही आवार घालू शकते याचा अनुमान आहे.त्यामुळे संभावामीं युद्धे रुद्धे म्हणता येईल. युद्ध म्हणजे मानव निर्मित उपद्रव ! त्याला थांबण्याचे काम आता सर्व सामान्य जनतेसाठी सोपे होईल. युद्धाला थांबण्यासाठी किंवा शमवण्यासाठी सामूहिकपणे रस्त्यावर उतरने हुकूमशहा विरोधात आवाज उठवणे किंवा युद्ध झेलण्यासाठी सक्षम राहणे हे पर्याय दिसते.

स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजींनी नि:शस्त्र लढण्याचा पहिला प्रयोग इंग्रजांविरुद्ध केला.त्याला अहिंसक लढा म्हणून इतिहासाने ही नोंद प्रत्येकामध्ये आत्मविश्वास प्राप्त करण्यासाठी घेतली. मरणे सोपे पण मारणे कठीण ही स्थिती अहिंसा मूल्य जपणारा जाणतो.कारण मरतो तो देह! उरतो तो विश्वास!!.त्या विश्वासाला दृढ केल्याने निर्माण झालेला आत्मविश्वास युद्ध थांबण्याचे काम निश्चित करू शकते.

युद्धविराम ही संयमाची जागा शोधण्याचा प्रयत्न ! हा जरी असला तरी संयम आणि समन्वय यातून संबंध निर्माण झाले तर युद्ध शून्य जग व्हायला समय लागणार नाही. युद्ध हे सत्तेच्या अभिलाषेपोटी पोसलेल्या अहंकाराचे परिणाम आहे.अहंकार हा जेव्हा स्वार्थ संकुचित करतो, तेव्हा युद्ध निश्चितच होते. स्वार्थ हा स्व प्रित्यर्थ असला की त्याचा नाश होतो व सर्वांप्रित्यर्थ असेल तेव्हा त्याचा विकास होतो.

भारताची सध्यस्थिती अतिशय अनुकूल आहे.इथली युवाशक्ती,नैसर्गिक संसाधने,ऋतुमान व येथील मानसिकतेतील अल्पसंतोषी वृत्तीची धारणा.भारतीय व्यक्ती पूजक असल्याने इथे पाप-पुण्य ही संकल्पना अल्पसंतोष निर्माण करते.त्यामुळे स्वार्थाचे प्रमाण हे संकुचित असते.याचा परिणाम युद्ध टाकण्यासाठी होतो.देशात हिटलर किंवा ट्रम्प सारखी निर्दयी वृत्ती निर्माण होऊ शकत नाही.दांभिकता मात्र नाकारता येत नसल्याने,मुखवट्यावाटे उपद्रव निर्माण करण्याची संधी येथे आहे.त्यामुळे दैव,धर्म व उच-नीच धारणा टिकून आहे.त्याच धोरणा आडून काटा काढला जाऊ शकतो.कारण आमने सामने लढण्याची तयारी होत आपली नाही.

मोहनदास करमचंद गांधीने या बाबत भारतीय मानसिकतेचा अभ्यास केला असावा, म्हणून त्यांनी अहिंसापथ धरून सभ्यता सांभाळणाऱ्या, इंग्रजांना दुसऱ्या महायुद्धाच्या अंतिम चरणात भारताला स्वतंत्र करण्याचा बेत आखला. चले जाव यशस्वी झाले.देश विना शस्त्रे स्वतंत्र झाला.ही जगातील पहिली क्रांती भारतात झाली. युद्ध जर डोक्यात असेल तर त्याचा उद्देश समजून घेतला पाहिजे,ते भौतिकतेच्या पूर्तत्वास्तव किंवा भावनिक अतृप्तीचा आकस तर नसेल ना!कारण ॲडॉल्फ हिटलर हा वंशवादात युद्ध छेडणारा तर मुसोलिनी सत्ता विस्तारात युद्ध खेळणारा होता.

डोनाल्ड ट्रम्प मात्र ऊर्जास्रोत ताब्यात ठेऊन जगाला बलशाली राष्ट्राचे प्रतिनिधित्व पटवून देण्याच्या नादात युद्ध करीत असेल ! तर मानवी हक्काची जाणीव झालेला प्रत्येक मानव ट्रम्प विरोधात युद्ध थांबण्यासाठी रस्त्यावर येणारच. ही संभाव्य युद्ध थांबण्याची लक्षणे आशादायी आहे.त्यामुळे 'संभवामीं युद्धे रुद्धे' म्हणणे आत्मविश्वासाचे वाटते.

अमेरिका किंवा सर्व आखाती देशाला भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवण्याची संधी येणाऱ्या काळात गणनेतृत्वातून स्वीकारावी लागेल. जे कार्य 'युनो' किंवा युनोस्को करण्यासाठी पूर्ण तयार नाही. भारत ही संधी नक्की घेऊन संभवामी युद्धे रुद्धे होईलच.बुद्धाचा देश युद्ध रोखण्यास सक्षम आहे.कारण आता रामाचा रामबाण,कृष्णाचे सुदर्शन आता काम करणार नाही.बुद्धाचा मानव धर्म जगाला आनंदाने जगायला प्रेरित करू शकतो.युद्ध विराम करण्याचे चिन्हे समजून घेतली जावी.युद्ध अक्षमतेचा परिणाम आहे.शांती हे सक्षमतेचे प्रमाण आहे.शांती साठी आम्ही युद्ध करणार नाही एवढी समज आता वाढत चालली आहे.जग जागे झाले त्यांना बुद्धच युद्ध सावरायला मदत करेल.कारण अफगाण इराण सारख्या देशाला बुद्धाचा परिचय आहे.

समाज माध्यमाच्या आधाराने आता जगाला संदेश देण्याची संधी ही संभवामी युद्धे रुद्धे आहेच! हाती न घेता तलवार । बुद्ध राज्य करी जगावर ।। त्यास कारण एक । प्रभावशाली प्रचारक ।। ही ओळ राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेते दिली आहे त्याचा प्रत्यय युद्ध जन्य स्थितीत जाणवत आहे जेव्हा लाखो अमेरिकन रस्त्यावर नो किंग म्हणत आहे,हेच संभवामी युद्धे रुद्धे !....

**डॉ.प्रवीणकुमार राऊत**
(समुपदेशन व मानसोपचार)
मो.७७९८६४५५६५

## कुंभ हवा; पण करवती आवरा!

**कुंभमेळ्यात नाशिकला नवी ओळख मिळते खरी; पण म्हणून जुनी ओळख का खोडून काढावी ? झाडांबाबत सध्या तेच घडते आहे.**



धर्म-अध्यात्माचा जागतिक उत्सव असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून नाशिक महानगरपालिका आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी पुन्हा एकदा वृक्षराजीकडे मोर्चा वळवला आहे. पुरातन, डेरदार वृक्षांची निष्ठूर कत्तल सुरू आहे, ज्यामुळे ' हरित नाशिक ' ही ओळख पुसली जाण्याची भीती आहे. दुर्दैवाने या खेपेला या त्याविरोधात लोकचळवळ उभी राहताना दिसत नाही. निवडक पर्यावरणवादी वगळता सारेच हताशपणे बघत आहेत. हे सारे शहराच्या मुळावर उठणारे आहे. मात्र, सत्ताधारी राजकीय व्यवस्था आणि बाबूशाहीच्या संगनमतापुढे जणू सारेच हतबल झाल्याचे दिसते.

काही महिन्यांपूर्वीच तपोवनातील अठराशे झाडे तोडण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर यावरून बरेच 'रामायण' घडल्यानंतर हा विषय 'ठंडा करके खाओ' नीतीनुसार हाताळण्यात आला. आता कोणती निवडणूक नसल्याने कसला अडथळाही नाही. त्यामुळे शहरभरातील रस्ते खोदल्यानंतर आता वृक्षांची कत्तर सुरू आहे. त्यासाठी विकासकामे आणि रस्ते रुंदीकरणाचे कारण दिले जाते. तपोवनातील संभाव्य वृक्षतोडीबाबत हरित लवादाने गंभीर निरीक्षण नोंदवले, नेमके त्याच दिवशी या वृक्षसंपदेवर चाल केली गेली. शेकडो यांत्रिक करवती, यंत्रे, ट्रक व अन्य सामग्रीसह तगडा फौजफाटा मैदानात उतरला आहे. आठ-दहा दिवसांत हजारेक झाडांचे नामोनिशाण मिटविण्याचा चंग यंत्रणेने बांधलेला दिसतो.

खुद्द मुख्यमंत्री नाशिकचा कुंभमेळा पर्यावरणपूरक, नशामुक्त व वैश्विक ठरणार असल्याचे सांगतात. संस्कृती आणि परंपरेचा सन्मान राखत एकजुटीने पुढे जाण्याची ग्वाही ते देतात. प्रत्यक्षात मात्र या सोहळ्यासाठी महापालिका आणि कुंभमेळा प्राधिकरण झाडांवर वरवंटा फिरवत आहेत. सिंहस्थासाठी शहराची नवी ओळख बनविताना जुनी ओळख मात्र पुसली जात आहे. केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर नाशिकच्या लौकिकाला नख लावण्याचे उद्योग सुरू आहेत. कॉंक्रिटीकरणाच्या विकासाची फळे चाखताना, खरीखुरी फळेफुले भुईसपाट केली जात आहेत.

काही लोकांना या वृक्षतोडीच्या विरोधात शड्डू ठोकायचे आहेत; परंतु सनातन परंपरेच्या आणाभाका दिल्या जात असल्याने 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' अशी त्यांची अवस्था झाली आहे. सोशल मीडियाचेसुद्धा अवसान गळाले आहे. काही झाडे रस्त्याच्या मधोमध आहेत. तेथे अपघात घडून अनेक प्रवाशांचा बळी गेला आहे. त्यामुळे 'सुंठेवाचून खोकला गेला' म्हणत काही रहिवासी या तोडीपासून अंतर ठेवून आहेत. बोटांवर मोजण्याइतकेच वृक्षप्रेमी प्रशासनाविरोधात उभे ठाकले आहेत. महाकाय वटवृक्षांच्या पुनर्रोपणाच्या पर्यायाची सक्षमपणे अंमलबजावणी झाल्यास काही प्रश्न नक्कीच सुटतील. परंतु, या किचकट भानगडीत यंत्रणेला पडायचे नसल्याने त्यावर फुली मारण्यात आली आहे. अर्थात, मागील कुंभमेळ्यासाठी हटवून इतरत्र लावली गेलेली अशी किती झाडे जगली, हासुद्धा संशोधनाचा विषय. बरे, काही शे-पन्नास वर्षे वयाच्या झाडांना न्यायालयाने अभय दिले असूनही यंत्रणा जुमानायला तयार नाही. भल्यामोठ्या क्रेनही उचलू न शकणारे महाकाय वृक्ष केवळ पाच-पंचवीस वर्षांचे असल्याचे दावे केले जात आहेत. तसे कागद आधीच रंगवले गेले आहेत. दर बारा वर्षांनी नाशिकचा कायापालट होतो, तेव्हा त्याचा पहिला आणि सर्वांत मोठा फटका हिरव्याकंच वृक्षसंपदेला बसतो. येथील संस्कृती, परंपरा व वारशाचा अविभाज्य भाग असलेली वृक्षराजी संपविणे हा जणू अजेंडा घेऊनच काही लोक काम करतात. सध्या रस्तोरस्ती कापून पडलेल्या झाडांच्या बुंध्याबांध्यांचे ढीग पाहून मन हेलावते. धर्माची भूमिका निसर्गाला पूरक राहिली आहे. विकासकामे नक्कीच हवी आहेत, परंतु, ती शाश्वत व निसर्गाशी नाते जपणारी असावीत. कारण तोच खरा धर्म आहे. आज अनेक डेरेदार वृक्ष अनाम, एकाकीपणे धारातीर्थी पडत आहेत. वृक्षतोडीला विरोध करणाऱ्या मोजक्या पर्यावरणप्रेमींची साद करवतींच्या कर्कश आवाजात हवेत विरून जात आहे. इतिहास मात्र या कृतघ्नपणाची नकोशी नोंद घेईल, हे प्रशासनाने लक्षात ठेवावे.(साभार म.टा)

**संपत थेटे**

## पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे हिमनद्या धोक्यात

हिमालयीन क्षेत्रातील हिमनद्या अत्यंत वेगाने वितळत असून २००० पासून बर्फ वितळण्याचा वेग दुप्पट झाला आहे. १९९० ते २०२० या काळात हिमालय पर्वतातील हिमनद्यांनी आपल्या क्षेत्राचा बारा टक्के भाग गमावल्याची धक्कादायक माहिती अलीकडेच एका आंतरराष्ट्रीय अहवालातून स्पष्ट झाली आहे. अलिकडेच नेपाळची राजधानी काठमांडू येथे जागतिक हिमनदी दिनाचे औचित्य साधून हिमनदी वितळण्याच्या वाढत्या धोक्याचा इशारा देणारे हे अहवाल प्रकाशित करण्यात आले. यातील प्रमुख अहवालानुसार १९७५ पासून आतापर्यंत हिमनद्यांच्या बर्फाची जाडी २७ मीटरपर्यंत कमी झाली असे म्हटले गेले. वेगाने बदलणाऱ्या बर्फाच्छादित प्रदेशाचे परिणाम कमी करण्यासाठी हिमनद्यांच्या निरीक्षणात मोठी वाढ करणे याशिवाय इतर उपायांची चर्चा केली गेली. हिमनद्या वितळण्याचा धोका केवळ भारतालाच नसून हिमालयाच्या कुशीत वसलेल्या नेपाळ, भूतान यासारख्या देशांनाही आहे. त्याचबरोबर पाकिस्तान, बांगलादेश यांच्यामध्ये हिमनद्यांचे पाणी वाहत जाते. त्यांनाही संभाव्य धोका असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या खोऱ्यांमधील हिमनद्या सर्वाधिक असुरक्षित असल्याचे स्पष्ट होत आहे. या नद्यांवरील संकट संपूर्ण आशिया खंडासाठी मोठे संकट ठरू शकते, असा इशाराही या अहवालांमध्ये देण्यात आला आहे. या नद्या कोट्यवधी लोकांच्या अन्न, पाणी, ऊर्जा आणि उपजीविकेचा आधार आहेत. आशियातील किमान दहा प्रमुख नद्यांचे उगमस्थान हिमालयातच आहे. वाढत्या पर्यावरण ऱ्हासाचा हिमनद्यांवर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळेच नैसर्गिक संकटांच्या मालिका या भागातील जनतेवर ओढवत आहेत. त्यातून जीवित आणि वित्त हानी मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. त्यामुळेच हवामान अनुकूल नियोजनासाठी मोठी गुंतवणूक करणेदेखील आता काळाची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

# मनस्पर्शी दृश्यानुभव!

## विरेंद्र चोपडे यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन





**भक्ती, प्रेम, राग, लोभ, दुःख, वेदना, रितेपणा, विरह, वियोग, आशा, अपेक्षा आणि आकांक्षा अशा अवस्थांना निसर्गातील आकारांच्या साहाय्याने चित्रित करण्याची अद्वितीय क्षमता विरेंद्र चोपडे या सर्जनशील चित्रकारामध्ये आहे. चोपडे यांच्या कलाकृती पुण्यातील मोनालिसा कलाग्राममध्ये भरविण्यात आलेल्या 'अफोर्डेबल आर्ट एक्झिबिशन'मध्ये प्रदर्शित करण्यात आल्या आहेत.**

फ्लॉवर सेलर- दैनंदिन जीवनातील साध्या प्रसंगांमध्येही एक अंतर्मुख, आध्यात्मिक आणि भावनिक क्षण दडलेला असतो. नेमका तोच क्षण चित्रकाराने पकडून मानवी जीवनातील सहजता, श्रद्धा आणि वास्तव यांच्यातील संबंध उलगडून दाखविण्याचा प्रयत्न 'फ्लावर सेलर' या चित्रातून केला आहे. चित्रात फुले विकणारी स्त्री साकारतांना, खडबड पोतमय चाफ्याच्या पानाला देवाचे रुप दिले आहे. तिची सर्व फुले विकली जावीत, याकरिता ती अवकाशातील देवरुपी पानाकडे बघून प्रार्थना करीत आहे. परंतू तिचा व्यवसाय फुले विकण्याचा असल्यामुळे तिची प्रार्थना उपजीविकेशी जोडलेली आहे. चित्रात आवश्यक घटकांची रचना करतांना खाली प्रतीकात्मक मानवाकृती आणि वर निसर्गरुपी देव असे अर्थपूर्ण संयोजन केले आहे. त्यामुळे सृष्टी आणि सृष्टीनिर्माता यांच्या नात्यातील भिन्नता अधिक स्पष्ट झाली आहे. चित्रातील साधेपणा आणि सुबक मांडणी हा चित्राचा स्थायीभाव आहे. रंगलेपनात मॅगनिज आणि सेरुलियनसारख्या विविध निळ्या रंगछटांमुळे शांततेचा भाव प्रस्थापित झाला आहे, तर पांढऱ्या, पिवळ्या आणि गडद लाल रंगांच्या आकर्षक चाफ्याच्या फुलांनी प्रसन्नता निर्माण केली आहे. एकूणच माणसाला श्रद्धेचा आधार घेऊन जगण्यासाठी करावी लागणारी धडपड आणि त्याचे निसर्गाशी असलेले नाते कलाकृतीतून अधोरेखित झाले आहे.

प्रेयर- चित्रकाराने 'प्रेयर' या कलाकृतीत स्वतःचे प्रतीकात्मक चित्रण केले आहे. चित्रकाराच्या मनातील इच्छा पुर्ण व्हाव्या, याकरिता मानवाकृती देवाकडे प्रार्थना करतांना दाखविली आहे. अंतर्मनातून केलेली प्रार्थना शांत आणि मनाला स्पर्शणारी असते, त्यामुळे मानवी आकृतीत ओठ नाहीत. विशेषतः चित्र संयोजन करतांना आवश्यक तितक्याच घटकांचा वापर करुन, चित्रकाराच्या मनातील असंख्य इच्छा आणि आकांक्षा व्यक्त करण्यासाठी आकृतीच्या हातात फुले दाखविली आहेत. चित्रामध्ये वरच्या भागात देवरुपी चाफ्याचे पान आणि खालच्या भागातील 'स्त्री'च्या आकृतीमुळे नजर आपोआपच आकृतीकडून पानाकडे आणि पुन्हा पानाकडून इतर घटकांकडे फिरत राहते. एकसंध आणि संतुलित वाटणाऱ्या या चित्रामध्ये प्रार्थनेचा भाव दर्शविण्यासाठी निळा रंग तर इच्छा आणि आकांक्षा यासाठी पिवळ्या आणि पांढऱ्या रंगांचा वापर केला आहे. अत्यंत साधी, सोपी रचना आणि मर्यादित रंगसंगती असलेली ही कलाकृती 'मिनिमलिस्टिक' वाटते.

स्टे अवे फ्रॉम फ्लॉवर- वाढते शहरीकरण, जंगलतोड, औद्योगिकीकरण, प्रदूषण, संसाधनांचा अतिरेकी वापर आणि हवामानातील बदल यामुळे निसर्गाचा समतोल धोक्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर निसर्गाचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. या आशयाचा संदेश देणारी 'स्टे अवे फ्रॉम फ्लॉवर' ही कलाकृती अतिशय बोलकी आहे. चित्रात मध्यवर्ती रचना केलेल्या मानवाकृतीसाठी चाफ्याचे पान केवळ निसर्गाचा भाग नाही, तर आसरा, सानिध्य आणि शांततेचे प्रतीक म्हणून पुढे आले आहेत. चित्राच्या डाव्या भागात निसर्गावर आक्रमण करणारी मानवनिर्मित शक्ती ही बाणाच्या रुपात चित्रित केली असून, या बाणांपासून निसर्गातील घटकांना वाचविण्यासाठी मानवाकृतीने पानाला घट्ट कवटाळले आहे. अर्थातच 'फुलांपासून दूर राहा' हा संदेश कलाकृतीतून देत असतांना, रक्षणकर्त्यांच्या दृढ उपस्थितीपुढे वाकलेल्या बाणाच्या टोकांतील मंदावलेली तीक्ष्णता लक्ष वेधून घेते. यातून निसर्गरक्षणाच्या शक्तीसमोर विध्वंसक शक्ती देखील नम्र होऊ शकतात; हे कलाकृतीच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्यात चोपडे यशस्वी झाले आहेत. मानवाकृती, पान आणि फुल यांनी चित्रातील उजव्या बाजूचा एक तृतीयांश भाग व्यापलेला आहे, तर डाव्या भागातील बाणांनी अत्यल्प जागा घेतल्यामुळे चित्रात संतूलन राखता आले. रक्षण आणि शौर्य हा कलाकृतीचा गाभा आहे, त्यासाठी चित्रात लाल आणि तपकीरी या उष्ण रंगछटांचा प्रभावी वापर केला आहे.





अनटायटल्ड- मानवी अस्तित्व, अंतर्मनाचा शोध आणि मानवाचे निसर्गाशी असलेले नाते या जीवनानुभूतींना 'अनटायटल्ड' या चित्रातून उलगडून दाखविले आहे. पार्श्वभूमीतील मंद चंद्रप्रकाश आणि टिमटिमणाऱ्या तारांच्या शांत वातावरणात चाफ्याच्या पानावर विसावलेली मानवाकृती फुलाशी संवाद साधतांना दिसत आहे. चित्राची रचना करतांना खालच्या भागातील मानवाकृती आणि वरच्या भागातील चंद्र आणि ताऱ्यांमुळे विरोधाभास निर्माण झाला आहे. शांतता, अंतर्मुखता आणि आध्यात्मिक गुढता व्यक्त करण्यासाठी निळ्या रंगछटा,तर नव्या जीवनाची सुरुवात आणि नैसर्गिक उर्जेसाठी हिरव्या रंगछटांचा वापर केला आहे. सपाट रंगलेपनामुळे पानावरील सुक्ष्म पोत आणि आकाशातील चांदणे एकमेकांना पुरक वाटतात. एकूणच माणसाच्या भावविश्वातील गुंतागुंत आणि आत्मपरिक्षणाची प्रक्रीया कलाकृतीमधून प्रकर्षाने जाणवते. ही कलाकृती केवळ दृष्यानुभव देत नाही, तर निसर्गाशी एकरुप होण्यासाठी मानवी अस्तित्व आणि अंतर्मनाचा शोध घेऊन शांततेकडे वाटचाल करण्याचा मौलिक संदेश देखील देते.



चोपडे हे मुळात संवेदनशील चित्रकार आहेत. त्यांची ही संवेदनशीलता त्यांच्या कृतिशील जीवनशैलीचा एक अविभाज्य भाग बनली आहे; आणि म्हणूनच त्या अंतःप्रेरणेतून जीवनाच्या सर्वांगाला अलगद स्पर्श करणाऱ्या सुंदर कलाकृती सातत्याने जन्माला येतात.

**आशिष यावले**
मो. ९९२२२९००२

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच



# डाबकी रोड जळीत प्रकरणाचा थरारक उलगडा

## पत्नीचा खून करून जाळला मृतदेह : पतीसह तिघे अटकेत

■ प्रतिनिधी | अकोला ■

**डाबकी रोड पोलीस ठाणे हद्दीत सापडलेल्या अज्ञात महिलेच्या अर्धवट जळालेल्या मृतदेहाच्या प्रकरणाचा पोलिसांनी वेगाने तपास करत धक्कादायक उलगडा केला आहे. कौटुंबिक वादातून पतीनेच पत्नीची हत्या करून मृतदेह जाळून ओळख लपविण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले असून, या गुन्ह्यात पतीसह आई आणि जावयालाही अटक करण्यात आली आहे. या घटनेने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.**



६ एप्रिल रोजी अन्नपूर्णा माता मंदिराजवळील फर्स्ट चॉईस गॅरेज परिसरातून पूर्वेकडे जाणाऱ्या कच्च्या लेआउट लगत एका महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला होता. विशेष म्हणजे मृतदेहाचा चेहरा जाळून ओळख पटू नये, यासाठी मुद्दाम प्रयत्न करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यामुळे हा खून असून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली होती.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके आणि डाबकी रोड पोलीस ठाण्याचे निरीक्षक दिपक कोळी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके स्थापन करण्यात आली. मृत महिलेची ओळख पटविणे हे पोलिसांसमोरचे मोठे आव्हान होते. यासाठी शोधपत्रिका तयार करून ती शहरात, तसेच व्हॉट्सअ‍ॅप व इतर समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर प्रसारित करण्यात आली.

तपास सुरू असतानाच ८ एप्रिल रोजी सादिक शहा (वय २९, रा. नांदखेडा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम) हा स्वतःहून डाबकी रोड पोलीस ठाण्यात हजर झाला. पत्नी रविना मोहन पवार (वय २४) हिच्यासोबत झालेल्या वादातून तिचा खून करून मृतदेह जाळल्याची कबुली त्याने दिली. या कबुलीनंतर पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित करत घटनेचा सखोल छडा लावला.

तपासात उघडकीस आले की, आरोपी सादिक शहा आणि त्याची पत्नी रविना यांच्यात काही दिवसांपासून वाद सुरू होते. या वादातूनच संतापाच्या भरात सादिकने पत्नीची हत्या केली. त्यानंतर गुन्हा लपविण्यासाठी मृतदेह जाळण्याचा निर्णय घेण्यात आला. या वेळी आरोपीची आई नुराबी शहा (वय ५९) ही घटनास्थळी उपस्थित होती आणि तिनेही या कृत्यात साथ दिल्याचे निष्पन्न झाले. इतकेच नव्हे, तर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी आरोपीचा जावई इरफान शहा (वय ३५, रा. इंदिरा आवास, बार्शिटाकळी, जि. अकोला) यानेही मदत केल्याचे तपासात स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून सादिक शहा याला ८ एप्रिल रोजी अटक केली, तर नुराबी शहा आणि इरफान शहा यांना ९ एप्रिल रोजी ताब्यात घेतले.

अटकेनंतर तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या कालावधीत गुन्ह्याशी संबंधित आणखी तपशील, पुरावे आणि हेतू स्पष्ट करण्यासाठी पोलिसांकडून सखोल चौकशी केली जाणार आहे.

दरम्यान, या घटनेतील सर्वात हृदयद्रावक बाब म्हणजे मृतक रविना हिचे अवघे १० ते १५ दिवसांचे बाळ 'कबीर'. आईच्या मृत्यूनंतर या निष्पाप बालकाची जबाबदारी प्रशासनावर आली आहे.

८ एप्रिल रोजी बाळाला उपचारासाठी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्याच्या प्रकृतीवर वैद्यकीय अधिकारी लक्ष ठेवून आहेत. डिस्चार्ज मिळाल्यानंतर बालकल्याण समितीच्या मार्गदर्शनाखाली बाळाची काळजी घेण्यासाठी उत्कर्ष शिशुगृहात ठेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. डाबकी रोड पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत कमी वेळेत हा गुन्हा उघडकीस आणत आरोपींना अटक करण्यात यश मिळविले आहे.

## अकोला–वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. जयराज कोरपे बिनविरोध



### उपाध्यक्ष पदी रामेश्वर ठाकरे यांची वर्णी

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत डॉ. जयराज संतोषकुमार कोरपे यांची अध्यक्षपदी, तर रामेश्वर सुभाषराव ठाकरे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

बँकेच्या सिव्हील लाईन येथील सभागृहात गुरुवारी (दि. ९ एप्रिल २०२६) नवनिर्वाचित संचालक मंडळाची सभा पार पडली. निवडणूक प्रक्रियेचे अध्यासी अधिकारी म्हणून गितेशचंद्र साबळे यांनी कामकाज पाहिले. जाहीर कार्यक्रमानुसार अध्यक्षपदासाठी डॉ. कोरपे आणि उपाध्यक्षपदासाठी ठाकरे यांचे अर्ज एकमेव प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. या वेळी बँकेचे संचालक डॉ. संतोषकुमार कोरपे, गोपाल काकड, अजिंक्य राऊत, कल्पना पाचपोर, अरविंद इंगोले, रामेश्वर वाघ, अनिल जाधव, जावेद उल्लाह खान, डॉ. धिरज देशमुख, उषाताई हिंगणकर, संदीप खारोडे, अभिषेक तिडके, धनंजय गोरे, शोभाताई झनक, नितीन जाधव, विश्वनाथ ताथोड, ललित बहाळे, गिताबाई ठाकरे, अपर्णा धोत्रे आदी उपस्थित होते. निवडीनंतर अध्यक्ष डॉ. कोरपे व उपाध्यक्ष ठाकरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांचीही उपस्थिती होती.

**Change In Name**
My Old name was
**MARIYAM BI SYED BHURU**
My New name is
**MARIYAM KHATOON MOHAMMAD KHAN**
Address Gandhi Maidan Tekdi puar Akot
Dist Akola
444101 (MS)

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

### महसूल मंत्र्यांच्या उपस्थितीत लक्षेश्वर संस्थान येथे मेळावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे भव्य आयोजन उद्या १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता

मुर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी मंडळ, लक्षेश्वर संस्थान येथे करण्यात आले आहे.

नागरिकांच्या तक्रारी तत्काळ सोडवण्याचे उद्देशाने, तसेच त्यांना विविध सेवा व योजनांचा लाभ मिळवून देण्याचे उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रलंबित तक्रारींची निराकरण याद्वारे होणार आहे. या शिबिराला अनेक मान्यवर उपस्थित राहतील. सर्व संबंधित यंत्रणांचा शिबिरात सहभाग असेल.

या शिबिरात नागरिकांच्या महाराजस्व समस्या तात्काळ सोडवल्या जातील. तरी नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे

**जाहीर सुचना**

सर्व जनतेस, बँक व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की शरीफाबी शेख सुलेमान रा. पारस ता. बाळापुर जि. अकोला ह्यांनी चोलामंडलम इनवेस्टमेंट अँड फायनान्स कं. लि. येथे खालील वर्णनाची मालमत्ता गहाण ठेऊन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे ग्रा. पं. व पारस ता. बाळापुर जि., अकोला च्या हद्दीतील मालमत्ता क्र. ३८८७/ब ज्याचे क्षेत्रफळ ९२.९३ चौ.मी. असून ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : खुला प्लॉट, पश्चिमेस : रस्ता, ऊत्तरेस : खुला प्लॉट, व दक्षिणेस : खुला प्लॉट.

वर नमुद मालमत्ता दि. २०/०७/२०२३ रोजीच्या मुळ करारनाम्या नुसार तन्वीर अहमद गुलाम गौस यांनी अब्दुल राजिक गुलाम गौस यांच्या कडून खरेदी केली होती व नंतर तन्वीर अहमद गुलाम गौस यांच्याकडून सदर मालमत्ता शरीफाबी शेख सुलेमान यांनी खरेदीखत दस्त क्र. ५३ दि. ०६/०१/२०२५ नुसार खरेदी केली आहे . दि. २०/०७/२०२३ रोजीच्या मुळ करारनाम्याचे चुकविलेले मुद्रांक शुल्क व त्यावरील दंड हा दि. ०८/०४/२०२६ रोजी कायदेशीर रित्या भरण्यात आला आहे.

त्याअर्थी वरील मालमत्तेवर जर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप अथवा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०९/०४/२०२६

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

## तेल्हारा–माळेगाव मार्गावर प्रशासनाचा निष्काळजीपणा

### इशाऱ्यानंतरही दुर्लक्ष, गौणखनिजाच्या ढिगामुळे अपघात

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

'अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होते का?' हा संतप्त सवाल आता तेल्हारा–माळेगाव बाजार मार्गावरील नागरिक विचारत आहेत. रस्त्याच्या मधोमध टाकून दिलेल्या गौणखनिजाच्या ढिगाकडे वारंवार लक्ष वेधूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अखेर अपघात घडला. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी या घटनेने प्रशासनाच्या बेफिकीरीचे गंभीर चित्र समोर आले आहे.

काही दिवसांपूर्वी अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्यांनी कारवाईच्या भीतीने हा ढीग रस्त्याच्या मध्यभागीच टाकून पळ काढला होता. त्यानंतर हा ढीग तसाच पडून राहिला. विशेष म्हणजे, संबंधित विभागांना याची माहिती असतानाही तो हटविण्याची साधी तसदीही घेण्यात आली नाही.

याच गंभीर धोक्याबाबत 'दै. जनमाध्यम'ने कालच सविस्तर बातमी प्रसिद्ध करून संभाव्य अपघाताचा इशारा दिला होता. मात्र, प्रशासनाने त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने आज रात्रीच्या सुमारास वाहनचालकाला



हा ढीग न दिसल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि अपघात घडला. या घटनेत वाहनाचे मोठे नुकसान झाले असून चालक किरकोळ जखमी झाला आहे.

दरम्यान, या मार्गावरून नियमित प्रवास करणारे नागरिक संतप्त झाले असून प्रशासनाच्या उदासीन कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. स्थानिक नागरिक चेतन पिंजरकर यांनी संताप व्यक्त करताना सांगितले, 'हा ढीग आम्ही अनेक दिवसांपासून पाहतो आहोत. कालच याबाबत बातमी आली, तरीही कोणी हलले नाही. आता अपघात झाल्यानंतर तरी प्रशासन जागे होणार का?' या घटनेनंतर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वारंवार इशारे देऊनही कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**अपघातानंतरच कारवाई का?**

रस्त्यांवरील धोके वेळेवर दूर करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असताना, निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आता तरी संबंधित विभागांनी तात्काळ दखल घेऊन रस्त्यावरील गौणखनिजाचा ढीग हटवावा आणि जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## ह्यूमन राईट जस्टीस असो.ने केला कर सहायक कु. उपरवट हिचा गौरव

■ प्रतिनिधी | अकोला ■

आपल्या जिद्द,चिकाटी व परिश्रमाने बिकट स्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत रित्या उत्तीर्ण होऊन शासनाच्या कर सहायक पदी नियुक्ती झाल्याबद्दल कु प्रीती अरुण उपरवट हिचा ह्यूमन राईट जस्टीस असो.नवी दिल्ली ने गौरव केला.असो.च्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांनी असो.चे जिल्हाध्यक्ष रवींद्र नंदकुमार गवई यांच्या पुढाकारात कु. प्रीती उपरवट हिच्या स्थानिक सागर कॉलनी येथील निवासस्थानी उपस्थित होऊन तिचा गौरव करून शुभेच्छा प्रदान केल्यात.यावेळी असो.चे राष्ट्रीय अध्यक्ष संघपाल शिरसाट,जिल्हा महिला अध्यक्ष सौ हर्षा खंडारे, विदर्भ उपाध्यक्ष राज विलास वानखडे,जिल्हा उपाध्यक्ष वसंत निखाडे, महिला सचिव सुरेखा राऊत, सचिव राजेश खांडेकर,संघटन सचिव प्रभाकर कवडे, कोषाध्यक्ष संजय मेश्राम, सहसचिव सुरेश मोरे, प्रसिद्धी प्रमुख अमोल खैरे आदी उपस्थित होते.

## होमगार्ड तालुका प्रभारी समादेशकपदी सुधाकर कराळे यांची नियुक्ती

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर येथील होमगार्ड पथकात गेल्या एक वर्षापासून प्रभारी समादेशक हा पदभार संतोष ढबारे (बाळापूर) यांच्या कडे सोपविण्यात आला होता.त्यामुळे पातूर येथील होमगार्डना कार्यालयीन कामकाजासाठी बाळापूर येथे वारंवार जावे लागत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता.ही बाब अकोला जिल्हा होमगार्ड समादेशक तथा,अपर पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांतजी रेड्डी यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ दखल घेतली.जिल्हा समादेशक चंद्रकांतजी रेड्डी त्यांच्या आदेशानुसार तसेच प्रशासिक अधिकारी अशोक आसोलकर, कार्यालयीन लिपिक प्रमुख शिवाजी आघाव, कनिष्ठ लिपिक अभिषेक देशमुख,प्रशिक्षण



अधिकारी सुनील पोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ मार्च २०२६ रोजी पातूर पथकातील होमगार्ड सुधाकर विश्वनाथ कराळे यांच्याकडे पातुर तालुका प्रभारी समादेशक पदभार सोपविण्यात आला.सुधाकर कराळे यांच्या नियुक्तीमुळे पातूर पथकात समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.दि.५ एप्रिल २०२६ रोजी साप्ताहिक कवायतीदरम्यान उपस्थित होमगार्डच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यापूर्वी आठ वर्षे पातुर पथकाचा प्रभारी समादेशक पदभार संगीता इंगळे यांनी योग्यरीत्या सांभाळला होता.यावेळी माजी तालुका प्रभारी समादेशक संगीता इंगळे यांनीही सुधाकर कराळे यांना शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी उपस्थित होमगार्डच्या चेहऱ्यावर समाधान आणि उत्साह दिसून येत होता.सुधाकर कराळे यांच्या नियुक्तीमुळे पातूर पथकात खेळीमेळीचे व सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.या सत्कार समारंभ कार्यक्रमाला पातुर पथकातील महिला व पुरुष होमगार्ड उपस्थित होते

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५०९/२०२६ प्रोसेस नं.४४५८/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ दिनांक : ०२/०४/२०२६

**अर्जदार :** १. सरला अशोककुमार लोहीया रा. ए-६०१, सुप्रीम पाल्म्स, कम्फर्ट झोन समोर, बालेवाडी, पुणे सिटी, पुणे. ४११०४५ कायमचा पत्ता- २०३, माथने सुर्या संकुल, रघुवंशी मंगल कार्यालयासमोर, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. २. रविकुमार अशोककुमार लोहीया रा. २०३, माथने सुर्या संकुल, रघुवंशी मंगल कार्यालयासमोर, रतनलाल प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला. ३. अर्चना तपन सिंघल रा. फ्लॅट नं. ९०३, ९वा मजला, प्राईड पॅनोरमा, सिरि. नं. १०३. पीटी. नं. १/२/३/४, बहिरत वाडी, पुणे सिटी, पुणे ४११०१६ ४. अर्पणा विशाल एरोन रा. ए-९०२, सुप्रीम पाल्म्स, बानेर, पुणे. पुणे सिटी, पुणे. ४११०४५ ५. तृप्ती सदांशु शंकर रा. ए-९०१, सुप्रीम पाल्म्स, कंम्फर्ट झोन समोर, बालेवाडी, पुणे सिटी, पुणे. ४११०४५ ६. नेहा अशोककुमार लोहीया रा. ए-६०१, सुप्रीम पाल्म्स, कम्फर्ट झोन जवळ, बालेवाडी बानेर, पुणे सिटी, पुणे. ४११०४५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता : -** मयत : अशोककुमार हिरालाल लोहीया
**पत्ता : -** रा. २०३, माथने सुर्या संकुल, रघुवंशी मंगल कार्यालयासमोर, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोककुमार हिरालाल लोहीया यांचे दि. ०२/११/२०२५ रोजी ए-६०१, सुप्रीम पाल्म्स, बालेवाडी, पुणे सिटी, पुणे ता. जि. पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १२६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# यावलखेडमध्ये घरगुती वादातून विवाहितेचा खून

### आरोपी पतीला तासाभरात बेड्या

■ प्रतिनिधी | अकोला ■

**जिल्ह्यातील बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या यावलखेड येथे गुरुवारी सकाळी धक्कादायक घटना घडली. घरगुती वादाच्या पार्श्वभूमीवर पतीनेच पत्नीवर चाकूने हल्ला करत तिची निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अवघ्या एका तासात अटक करून तत्परतेचे उदाहरण घालून दिले.**



मिळालेल्या माहितीनुसार, अनिल ओंकार निंभोकार (वय ४२, रा. यावलखेड) याने कौटुंबिक वादातून पत्नी वृषाली अनिल निंभोकार (वय ३२) हिच्यावर चाकूने हल्ला केला. सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास झालेल्या या हल्ल्यात वृषाली गंभीर जखमी झाली. तिला तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात अप क्रमांक २८०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गुन्हा घडताच आरोपी पती अनिल निंभोकार हा अकोल्यातून फरार होण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. प्रभारी ठाणेदार पोलीस निरीक्षक अजित जाधव यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांना कळविले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने रवाना करण्यात आले.

पोलिसांनी जलद हालचाल करत आरोपीचा शोध घेतला आणि त्याला अकोला येथील सर्वोपचार रुग्णालय परिसरातून ताब्यात घेतले. त्यानंतर पुढील कारवाईसाठी आरोपीला बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोलीस निरीक्षक अजित जाधव यांच्यासह उपनिरीक्षक गोपाल जाधव, विष्णु बोडखे तसेच अंमलदार सुलतान पठाण, गोकुळ चव्हाण, मोहम्मद आमीर आणि अशोक सोनवणे यांनी या मोहिमेत सहभाग घेतला. या घटनेमुळे यावलखेड परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, घरगुती वादातून होणाऱ्या अशा टोकाच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. पुढील तपास बोरगाव मंजू पोलीस करीत आहेत.

# वर्धा येथे काँग्रेसमध्ये गटांची सरशी; जिल्हाध्यक्ष निवडीत राजकीय रंगत

## शेंडे-कांबळे-टोकस समीकरण; काँग्रेसच्या सत्तासंघर्षाला वेग

**वर्धा/ रवींद्र लाखे**

पूज्य महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांनी नटलेली, कधी काँग्रेसचा अभेद्य किल्ला म्हणून ओळखला जाणारा वर्धा जिल्हा काँग्रेस आज गटबाजीच्या भूकंपाखाली धरला गेला आहे. जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक नेत्यांच्या जोरदार हालचाली आणि गटांच्या राजकीय वरातांनी पक्षाच्या आतल्या ढिगाऱ्यावर आगीसारखे झपाटलेले आहेत.

शेखर शेडे, शैलेश अग्रवाल, अनंत मोहोड, अभ्युदय मेघे, सुनिल कोल्हे, प्रविण हिवरे, हेमलता मेघे, मनोज वसु आणि चंद्रशेखर झोरे, हे काही नामांकित नावें, ज्यांनी आपली दावेदारी मांडली आहे. प्रत्येक गट आपल्या वरातीत सत्तेचा पत्ता कट करण्याचा सूप उकळवतोय. काँग्रेसच्या या गटबाजीच्या मांडवात आता कोण जिंकणार हा प्रश्न नव्हे, तर कोणाचं लग्न कोसळणार असा भयकारक अंदाज व्यक्त केला जातोय.

ऑब्झर्वर आमदार श्वेता सिंग या जिल्ह्यात फेरफटका मारत कार्यकर्त्यांशी संवाद साधून योग्य उमेदवार शोधण्याचा आढावा घेत आहेत. पण अनुभव सांगतो की, औपचारिकतेच्या पलीकडे हा शोध फारसा प्रभावी ठरणार नाही. कारण गटबाजी इतकी खोलवर रुजली आहे की, कोणताही जिल्हाध्यक्ष फक्त एखाद्या गटाचा 'बाहुला' ठरेल, असे अनेक कार्यकर्ते मान्य करतात.

पूर्वी शेंडे विरुद्ध कांबळे संघर्षाने जिल्ह्यात काँग्रेसच्या बांधणीत तडे निर्माण केले, आणि आता नव्या 'टोकस' गटाच्या उदयाने राजकीय समीकरण बदलले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, कालपर्यंत कांबळे विरोधी शेंडे गट आता थेट टोकसच्या मांडवात सामील झाला आहे. म्हणजे शेंडेंची वरात थेट टोकसच्या मांडवात पोहोचली आहे. यामुळे कांबळे गट एकाकी पडला असून, टोकस गटाचा दबदबा वाढला आहे.

जिल्हा काँग्रेसच्या 'सत्ताकारणात' टोकस गट आता किंगमेकर बनत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. पक्षश्रेष्ठींनीही याची दखल घेतली असून, नव्या जिल्हाध्यक्षाच्या निवडीत टोकस गटाचा वरचष्मा राहणार, असे ठोस संकेत समोर येत आहेत.

वर्ध्यातील काँग्रेसची पकड सैलावली असून, विरोधकांनी याचा पुरेपूर फायदा घेतला आहे. मात्र, नेते अजूनही गटबाजीच्या मांडवात गुंतलेले दिसतात. घर जळत असताना भांडणाऱ्या मालकांसारखी काँग्रेसची अवस्था झाली आहे, कार्यकर्त्यांचा राग, जनतेची नाराजी आणि सत्तेच्या लालचाने पक्ष उघड्यावर आलेला दिसतो.

वास्तविक, वर्धा काँग्रेससाठी ही निवड फक्त पदाची निवड नाही, तर अस्तित्वाचा प्रश्न ठरली आहे. गटबाजी थांबली नाही, तर जिल्हा काँग्रेसच्या बांधणीत होणारा धक्का अशी आहे की, पुढचा अध्यक्ष फक्त एका गटाचा आधिपत्याचे साधन ठरणार, आणि पक्षाची प्रतिमा जनतेसमोर अजून ढासळलेली दिसणार जिल्हाध्यक्ष निवड ही काँग्रेससाठी 'टर्निंग पॉइंट' ठरणार की आणखी एक 'वेडिंग' ठरणार, हे पाहणे महत्त्वाचे आहे. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे: जर गटबाजीवर नियंत्रण आले नाही, तर वर्ध्यात काँग्रेसचा मांडव कोसळणे, वरात उध्वस्त होणे आणि पक्षाची अखंडता फाटणे, यापासून कोणाचंही बचाव शक्य नाही.

वर्धा जिल्ह्यात आज राजकीय संघर्ष, दबदबा आणि सत्तेची कबाडखोरी इतकी स्पष्ट झाली आहे की, एकेक गट जिवंत वरात घेऊन सत्ता उध्वस्त करण्यासाठी सज्ज आहे. काँग्रेसच्या नेत्या आणि कार्यकर्त्यांवर आता इतिहास लिहायचा आहे, किंवा आपली सत्ताच गमवायची आहे, हा निर्णय येणाऱ्या जिल्हाध्यक्ष निवडीवर ठरणार आहे.

# ४५ दिवसांची गॅसची 'सजा'

## उज्वला महिलांचा संताप उसळला

**साहूर/ जनमाध्यम**

ग्रामीण भागातील उज्वला गॅसधारक महिलांसाठी स्वयंपाकाचा गॅस आता मोठे संकट ठरत आहे. गॅस सिलेंडर बुकिंगसाठी लावण्यात आलेली ४५ दिवसांची मर्यादा गृहिणींसाठी अक्षरशः डोकेदुखी ठरत असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

साहूर व परिसरातील नागरिकांना विशेषतः उज्वला योजनेतील महिलांना गॅस टंचाईचा मोठा फटका बसत आहे. ज्यांच्याकडे एकच सिलेंडर आहे, त्यांना तब्बल ४५ दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याने घरगुती स्वयंपाकाचा प्रश्न गंभीर बनला आहे. दोन सिलेंडर असणाऱ्यांनाही ३५ दिवसांची मर्यादा असल्याने अडचणी कायम आहेत.पूर्वी २१ ते ३० दिवसांत मिळणारा सिलेंडर आता ४५ दिवसांनंतरही वेळेवर मिळत नसल्याने गृहिणींच्या अडचणीत भर पडली आहे. बुकिंग केल्यानंतर तत्काळ डिलिव्हरीचा संदेश मिळतो, मात्र प्रत्यक्षात सिलेंडर मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.दरम्यान, काही ठिकाणी गॅसचा काळाबाजार होत असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला असून वितरक आणि प्रशासनाविरुद्ध नाराजीचा सूर उमटत आहे. सण-उत्सव, जयंती, लग्नसमारंभ सुरू असताना गॅसचा तुटवडा अधिकच प्रकर्षाने जाणवत आहे.या परिस्थितीत अनेक गृहिणींना पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली असून, लाकूड गोळा करण्यासाठी जंगलाकडे वळावे लागत आहे. त्यामुळे उज्वला योजनेचा उद्देशच धोक्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे.ग्रामस्थांनी शासनाकडे गॅस बुकिंगची मर्यादा ४५ दिवसांवरून कमी करून २१ ते २५ दिवसांपर्यंत आणावी, तसेच गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा हा प्रश्न आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# वर्धा येथे राष्ट्रपतींच्या आगमनाची लगबग

## दीक्षांत सोहळयाला ऐतिहासिक स्वरूप

**वर्धा/ जनमाध्यम**

"महात्मा गांधी हिंदी आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालयाच्या सहाव्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने वर्ध्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरू आहे. गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:२५ वाजता टागोर सांस्कृतिक संकुलातील निराला प्रेक्षागृहात हा समारंभ पार पडणार आहे.

राष्ट्रपती या विश्वविद्यालयाच्या कुलाध्यक्ष म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असून दीक्षांत भाषण देणार आहेत. या सोहळ्यास महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे शिक्षण राज्यमंत्री व वर्ध्याचे पालकमंत्री पंकज भोयर तसेच प्रा. सुरेंद्र दुबे हे उपस्थित राहणार आहेत.

कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांच्या हस्ते दीक्षांत उपदेश दिला जाणार आहे.या विश्वविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच राष्ट्रपतींची उपस्थिती लाभत असल्याने हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदके व शैक्षणिक सन्मान प्रदान केले जाणार आहेत. यापूर्वी २००७ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी येथे भेट दिली होती.दरम्यान, राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विश्वविद्यालय परिसरात सजावट, स्वच्छता आणि पायाभूत सुविधांची उभारणी वेगात सुरू आहे. जिल्हा प्रशासनाकडून सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेची विशेष आखणी करण्यात आली असून पोलीस बंदोबस्त कडक करण्यात आला आहे.

विविध समित्यांच्या माध्यमातून कार्यक्रमाचे नियोजन काटेकोरपणे केले जात आहे. वर्ध्यातील नागरिकांमध्ये या ऐतिहासिक क्षणाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा -** हमदापूर येथे राहत्या घरी युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली. मंगेश राजूरकर (वय ३५) असे मृताचे नाव आहे. कुटुंबीय झोपेत असताना त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येते. सकाळी घटना उघडकीस आल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. अशा घटना टाळण्यासाठी जागरूकता वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे.

# शौर्याच्या जखमा, डोळयांत जिद्द; त्या वीराला पाहून 'काळे'ही भारावले

**वर्धा/ जनमाध्यम**

झारखंडच्या चाईवासा येथील घनदाट जंगलात नक्षलवाद्यांशी जीवाची बाजी लावत लढताना जखमी झालेल्या कोब्रा कमांडोच्या शौर्याला आज खासदार अमर काळे यांनी प्रत्यक्ष भेट देत मानाचा मुजरा केला. या भेटीत उमटलेली भावना, सैनिकाच्या डोळ्यांतील जिद्द आणि त्याग पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.

काही दिवसांपूर्वी नक्षलवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याला या जवानाने निर्भयपणे प्रत्युत्तर दिले. गंभीर जखमी होऊनही त्याने दाखवलेले धैर्य हे केवळ शौर्य नव्हे, तर देशासाठी जगण्याची आणि मरण्याची जिवंत शपथ ठरली आहे.या पार्श्वभूमीवर खा. अमर काळे यांनी जवानाच्या घरी जाऊन त्याची विचारपूस केली. जनतेसाठी स्वतःचे प्राण



पणाला लावणाऱ्या या वीरांना माझा कोटी कोटी सलाम. त्यांच्या धैर्यामुळेच देश सुरक्षित आहे, अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या.मात्र, या घटनेतून एक कटू वास्तवही समोर आले. आदर्श यशवंत ग्राम झाडाचे शिल्पकार विजय उगले यांच्याव्यतिरिक्त कोणत्याही अन्य लोकप्रतिनिधीने या जखमी जवानाची विचारपूस केली नाही. धामणगाव रेल्वे आणि चांदूर रेल्वे परिसरात लोकप्रतिनिधी असतानाही त्यांच्या घराकडे कोणी फिरकले नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.खा.काळे यांनी पुढे सांगितले की, हा जवान फक्त एक सैनिक नाही, तर देशभक्तीचा जिवंत ध्वज आहे. जखमी अवस्थेतही त्याच्या चेहऱ्यावरची जिद्द पाहून अभिमान वाटतो. सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आयुष्यातील संघर्ष जवळून पाहिल्यावर त्यांच्या त्यागाची खरी जाणीव होते.या भेटीने सैनिकाच्या कुटुंबीयांना मानसिक आधार मिळाला,तर स्थानिक नागरिकांमध्येही देशसेवा आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी यावर तीव्र चर्चा रंगली.जखमी असला तरी हा कोब्रा कमांडो आजही उभा आहे,देशासाठी, कर्तव्यासाठी आणि त्या तिरंग्यासाठीष्ठ त्याच्या प्रत्येक जखमेवर कोरलेले आहे.

## संक्षिप्त

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**आर्वी -** आर्वी-वर्धा मार्गावरील बेढोना परिसरात भरधाव ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. मनोज फुनसे (वय ५०, रा. वाढोणा) असे मृताचे नाव आहे. ते दुचाकीने आर्वीकडून वाढोणा दिशेने जात असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या काँक्रिट मिक्सर ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेनंतर ते ट्रकच्या चाकाखाली सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. अपघात प्रकरणी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे.

### एपीके फाईलद्वारे ३.८९ लाखांची फसवणूक

**आर्वी -** बँक खात्याची ई-केवायसी करण्याच्या बहाण्याने एका तरुणाची ३ लाख ८९ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आली. स्टेट बँक कॉलनी परिसरात ही घटना घडली. गोपाल जयस्वाल (वय २४) यांच्या मोबाईलवर अनोळखी व्यक्तीने केवायसी अपडेट करण्यासाठी एपीके फाईल पाठवली. संबंधित फाईल डाउनलोड करताच त्यांच्या मोबाईलवरील आर्थिक व्यवहारांवर सायबर गुन्हेगारांचा ताबा मिळाला. त्यानंतर 'फोन पे'द्वारे त्यांच्या खात्यातील रक्कम काही मिनिटांत वळती करण्यात आली. प्रकार लक्षात येताच त्यांनी पोलिसांत धाव घेतली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. नागरिकांनी अनोळखी लिंक किंवा फाईल डाउनलोड करू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## नेत्यांच्या 'फित कापण्याच्या' प्रतीक्षेत सडणार का पुस्तके

# उद्घाटनाच्या मोहापायी विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला

**सेलु/ जनमाध्यम**

स्थानिक नगर पंचायत प्रशासनाचा कारभार सध्या 'अंधेर नगरी चौपट राजा' या म्हणीची प्रचिती देत आहे. एकीकडे प्रशासन प्रत्येक कुटुंबाकडून शिक्षण आणि विकासाच्या नावाखाली शेकडो रुपयांचा मनमानी कर (टॅक्स) वसूल करत आहे, तर दुसरीकडे सुविधांच्या नावाखाली विद्यार्थ्यांना केवळ एका 'रिकाम्या इमारतीचे' गाजर दाखवले जात आहे. विशेष म्हणजे, ज्या नगर पंचायतीची स्वतःची एकही शाळा नाही, तिथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती योजनेअंतर्गत ३३,८५,७९५ रुपयांच्या निधीतून बांधलेले वाचनालय आणि उद्यान गेल्या दीड वर्षांपासून केवळ उद्घाटनाच्या प्रतीक्षेत धूळ खात पडून आहे.

कर वसुलीत तत्परता, सुविधेत मात्र ठणठणाट नगर पंचायत प्रशासन कर वसुलीसाठी सामान्य नागरिकांच्या मागे तगादा लावते, मात्र जेव्हा विद्यार्थ्यांना



वाचनालय उपलब्ध करून देण्याची वेळ येते, तेव्हा 'निधीचा अभाव' किंवा 'प्रशासकीय प्रक्रिया' अशी रडगाणी गायली जातात. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जर शिक्षणासारखी मूलभूत सुविधाच द्यायची नसेल, तर कोणत्या अधिकाराने हा अव्वाच्या सव्वा कर वसूल केला जातोय असा प्रश्न जनता विचारत आहे. राजकीय श्रेयासाठी विद्यार्थ्यांचे नुकसान अभ्यासिकेची इमारत पूर्णपणे तयार आहे, तरीही तिची दारे विद्यार्थ्यांसाठी बंद आहेत. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, सत्ताधारी नेते आणि प्रशासन एखाद्या 'मोठ्या नेत्याच्या' प्रतीक्षेत आहेत, जेणेकरून थाटामाटात उद्घाटन करून स्वतःची पाठ थोपटून घेता येईल. उद्घाटनाच्या हव्यासापोटी आमच्या आयुष्याची महत्त्वाची वर्षे वाया जात आहेत.असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विद्यार्थ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून 'दिखावा सोडा, वाचनालय उघडा' असा नारा दिला आहे. नगराध्यक्षा स्नेहल देवतारे आणि मुख्याधिकारी राजेश अग्रवाल यांना दिलेल्या निवेदनात जर तात्काळ ही अभ्यासिका सुरू झाली नाही, तर नगर पंचायतीच्या प्रवेशद्वारावरच तीव्र 'ठिय्या आंदोलन' छेडले जाईल.असा इशारा योगेश कोसेकर, अंकीत भुसे सागर उईके निरज सातोकर, विकास उईके यांचेसह या विद्यार्थ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे

## संशयित हालचालीप्रकरणी दोघांना अटक

**कारंजा (घा.) -** चिंचोली परिसरात संशयास्पद हालचाली करत अंधारात लपून बसलेल्या दोन तरुणांना पोलिसांनी अटक केली. हरजितसिंग बावरी व अमृतसिंग बावरी (दोघेही वय १८, रा. काकडधरा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.
पोलिस गस्ती दरम्यान संशय आल्याने दोघांची चौकशी करण्यात आली. मात्र त्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत ते कुठल्यातरी गुन्ह्याच्या उद्देशाने तेथे थांबले असावेत, असा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. परिसरात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

## १५ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा, तरोडा विद्यालयात आठवणींना उजाळा

**तरोडा/ जनमाध्यम**

श्री संत केजाजी महाराज विद्यालय, तरोडा येथे २०१०-११ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. तब्बल १५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत भावनिक वातावरण निर्माण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव वाघ होते, तर संस्थेचे सदस्य नरेंद्रजी उघडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका प्रियंका ढोले, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक तसेच विद्यमान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय



जीवनातील अनुभव कथन करताना शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच आजच्या यशस्वी वाटचालीस बळ मिळाल्याचे सांगितले. शाळेविषयीचा जिव्हाळा आणि कृतज्ञता त्यांच्या मनोगतातून स्पष्टपणे जाणवत होती.अध्यक्षीय भाषणात मधुकरराव वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत, शाळेचे संस्कार आयुष्यभर उपयोगी पडतात, असे नमूद केले. कार्यक्रमादरम्यान माजी विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली. मुख्याध्यापिका प्रियंका ढोले यांनी त्याबद्दल सर्वांचे आभार मानत या उपक्रमाचे कौतुक केले.हा स्नेहमेळावा विद्यार्थ्यांसाठी आठवणींचा खजिना उलगडणारा आणि नातेसंबंध अधिक दृढ करणारा ठरला.

## वर्ध्यात 'धान्य महोत्सव २०२६' नैसर्गिक शेतीला नवी दिशा

**वर्धा/ जनमाध्यम**

नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देत शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट दुवा निर्माण करण्याच्या उद्देशाने कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशन, वर्धा यांच्या वतीने 'धान्य महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. ११ ते १३ एप्रिल २०२६ दरम्यान दररोज सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत बॅचलर रोडवरील हॉटेल हरिराम टॉवर, न्यू आर्ट्स कॉलेजजवळ येथे होणार आहे.

या महोत्सवाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे नैसर्गिक पद्धतीने उत्पादित धान्याची थेट शेतकऱ्यांकडून विक्री होणार आहे. रासायनिक खतांपासून दूर राहून सेंद्रिय व विषमुक्त शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार,सुरक्षित आणि आरोग्यदायी अन्नधान्य थेट उत्पादकांकडून खरेदी करता येणार आहे. महोत्सवात विविध प्रकारचे तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी यांसारखी तृणधान्ये, कडधान्ये तसेच इतर नैसर्गिक उत्पादने उपलब्ध असतील. याशिवाय शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट संवाद साधण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.त्यामुळे शेतीतील नव्या पद्धती,उत्पादन प्रक्रिया आणि अन्नाच्या गुणवत्तेबाबत माहितीची देवाणघेवाण होणार आहे.नैसर्गिक शेतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांमध्ये विषमुक्त अन्नधान्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. स्थानिक शेतकऱ्यांना योग्य दर मिळवून देण्यासोबतच ग्राहकांना पर्यायी आणि आरोग्यदायी अन्नाचा पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे.या उपक्रमाला शेतकरी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद द्यावा, आवाहन आयोजकांनी केले आहे.

# वर्धा ग्रामीण २ उपविभागात उत्कृष्ट कामगिरीचा गौरव सोहळा

## कर्मचाऱ्यांचा उत्साहात सत्कार

**वर्धा/ जनमाध्यम**



वर्धा ग्रामीण २ उपविभागात आर्थिक वर्ष एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जनमित्र, अभियंते व कर्मचाऱ्यांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या सोहळ्यात कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा सन्मान करताना कृतज्ञतेचा आणि अभिमानाचा सुर उमटला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी अभियंता पारधी साहेब होते, तर उपव्यवस्थापक खोडवे मॅडम प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी सर्व जनमित्र, यंत्रचालक, बिलिंग स्टाफ व अभियंत्यांना प्रशस्तीपत्र व पुष्प देऊन गौरविण्यात आले. विविध शाखा कार्यालयांनाही सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

कामात मोलाची साथ देणाऱ्या रीडर व मेंटेनन्स कंत्राटदारांसह त्यांच्या कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात उपकार्यकारी अभियंता निशांत बहादूरे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर वरिष्ठ तंत्रज्ञ पाणबुडे, शरद गोडदे आणि अभियंता सचिन बागेश्वर यांनी आपल्या अनुभवांद्वारे टीमवर्कचे महत्त्व अधोरेखित केले.प्रमुख पाहुण्या खोडवे यांनी कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात पारधी साहेब यांनी उपविभागाच्या एकजुटीचे विशेष कौतुक करत, यश हे एकट्याचे नसते, ते संपूर्ण टीमच्या मेहनतीचे फलित असते, असे सांगत सर्वांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अभियंता दिग्विजय लोह यांनी केले. समारंभानंतर विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. संगीत खुर्ची स्पर्धेत महिला व पुरुष गटातील विजेत्यांना बहादूरे साहेब यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.कार्यक्रमानंतर डीजेच्या तालावर सर्वांनी आनंद लुटला व एकत्र जेवणाचा आस्वाद घेतला.

या यशस्वी आयोजनासाठी उपविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १३३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ७१ व्या कामगार प्राथमिक नाटय महोत्सव अकोला विभागात

## 'वारकरी' तब्बल आठ पारितोषिके पटकावून सर्वप्रथम





**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, अकोला विभागा तर्फे आयोजित ७१वा प्राथमिक कामगार नाटय महोत्सवाचे आयोजन स्व भाऊ लिमये सभागृह, सिपना इंजिनियरीन कॉलेज, अमरावती येथे करण्यात आले. या नाटय स्पर्धेत एकून २५ नाटकांचा सहभाग होता.या स्पर्धेत कामगार कल्याण केंद्र. अकोट तर्फे सहभागी झालेल्या डॉ. चंद्रकांत रमेशचंद्र शिंदे लिखीत व दिग्दर्शित 'वारकरी' या दोन अंकी देश व देव भक्तिमय नाटकाने तब्बल आठ पारितोषिके पटकावून प्रथम क्रमांक पटकावला व या नाटकाची पुढे होणा-या राज्य स्तरिय अंतिम नाटय महोत्सवा करिता निवड करण्यात आली.

या स्पर्धेत सर्वस्वी नाटक वारकरी (प्रथम), सर्वोत्कृष्ट नाटलेखन डॉ. चंद्रकांत शिंदे (प्रथम), दिग्दर्शन डॉ. चंद्रकांत शिंदे (प्रथम), नेपथ्य ॲड प्रशांत देशपांडे (प्रथम), पार्श्वसंगीत प्रथमेश पुर्भे (प्रथम), प्रकाश योजना गायत्री गुडधे (द्वितीय), स्त्री अभिनय निर्मिती गणवीर (प्रथम) तसेच पुरुष अभिनय (प्रथम) डॉ. चंद्रकांत शिंदे अशा यशस्वी पारितोषिकांचा समावेष आहे.यापूर्वी सांस्कृतिक कार्य संचालनालय तर्फे आयोजित ६४व्या महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धेत अमरातवती विभागातून 'वारकरी' या नाटकाने नऊ पारितोषिके पटकावून प्रथक स्थान प्राप्त केले होते. त्यात सर्वस्वी नाटक वारकरी (प्रथम), दिग्दर्शन डॉ. चंद्रकांत शिंदे (द्वितीय), नेपथ्य ॲड प्रशांत देशपांडे (प्रथम), पार्श्वसंगीत प्रथमेश पुर्भे (प्रथम). वेशभुषा ॲड श्रद्धा पाटेकर (प्रथम), रंगभूषा प्रतिक्षा गुडधे (द्वितीय), प्रकाश योजना गायत्री गुडधे (तुतिय), स्त्री अभिनय रिया गीते (प्रथम व रौप्य पदक) तसेच पुरुष अभिनय डॉ. चंद्रकांत शिंदे (प्रशस्तीपत्र) या यशस्वी पारितोषिकांचा समावेष आहे.

रत्नागिरी येथे आयोजित ६४व्या अंतिम महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धेत 'वारकरी' या नाटकाने आपले दमदार सादरीकरण केले. या स्पर्धेत डॉ. चंद्रकांत शिंदे यांना राणोजी या भूमिके साठी पुरुष अभिनय (प्रशस्तीपत्र) हा पुरस्कार प्राप्त झाला.प्रत्येक नाटयप्रयोगात आपल्या उत्कट सादरीकरणाने 'वारकरी' हे नाटक एक परिपूर्ण व उत्तुंग नाटयाविष्कार साधत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करण्यात यशस्वी होतं. देशभक्तीची किनार असलेला परिपक्व कठोर राणोजी व देवभक्ती आकंठ बुडालेली रखमा हे दोघेही देव आणि देश भक्तीचे सर्वोच आदर्श ठरतात.'वारकरी' दोन अंकी देव-देशभक्तीमय सामाजिक नाटक आहे. विठ्ठल भक्तीत तल्लीन झालेली रखुमाई व देशभक्तीसाठी सर्वस्व पणाला लावणारा तिचा पती इंन्सपेक्टर राणोजी शिंदे या दोन मुख्य पात्रांच्या आदर्शवादी देश-देव भक्ति भोवती या नाटकाचे कथानक फिरते. विचार व स्वभावातील विरोधाभासामुळे या दोघांमध्ये टोकाया संघर्ष निर्माण होतो.देशभक्तीसाठी सर्वस्व पणाला लावणारा तिचा पती इंन्सपेक्टर राणोजी शिंदे या दोन मुख्य पात्रांच्या आदर्शवादी देश-देव भक्ति भोवती या नाटकाचे कथानक फिरते. विचार व स्वभावातील विरोधाभासामुळे या दोघांमध्ये टोकाचा संघर्ष निर्माण होतो. हे नाटक भक्ती, कर्म आणि कर्तव्य यांच्या नात्यावर प्रभावी भाष्य करतं. नित्यकर्म निस्वार्थपणे करत राहिल्यास कर्तव्याची पूर्तता होतेच. आणि हीच उवरी भवती असते. अशा भक्ती मधून अपेक्षित फळ आपोआप प्राप्त होते. हा प्रभावी संदेश हे नाटक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवते.

वारीतील वारक-यांचे रक्षण करण्यासाठी जीवाची पर्वा न करणारा, कायदा व सुव्यवस्थेचे काटकोर पालन करणारा राणोजी, देवभक्तीपेक्षा आपल्या कर्तव्यपुर्तीला प्राधान्य देतो. राणोजीची ही निस्वार्थ देशभक्ती बघून पराकोटीची देवभक्त असणारी रखुमाई देशसेवेसाठी प्रेरित होते आणि स्वरा देव दगडाच्या मुर्तीत नसून भक्ताच्या मनात वसलेला असतो हे उमजल्यावर तिचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो.डॉ. चंद्रकांत रमेशचंद्र शिंदे यांच्या प्रतिभाशाली व प्रभावी लेखणीतून साकारलेल्या लक्षणीय संवादातून प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविण्यात 'वारकरी' यशस्वी ठरतं. तसेच दिर्घ अनुभव पणाला लावत डॉ. चंद्रकांत शिंदेचे कसदार दिग्दर्शन नाटकाच्या प्रत्येक प्रसंगाचा बारकावा टिपत 'वारकरी प्रेक्षकांच्या मनाचा अचूक ठाव घेते.महाराष्ट्र राज्य नाटय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरलेली 'वारकरी' ही देव-देश भक्तिमय कलाकृतीची निर्मीती ॲड. प्रशांत देशपांडे, अंबापेठ क्लब, अमरावती यांची होती. तर ७१व्या महाराष्ट्र कामगार मंडळ, अकोला विभागा तर्फे आयोजित प्राथमिक फेरीच्या सादरीकरणाचे श्रेय धिरज वाळेकर, सहायक संचालक, कामगार कल्याण केंद्र. अकोट यांचे होते.तर श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती या महाविद्यालयाचे गुणवंत, होतकरु विद्यार्थी, प्राध्यापक वृंद व प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांची भक्कम साथ व अथक परिश्रम यांनी 'वारकरी' या यशस्वी नाटकाच्या साकार करण्यात आपले मोलाचे योगदान दिले. 'वारकरी' या नाटकाचा पुढील स्पर्धेचा प्रयोग ७१व्या कामगार नाटय महोत्सवाच्या अंतिम फेरीत होईल. तत्पूर्वी, काही प्रयोग प्रेक्षकांच्या खास आग्रहामुळे आयोजित करण्याचा मानस ॲड. प्रशांत देशपांडे, प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे, प्रा. डॉ. दिनेश खेडकर, प्रा. मनिष गायकवाड व नाटकाचे लेखक दिग्दर्शक डॉ. चंद्रकांत शिंदे यांनी व्यक्त केला, तसेच देव-देश भक्तिमय 'वारकरी हे नाटक सर्व प्रेक्षकांनी आवर्जून बघावे व त्याचे प्रयोग लावावेत असे आवाहन सुद्धा केले आहे.

## संक्षिप्त



### सोनाली काटोले यांची निवड

**टाकरखेडा संभू-** भातकुली तालुक्यातील साऊर येथील रहिवासी असलेल्या सोनाली संदीप काटोले यांची भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या भातकुली तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तिवसा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे आणि महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अनिता तिखीले,भातकुली तालुका अध्यक्षा आशा जुमळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन प्रदिप गौरखेडे,अमरदिप तेलखडे, भातकुली तालुका अध्यक्ष शामभाऊ गवळी,विरेंद्र लंगडे,सोपान गुडघे, योगेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.भातकुली तालुका भाजपा महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवडीला शुभेच्छा दिल्या.



### सोनाली जामठे यांचा सत्कार

**टाकरखेडा संभू-** भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभू येथील सोनाली निलेश जामठे यांची भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या भातकुली तालुका उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने त्यांचा पी.बी.वनस्कर, प्रकाश शेलापुरकर, भास्कर भटकर,उत्तम तायडे, प्रा गजानन वानरे,पांडुरंग गोंडेकर, जगदेव रेवस्कर, अरुण शेगेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निवडीमुळे तालुक्यातील महिलांना नवे नेतृत्व मिळेल, असा विश्वास प्रकाश शेलापुरकर यांनी व्यक्त केला. या प्रसंगी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे पदाधिकारी, तसेच मराठी पत्रकार संघाचे भातकुली तालुका अध्यक्ष संतोष शेंडे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे उपस्थित होते.

### देवरावजी कडू यांचे निधन



**कुऱ्हा -** मार्डी येथील जेष्ठ नागरिक तथा कॅटरींग व्यावसायिक देवरावजी मोतीरामजी कडू यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले, त्यांच्या पश्चात तीन मुले,स्नुषा,नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे. स्व.देवरावजी कडू यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते.यावेळी सामुहिक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# परतवाडा-अमरावती मार्गावर वाहन बंद पडल्याने वाहतूक कोंडी

## पोलिस व सामाजिक कार्यकर्त्यांची तत्पर भूमिका

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे दर गुरुवारी भरत असलेल्या साप्ताहिक बाजाराच्या पार्श्वभूमीवर दि. ९ एप्रिल दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास परतवाडा-अमरावती महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वारासमोर एक चारचाकी सुमो वाहन अचानक बंद पडल्याने दोन्ही बाजूंनी वाहनांची मोठी रांग लागली. या घटनेमुळे ट्रक, ट्रॅक्टर, दुचाकी, ऑटो व बस अशा शेकडो वाहनांचा खोळंबा झाला. गुरुवारचा बाजार असल्याने आधीच वाहनांची मोठी वर्दळ होती, त्यातच ही घटना घडल्याने परिस्थिती गंभीर बनली.वाहन बंद पडून जवळपास अर्धा ते दीड तास रस्त्यावरच उभे राहिल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. अनेक ठिकाणी वाहनं आमनेसामने आल्याने अपघात होण्याचीही शक्यता निर्माण झाली होती.या परिस्थितीत परतवाडा पोलीस ठाण्याचे वाहतूक कर्मचारी उदय मोरे यांनी एकहाती वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी सांभाळली. त्यांना सामाजिक कार्यकर्ते सागर पुरोहित तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी अमर वानखडे आणि इतर कर्मचाऱ्यांनी मदत केली.सदर बंद पडलेले वाहन पोलिस कर्मचारी व स्थानिकांच्या मदतीने रस्त्याच्या कडेला ढकलून हलविण्यात आले. त्यानंतर सुमारे अर्ध्या ते एक तासात वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली.या दरम्यान नागरिकांना उन्हात बराच वेळ थांबावे लागले. सुमारे २०० ते ३०० वाहनांची लांबच लांब रांग लागली होती. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारची वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासन आणि कृषी उत्पन्न बाजार समितीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



### पोलिस कर्मचारी सह सामाजिक कार्यकर्तेचे कौतुक

आज ९ एप्रिल रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती प्रवेश द्वार समोर दोनशे ते तीनशे वाहनाची मोठी रांग लागली होती.ट्रक, ट्रॅक्टर,बस,दोन्ही बाजूने वाहने आमने - सामने होती. पण परतवाडा पोलिस स्टेशन चे वाहतूक कर्मचारी उदय मोरे आणि सामाजिक कार्यकर्ते सागर पुरोहित सह बाजार समितीचे कर्मचारी यांनी भर उन्हात वाहतुकीची कोंडी समयसूचकता व नियोजन पद्धतीने सोडविली.यामुळे यांचे सर्वांचे कौतुक होत आहे.

# पी.आर.पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात 'जागतिक आरोग्य दिवस'



**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे. पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेदामध्ये 'जागतिक आरोग्य दिवस' यानिमित्त आरोग्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हर्षवर्धन नवले यांनी 'टुगेदर फॉर हेल्थ, स्टॅन्ड विथ सायन्स' या विषयावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.जागतिक आरोग्य दिनानिमित्त महाविद्यालयात 'ई-पोस्टर कॉम्पिटिशन' ठेवण्यात आली होती. यामध्ये प्रथम क्रमांक विशाखा गवई व द्वितीय क्रमांक ऋषी आहूजा यांनी पटकावला असून, प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील स्वस्थवृत्त व योगा विभाग प्रमुख डॉ. मनोदय मोहोड व सहाय्यक प्राध्यापिका डॉ. निकिता लांडे यांनी केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन द्वितीय वर्ष बी.ए.एम.एस. च्या विद्यार्थिनी तृप्ती अहिरकर हिने केले. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉक्टर, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात

# अल्ट्राटेक सिमेंट-सेंटर ऑफ एक्सेलन्सचे उद्घाटन




**अमरावती/का.प्र.**

सिपना आभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या स्थापत्य आभियांत्रिकी विभागात अल्ट्रा टेकच्या सौजन्याने सेंटर ऑफ एक्सेलन्स ची निर्माती करण्यात आली. सेंटर ऑफ एक्सेलन्स चे उद्घाटन सोहळा अतिशय थाटात साजरा करण्यात आला. या उद्घाटन सोहळा सिपना शिक्षण प्रसारक मंडळ चे अध्यक्ष जगदीशजी गुप्ता यांच्या अध्यक्षेत तसेच इंजि. अरविंद महाजन व्हॉईस प्रेसिडेंट व झोनल हेड अल्ट्रा टेक सीमेंट, इंजि. अवधेश उपाध्याय, विभागीय प्रमुख, विदर्भ व अजय पुसदकर सेल्स हेड, अमरावती यांच्या प्रमुख उपस्थिती तसेच सिपना आभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. संजय खेरडे यांच्या मार्गदर्शनात झाला. यावेळी मंचावर विभाग प्रमुख प्रा. रवि रोठकर, सेंटर ऑफ एक्सेलन्सचे प्रभारी प्रा. सर्जेराव पाटील उपस्थित होते. या उपक्रमामुळे शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक बळकट होऊन विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान, प्रात्यक्षिक अनुभव आणि कौशल्य विकासासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या प्रसंगी अल्ट्राटेक सिमेंटकडून अरविंद महाजन (VP ke Zonal Head, Technical Customer Solution),अवधेश उपाध्याय (Regional Head, VidaRha Technical Customer Solution), अजय पुसदकर (Territory Sales Head, अमरावती) तसेच नितीन कांगटे (Territory Manager, Technical Service Solution, अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील मान्यवर म्हणून अमित गिल्डा (Chairman, ICI, Amravati Chapter),मिलिंद कहाळे (President, Association of Consulting Civil Engineers, अमरावती) तसेच राजन पाटील (President, CREDAI, अमरावती) हे उपस्थित होते. या भव्य उद्घाटन सोह सोहळ्याचे संचालन तृतीय वर्ष ची विद्यार्थीनी गौरी उमक हिने केले तर प्रा. ऋषिकेश बडनखे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालात एक दिवसीय ई-राष्ट्रीय परिषद

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित, इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील आय.क्यु.ए.सी. व इंग्रजी विभाग आणि पदव्युत्तर इंग्रजी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या वतीने 'शब्दांची ताकद : साहित्य, संस्कृती आणि सामाजिक उत्क्रांती एक बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून वेध' या विषयावर आयोजित करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन आर. धांडे यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचा उद्घाटन समारंभ झाला. परिषदेचे उद्घाटन डॉ. नितीन कोळी (परीक्षा नियंत्रक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ) यांच्या हस्ते झाले. त्यांनी यावेळी यथोचित मार्गदर्शन केले. मुख्य वक्ते डॉ. अंबादास मोहिते (माजी वरिष्ठ सल्लागार, अमरावती प्रादेशिक केंद्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक) यांनी यावेळी शब्दांची ताकद ही संकल्पना आपण रोजच्या जीवनात अनुभवत असतो. एक सकारात्मक शब्द एखाद्याचे आयुष्य बदलू शकतो,तर नकारात्मक शब्द मनाला खोल जखमही देऊ शकतात आणि नाशही करू शकतात ही त्यांची खरी ताकद आहे असे प्रतिपादन केले.

बीजभाषक डॉ. दत्तात्रय तापकीर (प्राचार्य, कॉलेज ऑफ एज्युकेशन, सिल्वासा, पुणे) यांनी 'In the Beginning was the Word' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी शब्दांचे संवादातील परिमाण, एकात्मतेसाठी भाषा हे साधन, तसेच शब्दांची संज्ञात्मक आणि भावनिक ताकद यावर प्रकाश टाकत भाषेमुळे आपल्या विचारसरणीवर आणि निर्णयप्रक्रियेवर कसा परिणाम होतो हे स्पष्ट केले. विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी अमरावतीच्या कार्यकारिणी सदस्य डॉ. पूनम



चौधरी यांनी प्रास्ताविक केले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. श्वेता खेतान पदव्युत्तर इंग्रजी विभाग संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी केले आणि आभार आय.क्यु.ए.सी डॉ. वंदना गावंडे यांनी मानले.

तांत्रिक सत्र एकचे अध्यक्षस्थान डॉ. अजय व्ही. कोल्हे (प्राचार्य, इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय) यांनी भूषविले. या सत्रात डॉ. प्रीतमकुमार बेदरकर (मानसशास्त्र विभाग प्रमुख, अहमदनगर कॉलेज) यांनी 'Word, Mind and Wellbeing' या विषयावर भाष्य केले. त्यांनी मानसिक स्वास्थ्य ही एक गतिमान अवस्था असून ती व्यक्तीच्या जीवनातील समाधान, भावनिक संतुलन आणि दैनंदिन ताणतणावाशी सामना करण्याच्या क्षमतेशी निगडित असल्याचे प्रतिपादन केले. या सत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. वामन जवंजाळ यांनी केले.

तांत्रिक सत्र दोनचे अध्यक्षस्थान डॉ. संदीप पी. जोशी (विभाग प्रमुख, पदव्युत्तर इंग्रजी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ) यांनी भूषविले. या सत्रातील वक्त्या डॉ. पूजा पी. हल्याल (सहयोगी प्राध्यापक, इंग्रजी विभाग, राणी चन्नम्मा विद्यापीठ, बेळगाव,कर्नाटक) यांनी 'Words of Resistance: Writing from the Margin in Indian Literature' या विषयावर विचार मांडले. त्यांनी सांगितले की कला वेगवेगळ्या माध्यमांतून व्यक्त होत असतात त्याचा प्रभाविपणा हा त्या व्यक्तीच्या अभिव्यक्तिनुसार ठरत असतो जसे की चित्रपट, नाटक ,कादंबरी इत्यादी. या सूत्राचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. श्वेता खेतान यांनी केल.

परिषदेच्या समारोपीय सत्रामध्ये प्रमुख अतिथि म्हणून डॉ. वैशाली गुडधे (Dept of Library & Information Science SGBAU Amravati ) उपस्थित होत्या. त्यांनी यावेळी यथोचित मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. पूजा देशमुख,छाया बडगे आणि यांनी परिषदेविषयी अभिप्राय दिला. या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मंजुषा बारबुद्धे यांनी केले. आभार आय.क्यु.ए.सी समन्वयक डॉ. वंदना भोयर यांनी मानले. विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी अमरावतीच्या सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांचे या परिषदेसाठी मार्गदर्शन लाभले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्रा. अनुप आत्राम, अजंता प्रकाशनचे विनय हाटोले व महाविद्यालयातील नियमित व तासिका तत्वावरील प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## गाजीपूर खाण प्रकरण तापले

# ४८ कोटींचा दंड रखडला : मुदत संपल्यानंतरही याचिका दाखल

### एसडीओंच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणाने पुन्हा एकदा जोर धरला असून तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड प्रलंबित असतानाही संबंधितांवर कारवाई का होत नाही, यावरून महसूल प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. गट क्रमांक २७ व ३८ मधील उत्खनन प्रकरणी मे साई स्टोन क्रेशरचे संचालक संतोष चांडक आणि जमीनमालक विलास कालू चिमोटे यांच्यावर हा दंड आकारण्यात आला आहे. मात्र, हा दंड अमान्य असल्याचे सांगत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली होती.

या प्रकरणी न्यायालयाने स्पष्ट आदेश देत तहसीलदारांच्या आदेशाविरोधात संबंधित प्राधिकरणाकडे चार आठवड्यांच्या आत अपील करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, दिलेल्या मुदतीत चांडक आणि चिमोटे यांनी कोणतीही अपील याचिका दाखल केली नाही. त्यामुळे प्रकरण निकाली निघण्याऐवजी आणखी गुंतागुंतीचे झाले.

दरम्यान, वृत्तपत्रांतून प्रकरण उघडकीस आल्यानंतर आणि वसुलीची नोटीस मिळाल्यानंतरच संबंधितांनी उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांकडे धाव घेत याचिका दाखल केली. विशेष म्हणजे, न्यायालयाने दिलेली मुदत संपल्यानंतर ही याचिका दाखल झाली असतानाही ती स्वीकारण्यात आली. त्यामुळे एसडीओ लोणारकर यांनी कोणत्या निकषावर ही याचिका दाखल करून घेतली, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. यासाठी दंडाची काही रक्कम भरून घेण्यात आली का, असा सवालही उपस्थित होत असला तरी याबाबत माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे.

याचदरम्यान, गाजीपूर मधीलच आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. भूदान चळवळीअंतर्गत मिळालेल्या गट क्रमांक ५२/२ मधील शेतजमिनीचा काही भाग 'पोट खराब' असल्याचे दाखवत त्याला वाणिज्यिक अकृषक स्वरूप देण्यात आले. वास्तविक, अशा जमिनींचा उद्देश केवळ शेती व उपजीविका हा असतो. अपवादात्मक परिस्थितीतच अशा जमिनींचा वापर वाणिज्यिक कारणांसाठी केला जाऊ शकतो.

मात्र, २००९ मध्ये संशयास्पद पद्धतीने वाणिज्यिक अकृषक परवानगी मिळवत या ठिकाणी उत्खनन सुरू करण्यात आले. प्रत्यक्षात पट्टाधारकाकडे आवश्यक यंत्रसामग्री आहे का, की एखाद्या त्रयस्थ व्यक्तीकडून उत्खनन सुरू आहे, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

सन २०२५ मध्ये झालेल्या मोजणीत या ठिकाणी तब्बल ६० हजार ब्रासपेक्षा अधिक गौण खनिजाचे अतिरिक्त उत्खनन झाल्याचे ☞(पान २ वर)

#### वाणिज्यिक वापराच्या नावाखाली खाणकामाचा खेळ-

गाजीपूर येथील गट क्रमांक २७ आणि ३८ हे भाग वाणिज्यिक वापरासाठी अकृषिक करण्यात आले आहेत. तसेच भूदान चळवळीच्या माध्यमातून मिळालेली गट क्रमांक ५२/२ ही जमीनही वाणिज्यिक वापरासाठी रूपांतरित करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात या जमिनींचा वापर थेट खाणकामासाठी, म्हणजेच औद्योगिक उपक्रमासाठी केला जात असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे अकृषिक परवानगीचा आधार घेत नियमांना सर्रास हरताळ फासला जात असल्याची स्थिती आहे. या सर्व गैरप्रकाराकडे महसूल विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक डोळेझाक करीत असल्याचा आरोप होत असून, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह अधिक गडद होत आहे.

#### महसूल मंत्री महोदय, गाजीपूरकडे एकदा तरी वळा-



अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात गाजीपूर येथे सुरू असलेला हा प्रकार केवळ बेकायदेशीर उत्खननाचा मुद्दा राहिलेला नाही, तर तो आता सामान्य जनतेच्या न्यायव्यवस्थेवरील विश्वासालाच तडा देणारा ठरत आहे. तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड आकारूनही संबंधितांकडून वसुली होत नाही, उलट मुदत संपल्यानंतरही त्यांची याचिका स्वीकारली जाते, ही बाब सामान्य माणसाच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे. मंत्री महोदय, एका शेतकऱ्याने दोन हजार रुपयांचा थकबाकी ठेवली तरी त्याच्यावर तात्काळ कारवाई होते, जमीन जप्तीची नोटीस दिली जाते. मग येथे कोट्यवधींचा दंड थकवणाऱ्यांवर इतकी ' ममत्त्वाची ' भूमिका का? त्यामुळे कोणाचे हात कोणाच्या खिशात आहेत, हा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

तर दुसरीकडे भूदान चळवळीच्या माध्यमातून मिळालेल्या जमिनीवरच हजारो ब्रास उत्खनन होते, आणि संबंधित अधिकारी 'तक्रार करा मगच चौकशी करतो' असे सांगतात, यापेक्षा दुर्दैव काय असू शकते? जनतेने कोणाकडे तक्रार करायची, जे स्वतःच जबाबदार आहेत त्यांच्याकडेच? आज गाजीपूरमध्ये सुरू असलेला हा प्रकार उद्या संपूर्ण जिल्ह्यासाठी धोक्याची घंटा ठरू शकतो. महसूल प्रशासनाच्या आशीर्वादाशिवाय इतक्या मोठ्या प्रमाणात उत्खनन होऊ शकते का, हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहे.मंत्री महोदय, आजच्या आपल्या दौऱ्यात फक्त बैठका आणि आढावे नकोत तर एकदा गाजीपूरच्या मातीवर पाय ठेवून बघा जिथे शासनाचा महसूल लुटला जातोय, नियमांना उघडपणे तिलांजली दिली जातेय, आणि जिथे सामान्य माणूस न्यायासाठी अजूनही हवालदिल आहे. गाजीपूरमधील ४८ कोटींचा दंड, भूदान जमिनीवरील उत्खनन आणि अधिकाऱ्यांची संशयास्पद भूमिका, या सर्वांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली, तरच जनतेचा प्रशासनावरचा विश्वास टिकून राहील. अन्यथा 'सगळे काही ठरलेलं असतं ' ही भावना अधिकच बळावेल.

# अकोली मार्गावर एसटी वाहकाची निर्घृण हत्या

### खोलापुरी गेट परिसरातील घटना; पोलिस तपास सुरू





**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरातील खोलापुरी गेट पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या म्हाडा कॉलनीजवळील क्रिकेट मैदान परिसरात एसटी महामंडळातील एका वाहकाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

किरण पुणतांबेकर (वय ४५, रा. साईनगर, अकोली रोड) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते एसटी महामंडळात वाहक म्हणून कार्यरत होते. बुधवारी सायंकाळी त्यांचा मृतदेह क्रिकेट मैदान परिसरात आढळून आला. घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक माहितीनुसार, अकोली रोड परिसरातील काही तरुणांनी किरण पुणतांबेकर यांना आधी बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांना जवळच्या निर्जन ठिकाणी नेऊन पुन्हा मारहाण करण्यात आली. या मारहाणीत गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. घटनेनंतर खोलापुरी गेट पोलिसांनी घटनास्थळी तातडीने धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. घटना घडल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले आहेत. पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना केली आहेत. सीसीटीव्ही फुटेज आणि स्थानिकांकडून माहिती संकलन सुरू असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले☞(पान २ वर)

#### वाईन शॉपी चे सीसीटीव्ही तपासले

या घटनेनंतर पोलिसांनी अकोली येथील वाईन शॉपी चे सीसीटीव्ही फुटेज तपासले. यामध्ये किरण सोबत काही तरुण दिसत आहे. माहिती नुसार किरण गुरुवारी सकाळी ७ वाजता घरून निघाले होते. किरण यांना एक मुलगा आहे. त्यांना गाडी चालवणे येत नव्हते आणि जवळ मोबाईलही ठेवत नव्हते. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

#### जुन्या वादात घटना-

माहितीनुसार किरण पुणतांबेकर यांच्या हत्येनंतर अकोली परिसरात दोन संशयित तरुणांचे नाव पोलिसांना माहित पडले आहे. पोलीस त्यांचा शोध घेत आहे. ते दोघे सध्या तरी फरार आहे. जुन्या वादात ही घटना घडली असावी असे बोलले जात आहे.

### राजुरा बाजार मार्गावर भीषण अपघात

# वाऱ्यामुळे झाडावर दुचाकी आदळली; युवकाचा मृत्यू

#### तिघे जखमी, परिसरात शोककळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड–राजुरा बाजार मार्गावर वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावर पडलेल्या झाडावर दुचाकी आदळून झालेल्या भीषण अपघातात एका १८ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला असून दोन युवकांवर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसामुळे रस्त्यालगतचे कडुलिंबाचे झाड तुटून वरुड–राजुरा बाजार मार्गावर पडले होते. अंधार आणि ढगाळ वातावरणामुळे रस्त्यावर पडलेले झाड चालकांच्या लक्षात आले☞(पान २ वर)




# आयपीएल ऑनलाईन सट्ट्यावर गुन्हे शाखेची धाड

### २० वर्षीय तरुण ताब्यात

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरात आयपीएल सामन्यांवर सुरू असलेल्या ऑनलाईन सट्टेबाजीवर गुन्हे शाखेने कारवाई करत एका तरुणाला रंगेहात अटक केली आहे. गिरीश उर्फ प्रिन्स संजय ददलानी (वय २०, रा. कलोती नगर, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. या कारवाईत मोबाईलसह सुमारे ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

८ एप्रिल २०२६ रोजी गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दस्तुरनगर ☞(पान २ वर)



# भरधाव वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार

#### तिवसाजवळील घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-**

अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गावर तिवसा शहराजवळील परिसरात अज्ञात वाहनाच्या धडकेत एका मादी बिबट्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. ही घटना गुरुवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, तिवसा परिसरातील वैभव वानखडे यांच्या शेताजवळ महामार्गावर एक बिबट्या गंभीर जखमी अवस्थेत पडलेला नागरिकांच्या निदर्शनास आला. भरधाव वाहनाच्या धडकेत हा बिबट्या जखमी झाल्याचा प्राथमिक अंदाज वनविभागाने वर्तवला आहे. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मोर्शी वनविभागाला याबाबत माहिती दिली. माहिती मिळताच मोर्शी वनविभागाचे अधिकारी तसेच अमरावती वनविभागाचे रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने ☞(पान २ वर)



# सयाजी हॉटेल्सची अमरावतीत एनराईजद्वारे एंट्री

### उदयोन्मुख शहरातील वाढत्या मागणीवर लक्ष





**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतातील उदयोन्मुख शहरांमध्ये आपला विस्तार अधिक मजबूत करत सयाजी हॉटेल्सने 'एनराईज बाय सयाजी, अमरावती' या आधुनिक आतिथ्य प्रकल्पाच्या उद्घाटनाची घोषणा केली आहे. शहराच्या सामाजिक व व्यावसायिक क्षेत्राला नवे परिमाण देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेले हे हॉटेल एनएच - ६, नागपूर महामार्गावर रणनीतिकदृष्ट्या वसलेले आहे. आधुनिक डिझाइन, प्रशस्त इव्हेंट स्पेस आणि ☞(पान २ वर)

# एम.डी. ड्रग्ससह एकाला अटक

### -नागपुरी गेट पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात अमली पदार्थविरोधातील मोहिमेला मोठे यश मिळाले असून नागपुरी गेट पोलिसांनी सापळा रचून एका इसमाला एम.डी. ड्रग्ससह अटक केली आहे. शेख नौशाद शेख सलीम (वय ३२, रा. बिस्मिल्ला नगर) असे आरोपीचे नाव आहे. या कारवाईत सुमारे १५.२६० ग्रॅम एम.डी. अमली पदार्थ, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण १,३२,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांना माहिती मिळाली होती की, लालखडी रेल्वे फाटक परिसरातून सुकळी गावाच्या दिशेने एक व्यक्ती दुचाकीवरून अमली पदार्थाची तस्करी करण्यासाठी येणार आहे. माहिती मिळताच वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून तातडीने कारवाईचे आदेश देण्यात आले. यानंतर नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे डी.बी. पथक प्रमुख पोहेकॉ मलिक अहमद यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी शासकीय पंच, फॉरेन्सिक पथक आणि फोटोग्राफर यांच्या उपस्थितीत सापळा रचला.☞(पान २ वर)

# कार उलटून जखमी महिलेचा मृत्यू

### लग्नाहून परतताना भीषण अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-**

भातकुली परिसरात माऊली मंगल कार्यालयाजवळ १६ मार्च रोजी घडलेल्या कार अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. अर्चना मंगेश गडलिंग (वय २७, रा. लोणी) असे मृतक महिलेचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मंगेश ज्ञानेश्वर गडलिंग हे आपल्या कुटुंबासह भाचीच्या लग्नासाठी असदपूर येथे गेले होते. लग्न आटोपल्यानंतर सर्वजण सायंकाळी परतीच्या प्रवासाला निघाले होते. भातकुली गावाजवळ रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने वॅगनार कार रस्त्यावर उलटली आणि भीषण अपघात घडला. या अपघातात अर्चना गडलिंग गंभीर जखमी ☞(पान २ वर)

# वडाळी उद्यानाची महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी केली पाहणी



अमरावती/प्रतिनिधी:-

महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी गुरुवार, दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी वडाळी उद्यानाच्या सौंदर्यीकरण प्रकल्पाची पाहणी केली. या प्रकल्पामुळे शहरातील नागरिकांना आधुनिक सुविधा व आकर्षक पर्यटनस्थळ उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

वडाळी उद्यानात राबविण्यात येत असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामध्ये विविध आकर्षक व उपयुक्त घटकांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये हिस्ट्री गार्डन, फूड कोर्ट एरिया, फ्लॉवर गार्डन, ग्रीन जिम, कॉनटूर लॉन, सायकलिंग ट्रॅक, फाऊंटेन, चिल्ड्रन प्ले एरिया तसेच साहसी उपक्रमांसाठी विशेष जागा विकसित करण्यात येत आहे.

तसेच नागरिकांच्या सोयीसाठी पार्किंग एरिया, 'वाइल्ड अ ग्लो' गार्डन, मेझ गार्डन, जिने , दिव्यांगांसाठी रॅम्प, तसेच सुंदर तलाव यांचाही प्रकल्पात समावेश आहे. या सर्व सुविधांमुळे वडाळी उद्यान हे शहरातील प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना येथील सोई सुविधा गुणवत्तापूर्वक व दर्जेदार पूर्ण ☞(पान २ वर)

# जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विषयांचा आढावा

### खासदार डॉ. अनिल बोंडे यांची उपस्थिती



**अमरावती/प्रतिनिधीः-**

जिल्ह्यातील विविध समस्यांबाबत खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. या निवेदनांवर झालेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आज विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात प्रामुख्याने आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यात येवदा, वडनेर गंगाई येथे आरोग्य सुविधांसाठी यंत्रणांनी पुढाकार घेऊन कार्य करावे. तसेच रूग्णांच्या तपासण्यांसाठी सॅम्पल अमरावती येथे पाठवावे लागते. त्यामुळे रूग्णांची अडचण होते. त्यामुळे या सुविधा निर्माण करण्यासाठी आरोग्य यंत्रणांनी सकारात्मकतेने काम करावे. दर्यापूर तालुका अल्पसंख्याकमध्ये येत असल्याने त्यांच्यासाठी असलेल्या योजनांमधून आरोग्य विषयक सुविधा उभारण्यावर भर द्यावा. तसेच ग्रामीण रूग्णालय स्थापन करण्यासाठी जागांचा शोध घेण्यात यावा. गरजूंना आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी आयुष्मान कार्ड काढण्यासाठी विशेष मोहिम घेण्यात यावी. वन विभागातर्फे नमो उद्यान आणि वड उद्यान तयार करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. ही उद्याने तातडीने पूर्ण व्हावीत, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. तसेच ही उद्याने तयार करताना याठिकाणी झाडांची संख्या अधिक असावी. तसेच अतिक्रमणाचा प्रश्न समोर येत आहे. त्यामुळे नगरपालिकांच्या पुढाकाराने शहरातील अतिक्रमणे काढण्यात यावीत. सर्वांना घरे ही शासनाची भूमिका ☞(पान २ वर)